शेतकरी

■ एप्रिल २०१७ ■ किंमत २५ रुपये

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक. घामाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन उत्कर्षाच्या वाटेवर...



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट



१८९१ : १४ एप्रिल : मध्यप्रदेशात महू येथे जन्म.

१८९६ : भीमरावची आई भीमाबाईंचे सातारा येथे निधन.

१८९८ : सुभेदार रामजी सकपाळ यांनी दुसरे लग्न जिजाबाईंशी केले.

१९०० : इंग्रजी पहिलीत भीमरावांचा सरकारी सातारा हायस्कूल प्रवेश.

१९०२ : कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनी संस्थानच्या सेवेत मागासवर्गीयांसाठी ५० टक्के जागांचे आरक्षण जाहीर केले.

१९०४ : मुंबईला स्थलांतर व एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश.

१९०७ : भीमराव मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. त्यावेळी कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी आपले भगवान बुध्दाचे चरित्र भीमरावांना भेट दिले. त्यांचे कौतुक करण्यासाठी एका सभेचे आयोजन केले होते. याच वर्षी भीमरावांचा विवाह राणीबाई यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या रमाबाई झाल्या.

१९०८ : एल्फिन्स्टन कॉलेजात प्रिव्हियसच्या वर्गात प्रवेश.

१९११ : भीमरावांच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती देण्याचे वचन दिले.

१९१२ : डॉ. आंबेडकरांच्या यशवंत या मुलाचा जन्म. (१२ डिसेंबर)

१९१३ : आंबेडकर मुंबई विद्यापीठाची बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
- बडोदा संस्थानात अकाऊंटंट जनरलच्या कार्यालयात नोकरीवर रुजू (१५ जानेवारी)
- वडील आजारी असल्याने मुंबईकडे रवाना (१ फेब्रुवारी)
- सुभेदार रामजी संकपाळ यांचे निधन (२ फेब्रुवारी)
- अमेरिकेत उच्चशिक्षणासाठी बडोद्याच्या महाराजांनी वार्षिक २३० पौंडाची शिष्यवृत्ती मंजूर केली. १५ जून १९१४ ते १४ जून १९१६ अशी दोन वर्षांसाठी ही होती. न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात राज्यशास्त्र शाळेत प्रवेश.

१९१४ : कोलंबिया विद्यापीठात लाला लजपतराय यांच्याशी भेट.

१९१५ : कोलंबिया विद्यापीठात एम. ए. परीक्षा उत्तीर्ण. 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' हा शोधनिबंध सादर.

१९१६ : कोलंबिया विद्यापीठात 'कास्टस् इन इंडिया' हा विचार प्रवर्तक निबंध वाचला.
- द नॅशनल डिव्हींडट ऑफ इंडिया : 'ए हिस्टोरिकल ॲन्ड ॲनॅलिटिकल स्टडी' हा प्रबंध पीएच.डी. साठी कोलंबिया विद्यापीठाने स्वीकारला.

१९२० : छत्रपती शाहू महाराजांशी प्रत्यक्ष भेट व परिचय.
- मूकनायक पाक्षिकासाठी रु. २५००/- चे आर्थिक सहाय्य शाहू महाराजांनी केले.
- कोल्हापूर संस्थानात माणगाव येथे 'पहिली अस्पृश्यांची परिषद' शाहू महाराजांच्या पुढाकाराने व डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरली.

१९२२ : छत्रपती शाहू महाराजांचे निधन.
- लंडनच्या ग्रेज इन संस्थेच्या न्यायसभेने डॉ. आंबेडकरांना 'बार-ॲट-लॉ' ही उपाधी प्रदान.

१९२३ : डॉ. आंबेडकर लंडनहून भारतात परतले. मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसायास सुरुवात.

१९२६ : मद्रासच्या जस्टिस पार्टी मनुस्मृतीचे दहन केले.

१९२७ : डॉ. आंबेडकरांचा मुंबई विधिमंडळ सदस्य म्हणून शपथविधी.
- महाड चवदार तळे सत्याग्रह. 'बहिस्कृत भारत' हे पाक्षिक सुरु.
- मनुस्मृतीचे जाहिर दहन (२५ डिसेंबर)

१९२९ : काँग्रेसजनांनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा लाहोर येथे केली.

१९३० : नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली व दादासाहेब गायकवाड यांच्या पुढाकाराने सुरु.

१९३१ : मुंबईत मणीभवन येथे म. गांधी व डॉ. आंबेडकर यांची पहिली भेट.

१९३२ : पुणे करार- डॉ. आंबेडकर व काँग्रेसनेते यांच्यात झाला.

१९३५ : डॉ. आंबेडकरांच्या पत्नी रमाबाईंचे निधन.

१९३६ : स्वतंत्र्य मजूर पक्षाची मुंबई येथे स्थापना.

१९३९ : डॉ. आंबेडकर व पंडित नेहरु यांची पहिली भेट.

१९४० : डॉ. आंबेडकरांची नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भेट घेतली.

१९४६ : 'हू वेअर द शूद्राज' हा ग्रंथ डॉ. आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना अर्पण केला.
- भारतीय घटना समितीची पहिली बैठक झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची अध्यक्षपदी निवड.

१९४७ : भारत स्वतंत्र्य झाला.


१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्याशी डॉ. आंबेडकरांनी दिल्ली नोंदणी पध्दतीने विवाह केला. विवाहानंतर सविता नाव ठेवण्यात आले.

१९४९ : घटनेचा मसुदा समितीसमोर चर्चेसाठी ठेवला.
- २६ नोव्हें रोजी भारताची राज्यघटना स्वीकृत झाली.

१९५० : डॉ. राजेंद्रप्रसाद यांची भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.
- स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी शपथ घेतली.

१९५१ : डॉ. आंबेडकरांनी 'हिंदू कोड बील' लोकसभेत मांडले (५ फेब्रु.)
- 'हिंदू कोड बिल' फेटाळले गेले. (२६ सप्टेंबर)
- 'हिंदू कोड बिलाला' झालेल्या विरोधाचा निषेध म्हणून डॉ. आंबेडकरांनी पं. नेहरु यांच्या मंत्रिमंडळातील आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९५६ : भगवान बुध्द यांची २५०० वी जयंती साजरी.
- नागपूर दिक्षाभूमीवर बौध्द धम्माचा स्वीकार. (१५ ऑक्टो.)
- तिबेटचे धर्मगुरु दलाई लामा यांनी दिल्लीत गौरव केला. (२ डिसेंबर)
- डॉ. आंबेडकरांचे दिल्लीत २६, अलीपूर रोड या निवासस्थानी महापरिनिर्वाण (६ डिसेंबर)
- दादरच्या समुद्रकाठी अंत्यसंस्कार (७ डिसेंबर) (आताची चैत्यभूमी)



एप्रिल २०१७

अनुक्रमणिका



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

शेतकरी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

■ **अंक अकरावा** ■ **वर्ष ५१ वे**

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक.
घामाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन उत्कर्षाच्या वाटेवर...

- **प्रकाशक**
  श्री. विकास देशमुख, आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य
- **तांत्रिक मार्गदर्शन**
  डॉ. सु. ल. जाधव, कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
  श्री. विकास पाटील, कृषि सहसंचालक (वि. प्र. २)
- **संपादक** : श्री. व्ही. एन. देशमुख
- **सहाय्यक संपादक** : श्री. गजानन ननावरे
- **तांत्रिक सहाय्य**
  श्री. अशोक जानराव, तंत्र अधिकारी
  श्री. संतोष ढोबळे, कृषि अधिकारी व शेतकरी मासिक टीम
- **संपादन सहयोग** : फ्रेंड्स ऑफ फार्मर्स, पुणे
- **मुखपृष्ठ, मांडणी व सजावट** : सौ. सुखदा कुलकर्णी, पुणे
- **मुद्रण** : आनंद पब्लिकेशन, एनएच ६, मुसळीफाटा, जळगाव
- **संपर्क कार्यालये**
  जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी
  कृषि विकास अधिकारी, गटविकास अधिकारी
  तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी
- **कृषि विभागाचे संकेतस्थळ** : www.krishi.maharashtra.gov.in
- **महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ** : www.maharashtra.gov.in
- **केंद्र शासन कृषि व सहकार विभाग संकेतस्थळ** : www.agricoop.nic.in
- **ई-मेल** : agrishetkari@gmail.com

कृषि विभागाच्या वेबसाईटवर 'प्रकाशने' या शीर्षकाखाली मासिक दरमहा उपलब्ध केले जाते. तसेच अँड्रॉइड ॲपद्वारे मोबाईलवर सुद्धा उपलब्ध.

- **किसान कॉल सेंटर टोल फ्री दूरध्वनी** : १८००-१८०१५५१
- **कृषि विभाग टोल फ्री दूरध्वनी** : १८००-२३३४०००
- **वार्षिक वर्गणी** : रु. २५०/- आणि **द्विवार्षिक वर्गणी** : रु. ५००/-
- **पत्रव्यवहार व वर्गणीसाठी पत्ता** :
  संपादक : शेतकरी मासिक, कृषि आयुक्तालय, कृषिभवन, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
- **टेलिफॅक्स क्रमांक** : ०२०-२५५३७३३१
  या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, जाहिरात व अन्य कोणत्याही मजकूराशी कृषि विभाग सहमत असेलच असे नाही. अंकातील काही छायाचित्रे प्रातिनिधीक स्वरूपाची आहेत.
- **वर्गणीदारांसाठी निवेदन** : शेतकरी मासिक वर्गणी आता ऑनलाईन पद्धतीने gras.mahakosh.gov.in या कार्यप्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. माहितीसाठी ०२०-२५५३७३३१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

संपादकीय

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताच्या उभारणीतील योगदान ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारे ठरले आहे. डॉ. आंबेडकर यांना राज्यघटनेचे शिल्पकार, द्रष्टे नेते, वंचित घटकांना न्याय मिळवून देणारे क्रांतिकारक, अर्थतज्ज्ञ, प्रज्ञासूर्य, सम्यक विचारवंत आदी कार्यामुळे त्यांना ओळखले जात असले तरी देशाच्या जल, विद्युत आणि कृषिक्षेत्रात, शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी दिलेले त्यांचे योगदान अतुलनीय आहे.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२६वी जयंती साजरी होत आहे. त्यानिमित्ताने शेतकरी मासिकाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषि, जल, विद्युत क्षेत्रातील योगदान या विषयावरील एप्रिल महिन्याचा विशेषांक आपल्या हाती देण्यास आम्हाला आनंद होत आहे. या विशेषांकासाठी विविध संदर्भ व तपशील उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच विशेषांकाच्या मांडणीमधील योगदानाबाबत मा. श्री. अशोक लोखंडे, विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे यांचे विशेष आभार. त्याचबरोबर विविध मान्यवरांनीही या विशेषांकासाठी लेख उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सन १९२८ पासून सुरुवात केली होती. त्यांनी खोती पद्धतीविरुद्ध लढा दिला. शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांवर त्यांनी आवाज उठवला होता. त्याअनुषंगाने व डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक कार्य आणि विचार तसेच त्यांचे विविध पैलु या संदर्भातील लेखांचा समावेश या विशेषांकामध्ये केला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन...!

व्ही. एन. देशमुख



सत्यमेव जयते

मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

।। शुभेच्छा ।।

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातर्फे प्रकाशित करण्यात येणारे 'शेतकरी मासिक' राज्यातील शेतकऱ्यांसाठी कायमच मार्गदर्शक ठरले असून एप्रिल-२०१७ चा अंक 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक' म्हणून प्रसिध्द होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या जडण घडणीतील योगदान हे ऐतिहासिक असून त्यांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक आदी विषयांवरील विचार हे पथदर्शी आहेत. कृषिविषयक सुधारणा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनी मांडलेले विचार आजही महत्त्वपूर्ण आहेत. त्यासोबतच केंद्रिय मंत्रिमंडळात असताना पाणी आणि विजेच्या नियोजनाबाबत त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. बाबासाहेबांनी देशाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पाहिले आणि ते साकारण्यासाठी निष्ठेने प्रयत्न केले. त्यामध्ये विविध तांत्रिक संस्थांची निर्मिती, जलसंसाधनाचे संवर्धन, दामोदर नदीखोरे प्रकल्प, महानदी खोरेविकास प्रकल्पांतर्गत हिराकूड धरणाची निर्मिती, सोननदी प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प, नदी खोरेविकास, सिंचन व विद्युत शक्ती तसेच आंतरराज्यीय नद्यांचे जाळे इत्यादी संदर्भातील त्यांची भूमिका व धोरण उल्लेखनीय आहे. या सर्व प्रकल्पांसह त्यांनी आखलेल्या धोरणाचा देशातील शेतीच्या विकासासाठी मोठा फायदा झाला. बाबासाहेबांच्या या कर्तृत्वाचे दर्शन 'शेतकरी'च्या विशेषांकातून घडेल, असा विश्वास वाटतो.

शेतकरी मासिकाच्या सर्व उपक्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा.!

देवेंद्र फडणवीस



मंत्री महाराष्ट्र राज्य

मंत्री
कृषि व फलोत्पादन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०००३२

।। शुभेच्छा ।।

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्ताने शेतकरी मासिकाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक' प्रसिध्द होत असल्याचे समजुन मनापासून आनंद झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ञ, शोषित-पिडीत समाजाचे नेते, बुध्द-धम्माचे अनुवर्तक तसेच स्त्रियांच्या व कामगारांच्या हक्कांसाठी लढणारे नेते म्हणून ओळखत असले तरी कृषि विषयक समस्यांबाबत आणि शेतकऱ्यांच्या हक्कांबाबतही त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे.

सन १९४२ ते १९४६ या कालावधीत ते भारत सरकारात मंत्री म्हणून कार्यरत असताना पाण्याचा वापर, पूराचे नियंत्रण, धरणांची निर्मिती, जलविद्युत प्रकल्पांची निर्मिती, वितरण व वापर यासंदर्भात त्यांनी भरीव कार्य केले. तसेच दामोदर नदी- खोरे प्राधिकरण स्थापन करुन त्यांनी खोऱ्यातील पाण्याचे एकात्मिक आणि सर्वंकष नियोजन केले.

शेती हे केवळ पोट भरण्याचे साधन नाही, तर ते राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन असल्याचे बाबासाहेबांनी स्पष्ट केले. 'भारतातील लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या सन १९१८ मध्ये प्रसिध्द झालेल्या लेखामध्ये डॉ. आंबेडकरांनी भारताच्या शेती प्रश्नांसंदर्भात अत्यंत मुलभूत अशा प्रकारचे भाष्य केले. त्यानंतरच्या काळात भारतात शेतीक्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण व गुणात्मक बदल झाले. अशा प्रकारे विविध क्षेत्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान व विचारांचे पैलू आपणास सतत मार्गदर्शक ठरत आहेत. महामानवाच्या स्मृतीस वंदन करुन मी शेतकरी मासिकाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकास' हार्दिक शुभेच्छा देतो!

पांडुरंग फुंडकर



राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

राज्यमंत्री
कृषि व फलोत्पादन,पणन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०००३२

।। शुभेच्छा ।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर सामाजिक क्रांतिकारक होते. भारतातील महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समान न्याय व हक्क मिळाला पाहिजे यासाठी ते आग्रही होते. बाबासाहेबांचे सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील कार्य बहुमोल असे आहे. याबरोबरच कृषि क्षेत्रातील समस्या सोडविणे व शेतकऱ्यांच्या न्यायाबाबत ते नेहमी आग्रही असत. इतर देशांच्या तुलनेत भारतातील शेतीवरील लोकसंख्येच्या बोजाचा विचार करता हा बोजा इतर उद्योगधंद्यात वळविण्याचा विचार त्यांनी मांडला. तसेच भांडवल व साधने शेतकऱ्यांना उपलब्ध करून उत्पादन खर्चाच्या आधारावर शेतीमालाची किंमत ठरविली जावी हा विचारसुध्दा बाबासाहेबांनीच विसाव्या शतकाच्या सुरवातीस मांडला. अशा प्रकारे शेती व शेतकरी संदर्भातसुध्दा त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारताच्या सर्व नागरीकांना न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधूता यासंबंधी भरवसा व हमी या घटनेद्वारे देण्यात आली आहे. आपल्या देशाची राज्यघटना जगात श्रेष्ठ समजली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य बहुआयामी असे आहे. त्यांच्या कृषि व विविध क्षेत्रातील कार्यास उजाळा देण्याच्या दृष्टिकानोतून प्रसिध्द होत असलेल्या शेतकरी मासिकाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकास' माझ्या हार्दिक शुभेच्छा !!!

सदाभाऊ खोत



प्रधान सचिव
कृषि व फलोत्पादन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०००३२

।। शुभसंदेश ।।

भारत सर्वात मोठा लोकशाहीचा देश म्हणून जगभरात ओळखला जातो. त्याचबरोबर कृषिप्रधान देश म्हणून सुध्दा ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्था ही बऱ्यापैकी शेतीवर अवलंबून आहे. यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे हीत साधणाऱ्या विविध उपाययोजनांसंदर्भात मार्गदर्शन १०० वर्षांपूर्वीच केले आहे. डॉ. बाबासाहेब हे जागतिककिर्तीचे विद्वान, कायदेतज्ञ, संशोधक, थोर अर्थतज्ज्ञ तसेच अत्यंत अभ्यासू शेतीतज्ज्ञही होते.

सावकारी व खोती पध्दत ही शेतकऱ्यांच्या विकासाला अडचण ठरणारी गोष्ट आहे, हे जाणून त्यांनी 'कसेल त्याची शेती' या न्यायाने भरमसाठ जमीन ताब्यात ठेवणाऱ्या खोती पध्दतीविरोधात आंदोलने केली व ती पध्दत बंद करुन खोतांच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता केली. अनादिकाळापासून चालत आलेली शेती ही प्राथमिक अत्यावश्यक इंडस्ट्री असून मुख्य इंडस्ट्री म्हणून ती जगवीणे, वृध्दींगत करणे हे प्रश्न मानवी समाजाने गांभिर्याने विचार करुन शेती कशी किफायतशीर होईल हे पाहिले पाहिजे, असे त्यांचे मत होते.

याचाच एक भाग म्हणून कृषि विभाग कृषि क्षेत्रातील उत्पादन खर्च कमी करण्याबरोबरच जमीन आरोग्य सुधारणा, विविध अभियाने, सूक्ष्म सिंचन व सेंद्रिय शेतीस चालना देणे, कोरडवाहू क्षेत्रविकास कार्यक्रमाव्दारे खेड्यांचा एकात्मिक विकास, फळे व भाजीपाला प्रक्रिया , कृषिमालाच्या निर्यातीस चालना, सार्वजनिक, खाजगी भागीदारीने कृषि व कृषि पूरक व्यवसायास चालना, शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन देणे, विशेष घटक योजना, अनुसूचित जातींच्या शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना इत्यादी योजना व उपक्रमांव्दारे केंद्र व राज्य शासनाकडून शेतीक्षेत्रास प्रोत्साहन देण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त प्रसिध्द होणाऱ्या या विशेषांकास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

विजयकुमार



आयुक्त कृषि

महाराष्ट्र राज्य, पुणे

मनोगत

राज्याचा आगामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प नुकताच विधिमंडळात सादर झाला. राज्याला गुंतवणुकीचे क्षेत्र बनवून सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रामुख्याने कृषि विभागाच्या योजनांसाठी तसेच जलयुक्त शिवार योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात अशा अनेक शेतीआधारित योजनांवर आणि कृषि विकासावर भर देण्यात आला आहे.

राज्यात २०६५ महसूल मंडळस्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात येणार असून हवामान विषयक माहिती गोळा करण्याकरिता 'महावेध' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पाव्दारे प्राप्त होणाऱ्या हवामान विषयक माहितीचा मुख्यत: शेतकऱ्यांना कृषि विषयक सल्ला, पीक विमा योजना, कृषि व हवामान क्षेत्रात संशोधनासाठी आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी उपयोग होणार आहे.

राज्यात मत्स्यव्यवसायाचा एकात्मिक विकास करण्यासाठी तसेच प्रभावी व्यवस्थापनासह उत्पादनात दुपटीने वाढ करण्यासाठी केंद्र शासनाने नीलक्रांती धोरण निश्चित केले आहे. या धोरणांतर्गत निश्चित अर्थसहाय्याच्या विविध योजना राज्यात राबविण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसायास चालना मिळणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषि, जल आणि विद्युत क्षेत्रातील दिलेल्या योगदानावर एप्रिल महिन्याच्या 'शेतकरी' च्या विशेषांकाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला आहे. तरी या माहितीचा शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन...!

आपला स्नेहांकित

विकास देशमुख

उन्नत शेती - समृध्द शेतकरी

राज्यातील सर्व शेतकरी बंधू व भगिनींना मराठी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

आपण शेतकरी गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर पुढील वर्षाच्या शेतीचे नियोजन सुरु करतो, त्याप्रमाणे शासनाने सुध्दा पुढील खरीप हंगामाच्या व वर्षाच्या शेती कामाचे नियोजन केले असून त्याच्या अंमलबजावणीची सुरुवात पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरु केली आहे.

'या वर्षात घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या उत्पादन खर्चापेक्षा अधिक तसेच, या पिकांसाठी घेतलेल्या पीक कर्जापेक्षा अधिक उत्पन्न राज्यातील शेतकऱ्याला खात्रीशीरपणे मिळावे' हा या वर्षीच्या शासनाच्या कृषिविषयक नियोजनाचा गाभा आहे. या वर्षापासून कृषि विकास व उत्पादन वाढीसाठी तालुका हा विकास घटक ठरवून नियोजन करण्यात आले आहे. हवामान विभागाकडून प्राप्त प्राथमिक माहितीनुसार चालु वर्षी सुध्दा समाधानकारक पाऊसमान राहण्याची शक्यता आहे, त्यादृष्टीने आपण सर्वांनी कामाला लागणे गरजेचे आहे.

शासनाने खरीप हंगामामध्ये लागणारे उत्तम प्रकारचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे नियोजन केलेले आहे. एवढेच नव्हे तर पुढील **५ वर्षांचा बियाणे पुरवठ्याचा आराखडा** देखील तयार केलेला आहे. तसेच मागील वर्षी प्रमाणेच खतांचा शेतकऱ्यांना मुबलक पुरवठा वेळेत होईल याबाबतही नियोजन केलेले आहे. दर्जेदार कंपन्यांची कीटकनाशके, शासकीय प्रयोगशाळेतून जैविक द्रवरुप खते व जैविक कीटकनाशकांच्या पुरवठ्याचे नियोजन केले आहे. राज्य शासनाच्या शेतकऱ्यांच्या सेवेसाठी असलेल्या कृषि विभागासह सर्व कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र आणि सर्व संशोधन संस्था यांनी त्यांच्याकडील कामांचे नियोजन केलेले आहे.

कृषि विभागामार्फत शेतकरी कल्याणाच्या सर्व योजनांच्या अंमलबजावणीची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. शेतकरी बांधवाना खरीपपूर्व मशागतीची व पेरणीची कामे वेळेत पूर्ण करणे शक्य व्हावे तसेच, शेतीतील बैलांची कमी झालेली संख्या व ऐन हंगामात निर्माण होणारी मजुरांची टंचाई यावर मात करुन पिकांच्या काढणीपर्यंतची कामे सुकरपणे करणे शक्य व्हावे म्हणून कृषि विभाग चालू वर्षी **कृषि यांत्रिकीकरणाची मोहिम** हाती घेत आहे. या मोहिमेत शेतकऱ्यांना ४ बैलांचे काम करु शकणारे छोटे ट्रॅक्टर, पॉवर टिलर, रोटाव्हेटर, पेरणी यंत्र, थ्रेशर तसेच भातासाठी ट्रान्सप्लांटर, रिपर, ऊसासाठी पाचटकुट्टी यंत्र, फळबागेसाठी स्प्रेअर, मिस्ट ब्लोअर इ. यंत्र खरेदीसाठी वर्षाच्या सुरुवातीपासून शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे. ही यंत्रे शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीने खरेदी करण्याची मुभा शासन देणार आहे आणि त्याचे अनुदान शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात शासन जमा करेल.

चालू वर्षी संपूर्ण 'रोहिणी' नक्षत्रातील १५ दिवस कृषि विभाग **''उन्नत शेती- समृध्द शेतकरी पंधरवाडा''** साजरा करणार आहे. या पंधरवड्यात सर्व कृषि शास्त्रज्ञ व कृषि विभागाचे अधिकारी- कर्मचारी गावोगावी जावून आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करतील तसेच शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देतील. या वर्षात राज्यातील सुमारे २ लाख शेतकऱ्यांना विविध पिकांच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात येईल.

शासनाने राज्यातील शेत जमिनींची आरोग्य पत्रिका तयार करुन शेतकऱ्यांना वितरीत केल्या आहेत. सदर आरोग्य पत्रिकांच्याआधारे आपण आपल्या जमिनीत घेणाऱ्या पिकांकरिता आवश्यक मात्रेतच खते द्यावीत व उत्पादन खर्चामधे बचत करावी. जमिन आरोग्य पत्रिकेच्याआधारे पिकांना आवश्यक असलेल्या खतांची मात्रा जाणून घेण्यासाठी आपण आपल्या गावातील कृषि सहाय्यकांची मदत अवश्य घ्यावी.

कृषि विभाग नवीन वर्षामध्ये गाव पातळीवर १० हेक्टर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणार आहे. यामध्ये शेतकरी गटास प्राधान्य देण्यात येणार असून या शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण शास्त्रज्ञांमार्फत देण्यात येणार आहे. या प्रात्यक्षिकांसाठी लागणारी खते, बियाणे, औषधी याची खरेदी शेतकऱ्यांनीच करावयाची आहे आणि त्याचे अनुदान शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात शासन जमा करेल. नवीन वर्षात **ठिबक सिंचन** योजनेच्या निधीमध्ये भरीव वाढ केली जाणार आहे तसेच एप्रिल महिन्यापासून डिसेंबरपर्यंत शेतकऱ्यांना अर्ज करण्याची सुविधा दिली जाईल. त्याचबरोबर, पात्र लाभार्थ्यांना तातडीने पूर्वसंमती देण्यात येईल, जेणेकरुन शेतकऱ्यांना पीक लागवडीपासूनच ठिबक सिंचन संच बसविणे शक्य होईल. शासन ठिबक सिंचन संचाच्या अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करेल.

राज्यातील शेतकऱ्यांची **कांदा चाळ** उभारणीकरीता असलेली मोठी मागणी लक्षात घेऊन मागील वर्षात शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला होता आणि या वर्षात देखील शासनाने कांदा चाळीसाठी भरीव तरतूद केली आहे. या माध्यमातून २ लाख मे.टन कांदा साठवणूकक्षमता निर्माण करण्यासाठी ८ हजार कांदा चाळींची उभारणी करण्याचे नियोजन आहे व त्याकरीता शासन शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदान देईल.

राज्यातील ऊसाची उत्पादकता वाढविण्यासाठी ऊसाच्या सुधारित वाणांची लागवड करण्याच्या दृष्टीने रोपांपासून ऊसाची लागवड करण्याच्या तंत्रज्ञानास प्रोत्साहन देणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर शेडनेटमध्ये **ऊसाची रोपवाटिका** तयार करण्याकरीता अनुदान देण्यात येईल. शेतकऱ्यांना कमी नैसर्गिक साधनसामग्रीमध्ये जास्तीतजास्त उत्पादन घेणे शक्य व्हावे म्हणून **शेडनेट व हरितगृह** उभारण्याकरीता शासन मागील वर्षी प्रमाणेच या वर्षात देखील भरीव निधी उपलब्ध करुन देईल. त्याचप्रमाणे शासन फलोत्पादनासाठी देखील मोठे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देईल.

त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना **शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया** करुन मूल्यवर्धितमाल बाजारपेठेत विक्रीस नेणे शक्य व्हावे म्हणून शेतकऱ्यांना प्राथमिक प्रक्रिया युनिट उभारण्याकरीता अर्थसहाय्य करण्याची नवीन योजना कृषि विभाग चालू वर्षीपासून सुरु करणार असून त्याचा शेतकरी बांधवांनी जरुर लाभ घ्यावा.

मागील वर्षामध्ये आपण शेतकरी बांधवांनी **प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत व हवामान आधारित फळबाग विमा** योजनेंतर्गत भरघोस सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे आणि अन्य करणांनी झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना विमा रकमेच्या स्वरुपात भरपाई मिळाली आहे. शासनाने सुरु केलेली ही पीक विमा योजना शेतकऱ्यांची कवचकुंडले आहेत. या विमा योजनेव्दारे निसर्गाने साथ न दिल्यास शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीची हमखास भरपाई मिळण्याची शासनाने व्यवस्था केली असल्याने शेतकऱ्यांनी चालू नवीन वर्षात पीक विमा योजनांमध्ये विक्रमी सहभाग नोंदवावा , असे मी आपणास आवाहन करतो आहे.

शेतकऱ्यांच्या शेतावर ठिबक सिंचन, ट्रॅक्टर, आधुनिक अवजारे, कांदा चाळी, शेडनेट, विहिरी, पंप इ. पायाभूत सुविधा निर्माण करुन शेतकऱ्यांना आधुनिक शेती करता यावी व त्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ व्हावी ही शासनाची भूमिका असून त्याकरीता या वर्षात शेतकऱ्यांना शासन मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य पुरविणार आहे. शासनाचे सदर अनुदान थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर देण्याचे नियोजन आम्ही केले असून त्याकरीता माझी सर्व शेतकरी बांधवांना नम्र विनंती आहे की, आपण आपल्या बँकेशी संपर्क साधून आपले बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करुन घ्यावे तसेच ज्या शेतकऱ्यांकडे आधार कार्ड नसतील त्यांनी तातडीने नजीकच्या सेवा केंद्रातून आपले आधार कार्ड काढून घ्यावे.


मी आपणास पुन:श्च मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतो आणि माझ्या राज्यातील बळीराजाला सुखाचे, समाधानाचे व भरभराटीचे दिवस येवोत, अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करतो !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

पांडूरंग फुंडकर

कृषि व फलोत्पादन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२



भारतातील पाण्याचे आणि विजेचे केलेले नियोजन

डॉ. सुखदेव थोरात, अध्यक्ष, भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद, मनुष्यबळ विकास मंत्रालय, जेएनयु इन्स्टिट्यूशनल एरिया, अरुणा असफ अली रोड, नवी दिल्ली

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खूप मोठे योगदान आहे. त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. अर्थतज्ज्ञ, शोषित, पिडीत समाजाचे नेते, बुद्ध धम्माचे अनुवर्तक, स्त्रियांच्या, कामगारांच्या हक्कासाठी लढणारे म्हणून ओळखत असले तरी डॉ. आंबेडकरांचा भारतातील नदी, पाण्याचे नियोजन, वापर आणि वीजनिर्मिती यासंबंधी अत्यंत मोलाचा सहभाग आहे.

बाबासाहेबांची दूरदृष्टी ही असामान्य होती. त्यांना राजकारण, अर्थकारण आणि राज्यघटनेसंबंधी प्रगाढ ज्ञान होते. सन १९४२ ते १९४६ या कालावधीत त्यांनी त्यांच्या अफाट ज्ञानाचा उपयोग भारताच्या प्रगतीसाठी केलेला दिसून येतो. पाण्याच्या बाबतीत जशी देशपातळीवर एकवाक्यता नव्हती, निर्णय घेणारी संस्था नव्हती, राज्यांना मार्गदर्शन करणारे कोणी नव्हते, तशीच परिस्थिती विद्युत क्षेत्रात होती. विद्युत निर्मिती, तिचे वितरण, तिचा वापर इत्यादी प्रश्नासंबंधी समन्वय साधणारी केंद्रीय तांत्रिक संस्था नव्हती. बाबासाहेबांनी याही क्षेत्रात अशी संस्था निर्माण करण्याचा वसा घेतला.

सन १९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. आंबेडकर हे भारत सरकारात मंत्री म्हणून कार्यरत होते. या काळात पाण्याच्या वापर, पुराचे नियंत्रण, धरणांची निर्मिती, जलविद्युत प्रकल्पाची निर्मिती ही सर्व जबाबदारी बाबासाहेबांवर आली होती. भविष्यातील भारताविषयी डॉ. बाबासाहेब चिंतीत होते. बरेच आराखडे त्यांनी कार्यान्वित केले. या लेखाद्वारे डॉ. बाबासाहेबांच्या पाणी आणि वीजनिर्मितीच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

कामगार विभागाची स्थापना

नोव्हेंबर १९३७ मध्ये मजुरांच्या समस्या जाणून घेण्यासाठी एक स्वतंत्र विभाग केला. पाटबंधारे, विद्युत आणि त्यासंबंधीत इतर लोकोपयोगी कामेसुद्धा या नवीन विभागाच्या अखत्यारीत आलीत. सन १९४२ च्या अगोदर संपूर्ण भारतातील पाण्याचे नियोजन करून मोठ्या पाटबंधारे, जलविद्युत विभागाची सर्व जबाबदारी स्वीकारली. भारतातील पाण्याचे संपूर्ण नियोजन, पाण्याचा वापर, सर्व राज्यातील पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प हा त्यावेळी भारतासाठी एक अत्यंत आवश्यक प्रकल्प होता. भारताची आर्थिक परिस्थिती त्यावेळी बळकट करायचे एक ध्येय्य होते. महायुद्धानंतर भारताला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी हा प्रकल्प मोलाची भूमिका वटविणार होता. कामगार विभागाने अखिल भारतीय पाटबंधारे आणि जलवाहतूक विभागाच्या विकासाचे कार्य हाती घेतले. असे पहिल्यांदाच घडले होते.

केंद्र सरकारने पाणी आणि वीज या मूलभूत गरजांच्या विकासासाठी पुढीलप्रमाणे कार्य हाती घेतले...

अ) भारतातील पाण्याचे संपूर्ण नियोजन, पाण्याचा वापर तसेच जलविद्युत प्रकल्प.

ब) पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्पाचे कार्य वेगात करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन करणारी एक समिती तयार केली.

क) संपूर्ण देशातील पाण्याचे व्यवस्थापन, वाटप व वापर करण्यासंबंधी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे त्यावेळी अस्तित्वात नव्हती. राज्यांमधील नद्यांद्वारे जलनिती उपयोगात आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.



हिराकुड धरण : या प्रकल्पाचे प्रारूप डॉ. आंबेडकर यांनी तयार केले.

ड) राष्ट्रीय जलनिती आणि नद्या व जल खोरे यातून पाण्याचे नियोजन याची आपल्या देशाला आवश्यकता असल्याचे स्पष्टपणे नमूद केले.
इ) काही लहान मोठ्या नदी खोऱ्यांचे प्रकल्प यात दामोदर खोरे योजना, सोने नदी खोरे, ओरिसा नदी खोरे, शिवाय महानदी आणि चंबल नदीचाही समावेश होता.

पाण्याचे आणि आर्थिक नियोजन

महायुद्धानंतर संपूर्ण जगाचे आर्थिक नियोजन ढासळले होते. भारतावरही त्याचा दूरगामी परिणाम दिसत होता. भारताच्या केंद्रातील सरकारने भारतात शांतता स्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. भारताव्यतिरिक्त युरोप आणि आशियातील दुसऱ्या देशाची परिस्थिती अजून वेगळी होती. भारताचे अर्थकारण बळकट करण्यासाठी दूरगामी विचार करून विविध प्रकल्पांचे निर्माण आणि विकास कार्य हाती घेणे गरजेचे होते. भारत सरकारने भारताच्या अर्थकारणाची पुनर्निर्मिती करण्यासाठी विविध नियोजन हाती घेतले. त्याचबरोबर देशातील विविध राजकीय पक्ष आणि समूहांनी त्यात सहभाग घेण्याची इच्छा नोंदविली. अर्थकारणाचा एक आराखडा तयार करून केंद्र सरकारकडे पाठविला. जवाहरलाल नेहरू आणि मेघनाद साहा हे दोघे सदस्य असलेल्या नॅशनल प्लॅनिंग कमिटीने आराखडा तयार करण्यात जे.आर.डी. टाटा यांचाही सहभाग होता. भारताचे अर्थकारण मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून इतरही काही नियोजन/धोरण तयार करण्यात आले.

पुढील पंधरा ते पंचवीस वर्षापर्यंतचे नियोजन भारत सरकारने व्ही.के. आर.व्ही. राव, डी.आर. गाडगीळ, सी.एन. वकील आणि पी.एस. लोकनाथन या भारताच्या चार अर्थतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले. सरकारने पाच समित्या नियुक्त केल्या. समितीचे नाव 'आरसीसी' दिले. व्हाईसरॉय हे अध्यक्ष होते आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्य या समितीचे सदस्य होते. प्रत्येक समितीवर एक धोरण समिती नेमलेली होती. या धोरण समितीमध्ये त्या विभागाचे सचिव, वित्त आणि व्यापार समूहाचे प्रतिनिधी होते. धोरण समितीकडून आलेले निर्णय आरसीसीकडे मंजुरीसाठी दिले जात. जे काही निर्णय घेतले जातील ते भारताच्या प्रगतीला पूरक असावे, असा त्याचा हेतू होता.

योजनेची उद्दिष्ट्ये

१) लोकांना काम मिळायला हवे आणि यातून त्यांची जीवनशक्ती उंचावली जावी.
२) मिळालेला लाभ सर्वांमध्ये समान विभागला जावा. भारतीय जनतेची क्रयशक्ती वाढायला हवी. त्यासाठी कृषि, उद्योग यांना चालना मिळायला हवी. उत्पादन वाढायला हवे. भारत एक कृषिप्रधान देश आहे. परंतु कृषि सोबतच औद्योगिक प्रगती व्हायला हवी.

पुनर्निर्माणाच्या योजनेचे मुख्य काम पुढीलप्रमाणे होते

१) सैन्यात नवीन भरती व्हावी. सोबतच जुन्या सैनिकांत काही बदल करण्यात यावेत.
२) शांतता प्रस्थापित व्हावी.
३) जे शांती भंग करणार त्यांच्याविरुद्ध कारवाई व्हावी.

दूरगामी फायद्याचे प्रकल्प म्हणजे आर्थिक विकास, १५ ते २५ वार्षिक योजना- यात प्रामुख्याने...

१) कृषिसंबंधी विकास, पाटबंधारे प्रकल्पाचा विकास
२) जलविद्युत प्रकल्प, वीजनिर्मिती तसेच गावागावात उद्योगांची वाढ
३) छोट्या उद्योगांना वाढविण्याचे प्रयत्न
४) शहरे व गावांना जोडणारे रस्ते आणि दळणवळणाची साधने वाढविण्याचे प्रयत्न

डॉ. आंबेडकरांनी पाटबंधारे आणि विद्युत विभागाचा कार्यभार मंत्री म्हणून सन १९४२ ते १९४६ या कालावधीत सांभाळला होता. त्यामुळे पाण्याच्या प्रश्नांची गुंतागुंत, प्रश्नांची पुरेपूर ओळख त्यांना झाली होती.

सन १९४६ मध्ये ते भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर आणि आरसीसीचे सदस्य झाल्यानंतर भारताची राज्यघटना तयार करताना पाण्याच्या प्रश्नासंबंधीचे त्यांचे हे ज्ञान त्यांना उपयोगी पडणारे ठरले. भारताचे पाण्याविषयीचे भविष्य उज्वल ठरविताना या कामी यश येऊन पाण्यासंबंधीची संविधानिक तरतूद देशाला हितकारक ठरावी, असा प्रयत्न त्यांनी संविधान तयार करताना केल्याचे आपल्या निर्दशनास येते.

डॉ. आंबेडकर अध्यक्ष असलेल्या धोरण समितीने आणि अधिकृत समितीने पुढीलप्रमाणे चार अहवाल तयार केले.

१) युद्धानंतर विस्कळीत झालेल्या योजनांची आणि अर्थव्यवस्थेची पुनर्निर्मिती
२) मजूर, पाटबंधारे आणि ऊर्जा
३) एक विषयबद्ध योजना
४) सर्वसाधारण प्रश्नांवर एक धोरण जसे-
- पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्पांची राज्य विरुद्ध खासगी मालकी
- राज्यांच्या अंतर्गत येणाऱ्या केंद्राच्या जागासंबंधी

सन १९३५ मधील नियमांनुसार पाटबंधारे आणि वीज हे दोन्ही विभाग सरकारच्या अखत्यारीत असताना मजूर विभागाचे काम अतिशय कठीण होते. त्यासाठी आरसीसी समितीने स्पष्ट केले की, जर पाणी, वीज आणि उद्योगांची उत्तम प्रगती हवी असेल तर अखिल भारतीय नियम लागू केला जावा. एक समान धोरण तयार केले जावे, ते सर्वांनाच लागू व्हावे.

पाणी आणि वीज धोरण अहवाल

कामगार विभागाकडे दोन पर्याय उपलब्ध होते. एक म्हणजे धोरण अहवालाचा एक मसुदा तयार करून तो सर्वांकडे फिरवावा. त्यांचा फिडबॅक घेऊन नंतर एक अंतिम धोरण अहवाल तयार करावा. दुसरे एक ऑल इंडिया पॉलिसी स्टेटमेंट तयार करून ते सरळ आरसीसीकडे पाठवून द्यावे. पहिला पर्याय योग्य होता. धोरण अहवालाची एक मार्गदर्शिका तयार करून ती प्रतिसादासाठी पाठवून दिली. कामगार विभागाकडून एक धोरण अहवाल बनवीत तो पाटबंधारे, पाणी नियोजन, नाली नियोजन, जलविद्युत निर्मिती आणि विकास या संबंधात मत जाणून घेण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठवून दिला.

पाटबंधारे, जलस्रोत आणि पाण्याचा निचरा

देशातील कृषि आणि उद्योगांचा विकास करायचा असेल तर, आधी पाणी नियोजन आणि जल प्रकल्पांचा विकास व्हायला हवा, असे धोरण अहवाल म्हणतो. भारतातील मातीत जर मुबलक पीक आले आणि जलस्रोतात भरपूर पाणी असेल तर भारतीय जनतेच्या या दोन गरजा पूर्ण होतात. नैसर्गिक आपत्तीपासून बचाव केला तरच भारतीय जनतेची आणि भारताची भरभराट होऊ शकेल. जमिनीला अधिक सुपीक करण्यासाठी पाण्याचे साठे उपलब्ध व्हायला हवे. शेतीसाठी तलाव, विहिरींची गरज आहे. ज्यामुळे शेतीसाठी आवश्यक असलेले पाणी मिळू शकेल.

धोरण अहवालाप्रमाणे...

१) केंद्र सरकारने राज्य सरकारला आवश्यक असलेली मदत पुरवून उद्योगांच्या वाढीसाठी प्रयत्न करावा.

२) केंद्र सरकारने काही प्रकल्प उभारणीसाठी सर्व प्रकारची मदत करावी. आर्थिक मदत सुद्धा करावी.

३) राज्यातील अभियंत्यांनी बनविलेल्या धोरण आणि प्रस्तावावर केंद्र सरकारने शहानिशा करून विचार करावा. पाणी प्रश्नावर एका अभियंत्याची विकास अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

४) केंद्रीय सिंचन मंडळाने पाणी, ड्रेनेज आणि इतरही समस्यांसाठी काम करावे.

अंतर्गत जल वाहतूक (इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट) साठी पॉलिसी स्टेटमेंटने खालील योजना सांगितलेल्या आहेत.

१) नद्या आणि इतर जलस्रोतांचा विकास

२) सिंचन कालव्यांचा अंतर्गत जलवाहतूक उद्योग

३) नवीन कृत्रिम जलरस्त्यांचे बांधकाम

४) स्टिमर, टग, पॉवरवर चालणाऱ्या मोठमोठ्या सपाट नावा यांचा वापर वाढवावा.

५) देशातील क्राफ्टचा विकास

६) सर्व प्रकारच्या दळणवळणाचे परस्पर नियोजन

विद्युत ऊर्जा विकास

धोरण अहवालामध्ये सर्वप्रथम विद्युत ऊर्जा विकास अधोरेखित केला आहे.

१) या धोरणाप्रमाणे सरकारने अजून जास्त क्षमतेची साधने बनविण्यासाठी काही धोरण बनवावे. यासाठी सेंट्रल टेक्निकल पॉवर बोर्ड मदत करेल. शेतीकामासाठी लागणारी खते बनविण्याचे काम सुद्धा विद्युतशक्तीने करणे शक्य आहे.

२) या कामासाठी भारताने विदेशातील तज्ज्ञ तसेच व्यावसायिक, प्रशासनिक आणि तांत्रिक स्टाफ बोलवावा.

न्यू वॉटर पॉलिसी : तीन नवीन आयाम

पाण्याचे हे नियोजन/व्यवस्थापन करताना स्थानिक दृष्टिकोनासोबतच राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवून नियोजन झाले पाहिजे व त्यासाठी राष्ट्रीय जलनिती अस्तित्वात असली पाहिजे. असे सन १९३५ च्या कायद्यानुसार ठरले. केंद्राने हेही स्पष्ट केले की, ते स्वतःचे आराखडे यात टाकणार नाही. पाण्याचे नियोजन प्रकल्पनिहाय न करता नदीचे खोरे एक घटक समजून नियोजन केले पाहिजे आणि प्रकल्प बहुद्देशीय असला पाहिजे. ज्यात सिंचन, पूरनियंत्रण, विद्युतनिर्मिती, पिण्याचे पाणी, नौकानयन इत्यादी बाबींचा अंतर्भाव असला पाहिजे आणि हे नियोजन एकिकृत आणि बहुआयामी असले पाहिजे.

कामगार विभागाचे कार्य

१) नद्यांवरील प्रकल्पांचे उत्तम नियोजन करणे.

२) आंतरराष्ट्रीय नद्यांवरील पाणी आणि जलविद्युत प्रकल्प तयार करणे.

३) आंतरराष्ट्रीय नद्यांचे वाद सोडविण्यास केंद्र शासनाने पुढाकार घेतला पाहिजे आणि आवश्यक तेथे कठोर निर्णय घेऊन कायदे केले पाहिजे.

धोरण आराखडा तीन भागात विभागता येईल

अ) प्रकल्पांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नदी खोरे ऑथॉरिटीला अधिकार दिले जावेत.

ब) नदी खोरे बेसिनच्या विकासाचे नियोजन

क) तांत्रिक आणि प्रशासकीय तज्ज्ञांची नियक्ती

नदी-खोरे प्राधिकरण (ऑथॉरिटी)

खूप विचार करून कामगार विभागाने ठरवले की, आंतरराज्य प्रकल्प राबविणे जास्त सोईचे ठरेल. त्यांच्यात एक करार तयार केला गेला. डिसेंबर १९४४ मध्ये एक पत्र पाठवून सर्व माहिती सांगितली. ''देशातील पाणी आणि वीज प्रकल्प उत्तमपणे राबविणे आणि त्यांचा विकास करणे हे या विभागाचे काम आहे, हे त्यात नमूद केले. महापुराचे योग्य नियंत्रण आणि नियोजन केले तर महापूर शाप ठरण्याऐवजी वरदान ठरू शकेल. ज्या ज्या राज्यांमधून नद्या जात आहेत. त्यांच्याशी संबंधित राहील. या बहुद्देशीय प्रकल्पाचा एकापेक्षा जास्त राज्यांना, प्रांतांना फायदा होईल. त्यामुळे त्या प्रांताचे आणि राज्यामध्ये जर करार झाले तर लवकर प्रगती होईल.'' हे पेपरवर्कप्रमाणे वाटत होते. परंतु तसे नव्हते. प्रांतांनी आपल्या माणसाच्या आणि साधनांच्या मदतीने लोकांना भरपूर फायदा मिळेल अशी धोरणे तयार केली. राज्यांसोबतच संपूर्ण राष्ट्राला फायदा होणाऱ्या या प्रकल्पात काही अडथळे यायला लागले. घटनेतील कायद्यांतर्गत काही अडचणी येऊ लागल्या. एखादा करार करून तो लागू करण्याचा सगळ्यात सोपा उपाय म्हणजे एक समिती नेमून त्यांच्या अखत्यारीत केंद्र आणि राज्यांमध्ये करार करणे.

या प्राधिकरणाने (ऑथॉरिटीने) यावेळी कामे आणि जबाबदारीचे व्यवस्थित विघटन केले नाही. दामोदर खोरे प्राधिकरण स्थापन करण्याचे काम सुरू असतानाच महानदी आणि सोन नदी खोरे प्राधिकरणाच्या परिधोरणांचीही कार्यवाही सुरू होती. मार्च १९४५ मध्ये दिल्ली येथे आंतरराज्य परिषद घेण्यात आली. उत्तर प्रदेश, बिहार, काही केंद्रशासित प्रदेश आणि प्रांतांच्या विकासासाठी काही महत्त्वाच्या योजना तयार केल्या होत्या. डॉ. आंबेडकर यांनी परिषदेमध्ये प्रतिपादन केले की, सध्या अस्तित्वात असलेले कायदे उपयोगी नाहीत. तर केंद्र शासन, बिहार राज्य आणि प. बंगाल राज्याने जर मनापासून जनतेचे हे प्रश्न सोडवण्याची इच्छा दर्शविली तर दामोदर नदी खोरे प्राधिकरण स्थापन करून हे कार्य या प्राधिकरणाच्या माध्यमातून कार्यान्वित केले तर हा प्रश्न कायमचा सुटू शकतो. पुढे सोन नदी-खोरे ऑथॉरिटी तयार झाली.

१) सोन नदी आणि त्यातूनच निघणाऱ्या लहान नद्यांचा उपयोग प्रांत आणि राज्यांना होईल.
२) प्रांत आणि राज्यांची या ऑथोरिटीच्या वीज निर्मितीच्या विचारांशी सहमती दाखवली जावी.
३) प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय प्रांत आणि राज्यांनी पाण्याचा वापर करू नये.
४) जेथे धरणांची नियोजित जागा आहे तेथील जमीन देण्याबाबत मान्यता द्यावी.

सन १९४४ च्या ऑगस्टमध्ये बंगाल सरकारने दामोदर नदी खोरे याची एक फाईल भारत सरकारकडे पाठवली. त्यात पश्चिम बंगालमधील पाण्याबाबत समस्या नमूद केल्या होत्या. दामोदर समितीने पुरावरील समस्येचे निराकरण आणि सुपीक जमिनीबाबतचे प्रश्न यावर लक्ष वेधले. कामगार विभागाने सकारात्मक प्रतिक्रिया दिली. ८ ऑक्टोबर १९४४ ला या सर्व प्रकरणातील बारकावे लक्षात घेऊन त्यावर विचार केला जाईल, असे ठरविले. पश्चिम बंगाल सरकारने ऑथॉरिटी तयार करण्यावर सहमती दिली. प्रांतामधून वाहणाऱ्या मोठ्या नद्यांच्या बंगालमधील आऊटलेटबाबत भारत सरकारने एक क्षेत्रीय ऑथॉरिटी तयार करावी असे सुचविले. फेब्रुवारी १९४५ मध्ये कोलकाता येथे कामगार विभागाने दामोदर नदी खोरे प्राधिकरणाचे दोन मॉडेल्स बनविले. बिहार सरकार, पं. बंगाल आणि केंद्र सरकारच्या अथक परिश्रमानंतर एक ऑथॉरिटी तयार झाली. सन १९४८ मध्ये घटनेमध्ये तशी तरतूद झाल्यामुळे त्यांना कायद्याचा पाठिंबासुद्धा मिळाला. अशाप्रकारचे हे नदी खोरे हा पहिलाच प्रयोग होता. आंतरराज्यातील नद्यांवर सिंचन आणि ऊर्जा प्रकल्पाची अशाप्रकारे सुरुवात झाली.

नदी-खोरे कुंड प्रकल्पाचा विकास

पाण्याची उपलब्धता आणि त्याचा वापर यावर पाण्यापासून तयार होणारे प्रकल्प अवलंबून असतात. त्यांची प्रगती आणि विकास होतो. सन १९३५ मध्ये एक कायदा तयार केला. परंतु त्यात नदी-खोरे कुंड याबाबत काहीच नमूद नव्हते. सन १९४५-४७ मध्ये दामोदर खोरे आणि महानदी यांच्या विकासाबाबत नकाशा सादर केला. सन १९४८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवीन घटना मसुदा तयार केला, त्यात काही कायद्यात बदल केला. त्याला दामोदर खोरे असे नाव दिले. त्यात दामोदर नदीचे विविध कुंड आणि लहान नद्यांचा समावेश होता. सन १९४८ मध्ये वीज वितरणाचा कायदा पास झाला. स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डने नेमून दिलेल्या इतर सदस्यांनी सन १९४५-४६ या कालावधीत दामोदर, महानदी, सोन नदी आणि इतर नद्यांबाबत माहिती तयार करून ठेवली. (दि. ८ ऑक्टोबर १९४४ ला कामगार विभागाने बंगाल सरकारला दिलेल्या पत्राप्रमाणे)

डॉ. आंबेडकर यांनी दामोदर खोरे प्राधिकरण स्थापन करण्यासाठी अशा सलग तीन परिषदा घेतल्या. दुसरी परिषद कोलकाता येथेच २३ ऑगस्ट १९४५ रोजी आणि तिसरी परिषद एप्रिल १९४६ मध्ये झाली. दामोदर खोरे प्राधिकरणाची प्रारूप घटना केंद्र शासनातर्फे तयार करण्यात येऊन ६ जानेवारी १९४७ रोजी झालेल्या चौथ्या परिषदेमध्ये प्रस्तुत करण्यात आली. त्याला पाचव्या परिषदेत दि. २७ एप्रिल १९४७ रोजी मंजुरी मिळाली. नंतर राज्य शासनाने हे प्रारूप त्यांच्या विधिमंडळात



मंजूर केल्यानंतर दामोदर नदी खोरे प्राधिकरण स्थापन करण्याचे विधेयक संसदेत डिसेंबर १९४७ मध्ये प्रस्तुत करण्यात आले आणि १८ फेब्रुवारी १९४८ रोजी हे विधेयक मान्य झाले. तसेच गव्हर्नर जनरलची २७ मार्च १९४८ रोजी प्राधिकरणास मान्यता मिळाली.

दि. ३ जानेवारी १९४४ रोजी कलकत्ता परिषदेत डॉ. आंबेडकर यांनी सांगितले की, दामोदर प्रकल्प हा फक्त पुरावर नियंत्रण मिळविण्यासाठी नाही तर वीजनिर्मिती आणि पाण्याचा अधिकाधिक वापर कृषि व औद्योगिक क्षेत्रात झाला पाहिजे. तसेच कामगार विभागानेसुद्धा सोन नदी खोरे प्रकल्पाचे महत्त्व आणि उपयोग जाणून बहुउद्देशीय असा प्रकल्प तयार करावा. ज्या भागात पूर येतो, तेथील हे जास्तीचे पाणी ट्युबवेलने ओढून त्याचा वापर दुसरीकडे केला जावा. हे पुराचे पाणी नियमित करताना त्याचा वापर विद्युत निर्मिती, सिंचन, नौकानयन, पिण्यासाठी आणि इतरही उपयोगासाठी वापरण्याचा विचार करावा, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यासाठी त्यांनी असे म्हटले की, ऑथॉरिटी आणि प्रांत/ राज्यातील लोक आणि लोकल बॉडी यांनी परस्पर सामंजस्याने काम करावे. कामगार विभाग पाण्याचा बहुद्देशीय वापर करण्याचा प्रयत्न करत होता. तसेच संपूर्ण देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी हे आवश्यक होते.

टेक्निकल एक्सपर्ट बॉडीज

या सर्व प्रकल्पाकरिता एका टेक्निकल एक्सपर्ट बॉडीची गरज होती. भारत सरकारच्या सिंचन सल्लागाराने ड्ग्रो मोअर फूडफ हे कॅम्पेन सुरू केले. सेंट्रल बोर्ड इरिगेशनने काही अभियंत्यांची नेमणूक केली. ते पार्टटाईम काम करायचे, ते पुरेसे नव्हते. संपूर्ण शक्तीनिशी त्या प्रकल्पावर काम करण्यासाठी कामगार विभागाने डिसेंबर १९४४ मध्ये प्रांतीय आणि राज्य सरकारकडे प्रपोज्ड कमिशनबाबत त्यांचा सल्ला मागितला. भारत सरकार आणि राज्य सरकार दोघांनी एक एक्सपर्ट बॉडी तयार करावी असे ठरले. हक्क आणि अधिकारांसोबत राज्य सरकारचे नियम आणि कामगार विभागाचे नियम यात अंतर होते. डॉ. आंबेडकरांनी मार्च १९४४

मध्ये आणि व्हाईसराय यांनी दि.४ एप्रिल १९४५ मध्ये इरिगेशनची केंद्रीय पाणी व्यवस्था आणि नेव्हीगेशन कमिशनला मान्यता दिली. २५ ऑक्टोबर १९४३ ला झालेल्या पहिल्या बैठकीत एका टेक्निकल एक्सपर्ट बॉडीची गरज असल्याचे ठरले. नियोजित केंद्रीय टेक्निकल पॉवर बॉडीकडून या कामांची अपेक्षा होती. जसे डाटा गोळा करणे, सर्व्हे करणे, प्रांत आणि राज्य सरकारच्या निर्देशाप्रमाणे वीज प्रकल्पाच्या विकासासोबत नियोजन करणे, संपूर्ण देशात विजेचा पुरवठा सुरळीत सुरू राहावा यावर काम करणे इत्यादी. नोव्हेंबर १९४४ मध्ये बोर्डाची स्थापना झाली. हे काम झाल्यानंतर आता आंतरभारतीय जलविद्युत प्रकल्पाचा विकास करण्याची वेळ होती. कामगार विभाग एकापाठोपाठ एक यश मिळवत पुढे वाटचाल करत होता. सन १९४२ ते ४६ या चार वर्षात दोन एक्सपर्ट टेक्निकल बॉडीने या प्रकल्पाबाबत संपूर्ण तयारी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या बॉडीचे प्रमुख होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाणी प्रकल्पातील योगदान

डॉ. आंबेडकरांनी नदीच्या पाण्याचा वापर जलवाहतुकीसाठी होऊ शकतो, असे प्रतिपादन केले. एका बैठकीत ओरिसा नदीसंबंधात ते म्हणतात– ईस्ट इंडिया कंपनीच्या कायद्याप्रमाणे इंटरनॅशनल नेव्हिगेशन एक अतिशय महत्त्वाची भूमिका निभावत आहे. आज भारतात असणारी विविध धरणे याच पॉलिसीवर आधारित आहेत. रेल्वे नंतर आली. पॉलिसी तयार करतेवेळी रेल्वे आणि कॅनॉल नेव्हिगेशन होते. सन १८७५ पासून रेल्वे विरुद्ध कॅनॉल असे एक युद्ध सुरू होते. सर आर्थर कॉटन यांनी कॅनॉल्सबाबतचे युद्ध लढले. परंतु रेल्वेला पाठिंबा देणारे जिंकले.

डॉ. आंबेडकर पुढे म्हणाले की, ''कॅनॉलच्या विरोधात रेल्वे जिंकली. त्यामुळे मी तितकासा खूश नाही. मला माहित आहे की, जलवाहतूक जशी दुर्लक्षित होती, तशी आज नाही. आपल्या जुन्या धरणांचे पुनर्निर्माण करून आणि जर्मनी, रशियाकडून मदत मागता येईल.'' (त्यांचे असे म्हणणे होते की, घटना तयार करताना आपण रेल्वे आणि जलमार्ग यांना समान मानले नाही. जे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाहतात. दुर्दैवाने आपल्या राज्यघटनेने रेल्वे आणि जलमार्ग यांच्यात भिन्नता दर्शविली आहे. वास्तविकतेत ते चूक आहे.) याचा परिणाम असा झाला की, रेल्वे ही बाब संपूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारीत ठेवली. परंतु पाणी मात्र संपूर्णपणे राज्याच्या अखत्यारीत ठेवले आणि ही चूक भविष्यात आपल्याला अनेक वर्षे भोगावी लागणार आहे आणि बाबासाहेबांचे भविष्य खरे ठरले आहे.

डॉ. बाबासाहेब यांना विश्वास होता की, पाण्याचा बहुद्देशीय उपयोग केला तर खूप फायदा होईल. दामोदर प्रकल्प हा एक बहुपयोगी प्रकल्प आहे. पुराच्या समस्येपासून त्यामुळे सुटका होईल. तसेच सिंचन, वीज आणि जलवाहतुकीसाठीही फायदा होईल. दामोदर नदी खोरे प्रकल्प हा पहिला प्रकल्प होता. दामोदर प्रकल्पाप्रमाणेच सोन नदी प्रकल्पसुद्धा बहुद्देशीय होता. ते म्हणाले, अमेरिकेप्रमाणे ओरिसाने पाण्याच्या साठवणुकीबाबत काही तरी ठोस उपक्रम राबवावा. अशा प्रकारे पाण्याच्या साठवणुकीचा सिंचन व वीज प्रकल्पात उपयोग होईल. परंतु अंतर्गत नेव्हीगेशनसाठी सुद्धा होतो. खोऱ्यातील पाण्याचे एकात्मिक आणि सर्वंकष नियोजन व्हावे आणि विकासाचा एकात्मिक विचार होऊन त्यावर अंमल व्हावा अशी कार्यपद्धती दामोदर खोरे प्राधिकरण स्थापन करून बाबासाहेबांनी या देशात सुरुवात केली होती.

ओरिसा राज्यात सतत पुरामुळे मोठ्या प्रमाणावर प्राणहानी, वित्तहानी होत होती. सन १९२८ ते १९४२ च्या दरम्यान या प्रश्नांवर उपाय सुचविण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या होत्या. या सर्व समित्यांनी वेळोवेळी जे अहवाल शासनास दिले होते, त्यापैकी एकही अहवाल डॉ. आंबेडकरांना योग्य आढळून आला नव्हता. त्यांच्या मते हे सर्व अहवाल एकांगी स्वरूपाचे होते. एकही अहवाल बहुआयामी स्वरूपाचा नव्हता. दि. ८ नोव्हेंबर १९४५ रोजी कटक येथे या संबंधी मार्गदर्शन करताना बाबासाहेबांनी आपले अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. त्यांच्या मते पाणी आणि महापूर हे विनाशकारक आहेत, असे गृहीत धरून उपायधोरण सुचवून नका. देशात एवढे जास्त पाणी उपलब्ध नाही, की जे हानिकारक ठरू शकेल. **भारतीय जनतेस पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात, जास्त पाण्याच्या उपलब्धतेमुळे नव्हे.** पाणी राष्ट्रीय संपदा असल्यामुळे आणि पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण असमतोल आणि अविश्वासार्ह असल्यामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा वापर करता येईल, हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे आणि त्यासाठी जेथे पुरामुळे नेहमी नुकसान होत असते, त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी समुद्राला जाऊ न देता विकासासाठी वापरणेच इष्ट ठरेल.

नदी– खोरे प्रकल्पाबाबत ते म्हणतात की, यामुळे आंतरराज्यातील नद्यांचा प्रश्न सुटेल. जेव्हा ते क्षेत्रीय प्रकल्प होतील तेव्हाच आंतरराज्यातील नद्यांवरील प्रकल्प यशस्वी होतील. कलकत्त्याच्या पहिल्या परिषदेत त्यांनी हे स्पष्ट केले की, पाण्याचा वापर करण्यासाठी सेंट्रल टेक्निकल पॉवर बोर्डाची स्थापन केली. सोन नदी खोरे प्रकल्पाबाबत झालेल्या परिषदेत त्यांनी हेच नमूद केले.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांचे जलसिंचन आणि ऊर्जा या दोन्ही क्षेत्रात खूप मोठे योगदान होते. भारताच्या राज्यघटनेत सद्यस्थितीत पाणी हा राज्याच्या अखत्यारीत असलेल्या विषयांच्या यादीत आहे. त्यामुळे राज्य सरकारला त्यांच्या हद्दीत वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचे नियोजन, आपत्ती व्यवस्थापन तसेच वापर करण्याचा पूर्ण अधिकार आहे. याचा परिणाम असा झाला की, देशात पाण्याच्या नियोजनात एकवाक्यता, समन्वय, ठराविक धोरण अस्तित्वात नाही. त्यामुळे राज्या–राज्यात पाणी प्रश्नावर सतत संघर्ष होत असतो. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे तमिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील कावेरी नदीच्या पाण्यावरून उठलेला वाद. हा वाद इतक्या विकोपास गेला आहे की, लवादाचे निर्णयही हे राज्य मान्य करीत नाहीत. तसेच माननीय पंतप्रधानांची तडजोडही मान्य करीत नाही. बाबासाहेबांनी भविष्यात असे प्रश्न निर्माण होणार याचा अंदाज घेऊन पाण्यासंबंधी सशक्त अधिकार केंद्र शासनास असावे, असे आग्रही प्रतिपादन घटना समितीसमोर केले होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या टीमचे पाणी योजनेत खूप योगदान होते', असे प्रतिपादन कामगार मंत्रालयातील मंत्रिमंडळ सदस्य व सी.एम. यांनी केले. तसेच भाभा यांनी आंबेडकरांकडून जुलै १९४६ मध्ये कार्यसूत्रे हातात घेतली.

जलविद्युत प्रकल्पाबाबत आधुनिक विचारसरणीकडे एक नवीन वाटचाल सुरू झाली. दामोदर नदी खोरे प्रकल्पानंतर सोननदी, महानदी, कोसी इत्यादी इतर नदी खोरे प्रकल्पांची योजना तयार झाली आणि त्यांचा विकास हाती घेतला.

संपर्क क्र. ०८८००३८८३३२



समृध्द महाराष्ट्राचे संकल्पचित्र देणारे महानायक

प्रा. श्री. हरी नरके, सदस्य सचिव, महात्मा फुले चरित्र प्रकाशन समिती, मुंबई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मास १२६ वर्षे झाली तरी, त्यांच्या अनेक पैलूंवर अद्यापही म्हणावा तसा प्रकाशझोत टाकण्यात आलेला नाही. घटनाकार, अर्थतज्ञ, पत्रकार, संसदपटू, वक्ते, कामगार व कायदामंत्री, लेखक, विचारवंत, तत्त्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ अशा काही पैलूंवर जाणकारांनी काम केले आहे. सन १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. आजच्या भाषेत सांगायचे तर ते कामगार, ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा आदी खात्यांचे केंद्रिय कॅबिनेट मंत्री होते. या सर्व खात्यांवर त्यांनी आपली कलदार मुद्रा उमटविलेली आहे. २००० सालापर्यंत देशाला किती वीज आणि पाणी लागेल, याचा अभ्यास करुन त्यासाठी दूरदृष्टीने त्यांनी त्या काळात पावले उचलली. पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, जलवाहतुकीसाठी आणि पर्यटनासाठी (वॉटर पार्क) लागणारे पाणी साठवायचे कसे, पुरवायचे कसे, याचे शास्त्रशुध्द नियोजन त्यांनी केले होते. भारतात एकाच वेळी काही राज्यांमध्ये महापूर आलेला असतो, तर दुसऱ्या काही राज्यांमध्ये त्याचवेळी दुष्काळ पडलेला असतो. हे दोन्ही प्रश्न सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी देशातील सर्व मोठ्या नद्या एकमेकींना जोडण्याची योजना मांडली. पूरनियंत्रण आणि दुष्काळ निवारण करण्याची ही महत्वाकांक्षी योजना पाठिंब्याअभावी आजवर पुढे जाऊ शकली नसली तरी, एक ना एक दिवस तिचा विचार करावाच लागेल. देशात सन १९४३ मध्ये त्यांनी शासकीय योजना मांडताना लिहिले होते की, मुबलक आणि स्वस्त वीजपुरवठा उपलब्ध असल्याखेरीज भारताचे औद्योगिकीकरण वेगाने होणार नाही. भारतीय लोक दारिद्याच्या दुष्टचक्रात कायमचे अडकले आहेत. दूरदृष्टीने मानवी जीवनाच्या विकासाचा प्रश्न म्हणून विजेचा प्रश्न अग्रक्रमाने सोडविला पाहिजे. हा प्रश्न धसाला लावण्यासाठी त्या काळात त्यांनी अपार मेहनत केली. केवळ पुरेसा नव्हे, तर भरपूर वीज पुरवठा, पायाभूत सुविधा म्हणून उपलब्ध करुन देण्यावर त्यांचा भर होता. कोळसा, पेट्रोल, अल्कोहोल व पाण्यापासून वीजनिर्मिती करणे, अभियंत्यांना परदेशात पाठवून प्रशिक्षण देणे, वीज व्यवस्थापन, विद्युत वाणिज्य व वीज अभियांत्रिकी ही सर्व क्षेत्रे आधुनिक आणि बळकट बनविण्यासाठी त्यांनी जगभरातल्या या कामांचा अभ्यास करुन त्या तोडीची व्यवस्था भारतात उपलब्ध करुन देण्याचा चंग बांधला होता. एका शासकीय प्रस्तावात ते म्हणतात.."The broadening of the electrical industry and the development of hydro electric power are inextricably connected with development of industries and food production" उद्योगधंदे वाढविणे आणि अन्नधान्याचे अधिक उत्पादन करणे या दोन्ही गोष्टी विजेच्या उपलब्धतेवर अवलंबून आहेत, याचे स्पष्ट विवेचन त्यांनी वारंवार केलेले आढळते.

भारतातील पूरनियंत्रण, कृषि, जलसिंचन, मृदसंधारण, अन्नधान्य पुरवठा या साऱ्या राष्ट्रीय प्रगतीच्या नाड्या आहेत. त्यांच्यासाठी ऊर्जा व जलसंपदा या खात्यांनी जोरदार काम केल्याशिवाय भारत विकासामध्ये



'भारतरत्न' हा सर्वोत्तम नागरी पुरस्कार डॉ. आंबेडकर यांना सन १९९० मध्ये महापरिनिर्वाणोत्तर बहाल करण्यात आला.

मुसंडी मारु शकत नाही, याचे भान देशाला देणारे पहिले राष्ट्रनेते डॉ. बाबासाहेब होते.देशाला 'जलसाक्षरता' आणि 'ऊर्जा साक्षरता' यांचे धडे सन १९४२ ते १९४६ या काळात त्यांनी गिरवायला शिकवले. ही दूरदृष्टी आपण गांभीर्याने ओळखू शकलो असतो, तर आज देशात ना कुणी बेकार दिसले असते ना कोणी शेतकरी आत्महत्या करताना आढळला असता.

ज्या पूर्वास्पृश्य समाजाला उच्चजातींनी पाण्याच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले आणि ज्यांना गुलामीच्या अंधारात ढकलले त्यातून आलेले बाबासाहेब देशाला पुढची १०० वर्षे अविरत प्रकाश (ऊर्जा) आणि मुबलक पाणी मिळावे, यासाठी चिंतन, नियोजन आणि उपाययोजना करीत होते. अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव तरतूद करणे कसे गरजेचे आहे, हे ते व्हाईसरॉयला पटवून देत होते. भारतातील पहिली १५ मोठी धरणे बांधण्याचे ब्लूप्रिंट(संकल्प चित्र) बाबासाहेबांनी तयार केले. अवघ्या ४ वर्षात त्यासाठी अहोरात्र मेहनत करुन त्यांनी कामाची सुरुवातही केली.

जगप्रसिध्द जलतज्ज्ञ जॉ. सी. एच. भाभा म्हणतात, ''अल्पावधीत आपण जुन्यापुराण्या संकल्पनातून अत्याधुनिक अशा जलविकास संकल्पनेकडे वळलो आहोत. त्यासाठी नदी, खोरे विकासाचा विस्तृत नियोजन आराखडा तयार करण्यात आला. याबाबत दामोदर नदीसंबंधी घेण्यात आलेली पहिली परिषद अतिशय महत्त्वाची ठरली.कारण तिनेच सर्व मार्गदर्शनाचे काम केले. त्यातूनच पुढे महानदी, कोसी, सोननदी आणि इतर सर्व प्रकल्प तयार झाले. या संदर्भात बहुउद्देशीय आणि प्रादेशिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले त्या डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे आपण सर्वांनी ऋणी असले पाहिजे.''

'न्यू इंडियाज रिव्हर्स' या जगप्रसिध्द ग्रंथाचे लेखक प्रा. एच. सी. हर्ट हेही डॉ. आंबेडकरांचे कार्य किती मौलिक होते, ते नोंदवतात. 'नदीच्या खोऱ्यात पावसाचे पाणी किती उपलब्ध होईल व त्याचे नियंत्रण कसे करावे, या प्रश्नांची सोडवणूक इंजिनियर मंडळी करु शकली असती; परंतु खरे अवघड प्रश्न मुख्यत: राजकीय स्वरुपाचे असे धोरणात्मक होते. तेथील रहिवाशांची इच्छा, प्रांतिक सरकारे, बिहार व बंगालची बहुउद्देशीय दामोदर खोरे विकासाला मान्यता मिळवणे, खर्चाचे विवरण आणि निधीची उपलब्धता हे प्रश्न मुख्यत: राजकीय स्वरुपाचे होते. साधारणत: ३० महिने दामोदर धरणाच्या नियोजनाचे सर्व सुकाणू एका राजकीय व्यक्तीच्या हातात केंद्रित झाले होते. ज्यांनी अत्यंत दूरदृष्टीने आणि झपाट्याने याबाबतचे निर्णय घेतले ते मंत्री महोदय डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे या बाबतीतील योगदान असाधारण असे मौलिक आहे.'

या सर्व कामांना गती देण्यासाठी बाबासाहेबांनी 'सेंट्रल इरिगेशन अँड वॉटरवेज ॲडव्हायजरी बोर्ड' स्थापन केले. त्याला त्वरित २०५ जणांचा कर्मचारी व अधिकारी वर्ग मिळवून दिला. पुढे ही संख्या त्यांनी ४४७ पर्यंत नेली. या बोर्डाने सरकारी व खासगी वीज कंपन्यांचे दर ठरविण्याचे निकष, त्यासाठीची मार्गदर्शक तत्वे यांची मांडणी केली.

या बोर्डाकडून बाबासाहेबांनी पुढील कामे करवून घेतली. १) पूर नियंत्रण, २) जमिनीची झीज रोखणे, ३) पुरामुळे होणारे नुकसान टाळणे, ४) शेतीसाठी पाणी पुरविणे, ५) वीज निर्मिती करणे, ६) भूगर्भातील पाणी शेतीसाठी मिळविणे, ७) पूरग्रस्त भागातील पाण्याचा निचरा करणे, ८) जलमार्ग निर्माण करणे, ९) सर्व राज्यांशी संपर्क करुन धरणाचे व वीज निर्मितीचे प्रस्ताव तयार करणे, १०) त्यासाठी आवश्यक संशोधन व सर्वेक्षण करणे, ११)राज्याराज्यातील पाणी तंटे सोडविणे, १२) धरणे बांधणे, १३) बहुउद्देशीय प्रकल्प उभारणे, १४) भारतीय अभियंत्यांना प्रशिक्षण देणे, १५) पर्यावरण, जमीन रचना आणि निसर्गाचा अभ्यास करुन तो ग्रंथरुपाने प्रकाशित करणे, १६) सुसज्ज ग्रंथालय उभारणे.

या सर्व कामांवर बाबासाहेबांचे बारीक लक्ष असे. कामाच्या प्रगतीचा दरमहा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक ती उपाययोजना ते करीत. अनेकदा कामांना ते थेट भेटी देत. त्यातील अनेक भेटी अचानक दिलेल्या असत. स्वत: कामाच्या ठिकाणी ते राहत. अभ्यास करीत.तिथल्या तिथे प्रश्न सोडवित.त्यासाठी त्यांनी अनेक राज्यांचे दौरे केले.जिथे वाहन जात नाही अशा ठिकाणी ते पायी जात. अडचणींची पर्वा न करता ते फिल्डवर जात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढत असे.कामांना गती येई. दर्जा वाढे. या काळातल्या संशोधन, चिंतन आणि अभ्यासामुळेच पुढे घटनेत ते याबाबतच्या अत्यंत निर्दोष तरतुदी करु शकले.

दि. १४ नोव्हेंबर १९४४ रोजी त्यांनी सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन स्थापन केले. दि. १५ मार्च १९४४ मध्येच त्यांनी सोन नदीचाही प्रकल्प अहवाल मंजूर केला होता. दामोदर, हिराकुड, सोन नदीचे सर्व प्रकल्प हे बाबासाहेबांच्या कल्पक आणि प्रगल्भ अशा दर्जेदार प्रतिभेतून साकारले आहेत. देशाच्या पुढील १०० वर्षाच्या पाणी व विजेचे नियोजन आणि त्यासाठीचा निधी त्यांनी मिळवून दिला. बाबासाहेबांच्या या विषयीच्या सूचनांचे पालन राज्यकर्त्यांनी केले असते, तर आज आपला देश भारनियमनयुक्त आणि टँकरमुक्त दिसला असता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितांचे उध्दारकर्ते म्हणून ओळखले जाते. तथापि त्यांनी त्याच वेळी ओबीसी (इतर मागास वर्ग)या समाजासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाकडे देशाचे हवे तेवढे लक्ष गेलेले नाही. भारताचे कायदामंत्री म्हणून सन १९४७ ते १९५१ या काळात त्यांनी प्रामुख्याने राज्यघटना आणि हिंदू कोड बील(महिला हक्क कायदा) तयार करण्यासाठी अपार परिश्रम घेतले. भारतीय संसदेने 'हिंदू कोड बिल' मंजूर न केल्याने दु:खी होऊन त्यांनी केंद्रीय मंत्रिपद त्यागले. या राजीनाम्यामागे आणखी ४ कारणे होती. त्यातील दुसरे कारण या देशातील कुणबी, माळी, तेली, साळी, धनगर, वंजारी बंजारा, आग्री, भंडारी, न्हावी, शिंपी, सोनार, सुतार, कुंभार यांच्यावरील अन्यायाकडे लक्ष वेधणे हे होते. हे फारसे चर्चेत आले नाही.

त्यांचे संपूर्ण राजीनामा पत्र 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे, खंड १४, भाग २' मध्ये छापलेले आहे. यातील पृष्ठ क्रमांक १३१९ वर ओबीसींबाबतचा मजकूर आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'I will now refer to another matter that had made me dissatisfied with the government. It releates to the treatment accorded to the backward classes and the scheduled Castes. I was very sorry that the constitution did not embody any safeguards for the backward classes. It was left to be done by the Executive Government on the basis of the recommendations of a commission to be appointed by the president. More than a year has elapsed since we passed the constitution but the government has not even thought of appointing the commission.' (सरकारवर नाराज असल्याचे दुसरे कारण मी आता मांडू इच्छितो. त्याचा संबंध इतर मागास वर्ग आणि अनुसूचित जाती यांना शासनाने जी (अन्यायपूर्ण) वागणूक दिली त्यांच्याशी आहे. मला सांगायला खेद वाटतो की, राज्यघटनेने इतर मागासवर्गाला कोणतेही घटनात्मक संरक्षण दिले नाही. राष्ट्रपती एक आयोग नेमू शकतील. त्याच्या शिफारशींच्या आधारे सरकार मागासांसाठी योजना असू शकेल असे ठरविण्यात आले. (कलम ३४०) संविधान मंजूर करुन आता एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटलेला आहे. तथापि सरकारने असा आयोग नेमायचा विचारसुध्दा केलेला नाही.) राज्यघटनेतइतर मागावर्गासाठी बॅकवर्ड क्लासेस असाच शब्दप्रयोग आहे. कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू, केरळ, येथे बीसी म्हणजे ओबीसी असा अर्थ प्रचलित आहे. महाराष्ट्र आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये मात्र ओबीसी ही ओळख रुजलेली आहे. प्रत्यक्ष घटनेत सामाजिक व शैक्षणिदृष्ट्या मागासलेला वर्ग (एसईबीसी) म्हटलेले आहे. महाराष्ट्रात मात्र बीसी म्हणजे अनुसूचित जाती – जमाती अशी चुकीची लोकधारणा आहे. ती दुरुस्त करण्याची गरज आहे. बाबासाहेबांनी नेहरु सरकारच्या ओबीसीविरोधी धोरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी कायदे मंत्रिपदाला लाथ मारली. त्यांनी हा राजीनामा दि. २७ सप्टेंबर १९५१ रोजी दिला होता. तो दि. १० ऑक्टोबर १९५१ रोजी मंजूर झाला.

राजीनाम्याला ६५ वर्षे झाली तरी त्याची माहिती ओबीसींना असू नये हे खेदजनक आहे. बाबासाहेबांवर लिहिणाऱ्या/बोलणाऱ्या वर्गानेही याकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे.

देशातील ५२ टक्के जनतेशी जोडणारा हा आस्थेचा परिघ आम्ही तरी दुर्लक्षित ठेवता कामा नये. बाबासाहेबांच्या दबावामुळे नेहरुंना कालेलकर आयोग नेमावा लागला. आयोगाने ओबीसींना आरक्षण द्यावे असे सुचविले. एकट्या कालेलकरांनी कोलांटउडी मारुन अहवालातील आपल्या सहीशी

प्रतारणा करुन खासगी पत्र लिहून आरक्षण विरोधी भूमिका घेतली. नेहरु सच्चे लोकशाहीवादी असल्याने त्यांनी बहुमताचा अहवाल कचऱ्याच्या पेटीत टाकला आणि एकाचे पत्र (कालेलकरांचे) तेवढे मंजूर केले.ही ओबीसींचा विश्वासघात करणारी खेळीही त्यांना माहिती कुठेय ?

आजचे ओबीसी म्हणजे वर्णव्यवस्थेतील शूद्र होते. 'शूद्र पूर्वी कोण होते?' याचा सखोल अभ्यास करुन त्यावर प्रकाशझोत टाकणारा ग्रंथ बाबासाहेबांनी सन १९४६ मध्ये लिहून प्रसिध्द केला. तो त्यांनी महात्मा जोतीराव फुल्यांना अर्पण केला. अर्पणपत्रिकेत ते म्हणतात, हिंदू उच्च वर्गाच्या गुलामीत असलेल्या खालच्या वर्गाला महात्मा फुल्यांनी जागृत केले आणि भारताला राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक लोकशाही (स्वातंत्र्य) अधिक गरजेचे आहे, हे त्यांनी पटवून दिले. पहिली आवृत्ती लगेच संपल्याने १९४७ साली तातडीने दुसरी आवृत्ती काढावी लागली. ग्रंथाचा मराठी अनुवाद चरित्रकार चांगदेव भगवानराव खैरमोडे यांनी केलेला आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत बाबासाहेब म्हणतात, 'शूद्रांची अधोगती घडवून आणण्यात तरी चातुर्वर्ण्यांची दुष्कलंकित पध्दत प्रामुख्याने कारणीभूत झाली, तरी तिला टिकवून धरण्याचा बराच कार्यभाग शूद्रांनी केलेला आहे. या गोष्टीची ज्यांना जाणीव आहे, त्यांना हे कळून येईल की, या पुस्तकात जे भरपूर उतारे घातलेले आहेत, ते याच हेतूने की ते वाचून शूद्र वर्गातील लोकांना स्वत:च्या बुध्दीने सांगोपांग विचार करता यावा.' हे पुस्तक प्रकाशित होऊन आता ७० वर्षे होत आली आहेत. आजवर किमान ७० ओबीसींनी तरी ते वाचले असेल काय? आज ओबीसींमध्ये एक मध्यमवर्ग तयार झालेला आहे. शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, लेखक, अधिकारी, वकील, डॉक्टर, इंजिनिअर असणारे उच्चशिक्षित ओबीसी तरी स्वत:चा हा इतिहास डोळ्यांखालून घालणार आहेत काय?

या पुस्तकात एकूण १२ प्रकरणे आहेत. (१) शूद्रांचा कूट प्रश्न (२) शूद्रांच्या उत्पत्तीबद्दल ब्राम्हण ग्रंथातील सिध्दांत (३) शूद्राचा दर्जा कोणता, याबद्दलचे ब्राम्हण ग्रंथातील प्रमेय (४) शूद्र आणि आर्य यांचा झगडा (५) आर्यांचा परस्परातील झगडा (६) शूद्र आणि दास (७) शूद्र पूर्वी क्षत्रिय होते (८) वर्णाची संख्या ३ किंवा ४ (९) ब्राम्हण व शूद्र यांचा झगडा (१०) ब्राम्हणांनी शूद्रांना अधोगतीला कसे नेले? (११) समेटाची हकीकत (१२) सिध्दांताची कसोटी, ही या प्रकरणाची शीर्षकेच एवढी बोलकी आहेत की या पुस्तकात काय असेल त्याचा अंदाज सहज करता येऊ शकेल.

ओबीसी हे हिंदू समाजाचे बिनपगारी पोलीस आहेत. आपल्या मुक्तीचे तत्त्वज्ञान वाचण्यापेक्षा गुलामीच्या दस्तावेदांना ह्दयाशी कवटाळण्यात ते मग्न आहेत. बाबासाहेब जबरदस्त आशावादी होते. ते प्रस्तावनेत म्हणतात, मला पवित्र ग्रंथासंबंधी काय म्हणवयाचे आहे हे समजावून घेण्यास जर सध्याच्या पिढीतील हिंदू लोक तयार नसतील, तर त्यांच्या पुढच्या पिढीतील हिंदू लोक तयार होतील याची मला खात्री आहे. या बाबतीत मला अपयश येईल अशी निराशा माझ्या मनाला शिवत नाही. बाबासाहेबांचा हा प्रखर आशावाद खरा ठरणार पण तो केव्हा ? त्यासाठी आणखी किती पिढ्या वाट बघावी लागणार?

दि. ५ नोव्हेंबर १९२८ रोजी इंग्रज सरकारने एच.बी.स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमली होती. या कमेटीमध्ये आमदार डॉ. बी. आर. आंबेडकर, डॉ. पी.जी. सोळंगी, अमृतलाल ठक्कर असे सदस्य होते. कमेटीने मुंबई राज्यातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करुन समाजाच्या (१) अनुसूचित जाती, (२) अनुसूचित जमाती, (३) इतर मागास वर्ग (बीसी) अशा तीन गटांना संरक्षणाची गरज असल्याची शिफारस केली होती. समितीने दि. ५ मार्च १९३० मार्च रोजी आपला अहवाल दिला, याचा अर्थ देशात या कमिटीच्या आधारे ८६ वर्षापूर्वी सर्वप्रथम बीसी (ओबीसी) हा प्रवर्ग जन्माला आला. ही ओळख देणाऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अग्रभागी होते.त्यांच्या शिफारशीवरुनच सन १९३२ मध्ये या घटकांच्या कल्याणासाठी 'मागासवर्गीय विकास खाते' (समाजकल्याण खाते) निर्माण करण्यात आले. यातून पुढे यथावकाश 'इतर मागासवर्ग व भटके विमुक्त कल्याण विभाग' तयार झाला. यांच्या असंख्य योजनांचे लक्षावधी लोक लाभार्थी आहेत.त्यांना तरी हा इतिहास कधी कळणार?

अस्पृश्यांची लोकसंख्या वगळून हिंदूंच्या लोकससंख्येत शुद्र ७५ ते ८० टक्के असावेत यात शंका नाही. संख्येने इतक्या मोठया लोकांबद्दल ज्या पुस्तकात मी चर्चा केलेली आहे, ते पुस्तक उपेक्षा करावे असे नक्कीच नाही.

बाबासाहेबांच्या मते देशात ओबीसीची लोकसंख्या ५५ ते ६० टक्के आहे. त्यांच्या स्वतंत्र जनगणनेची सर्वप्रथम मागणी बाबासाहेबांनी केली होती.

विकास व सामाजित न्याय यांचे मोल कळण्याइतपत आम जनता प्रबुध्द झालेली आहे, हे भारतीय लोकशाहीचे फार मोठे यश म्हटले पाहिजे. मतदानाचा अधिकार देताना तो निरक्षरांना दिला जाऊ नये अन्यथा अनर्थ होईल, असा दावा उच्चभ्रू मंडळी करीत होती. आज अनुभव असा आहे की, सर्वाधिक सुशिक्षित परिसरात मतदान कमी होते तर निरक्षर, अर्धशिक्षित, अल्पशिक्षित जनता रांगा लावून मतदान करते. हक्कांविषयीची व नागरी कर्तव्याविषयीची ही जागरुकता बघितल्यानंतर मतदान साक्षरता कोणात अधिक आहे असे म्हणायचे? गरिबीमुळे काही मोजके लोक मतदानाचा पवित्र हक्क बजावताना काही आर्थिक अमिषांना बळी पडत असतीलही. परंतु आदर्श, स्पेक्ट्रम, नीरा राडिया, कॉमनवेल्थ, आयपीएल असे पराक्रम करणारे नक्कीच अल्पशिक्षित किंवा निरक्षर नाहीत. तेव्हा उडदामाजी काळे गोरे असणारच!

१९१९ साली मताधिकाराच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी ब्रिटिश सरकारने लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती. त्यात सुरेंद्रनाथ बॅनर्जी, श्रीनिवास शास्त्री आदी मान्यवर होते. या कमेटीपुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दि.२७ जानेवारी १९१९ रोजी साक्ष झाली. देशात सर्वप्रथम २१ वर्षे वयाच्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क द्यावा, अशी त्यांनी मागणी केली. सर्वांना मतदानाचा अधिकार द्यावा असे म्हणणारे भारतातील नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडातील पहिले नेते बाबासाहेब होते. त्यांनी फक्त दलितांपुरते पाहिले नाही. बाबासाहेंबामुळेच देशातील सर्व दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि उच्चवर्णीय गरीब या साऱ्यांना सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळाला. ब्रिटिशांनी भारतात फक्त राजेमहाराजे, संस्थानिक, पदवीधर आणि आयकर भरणारे श्रीमंत एवढयानाच मतदानाचा अधिकार दिला होता. सर्वांना मतदानाचा अधिकार देणे म्हणजे या मतदारांना देशाचे मालक घोषित करणे होय. याचाच अर्थ बाबासाहेबांनी सर्व भारतीयांचे नाव देशाच्या सातबाराच्या उताऱ्यावर लिहिले. आजच्या किती बौध्देत्तर मतदारांना याची जाणीव आहे?

(डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड१, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती १९७९, पृ.२४३ ते २७८ पहावे.)

आज विदर्भात फार मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. बाबासाहेबांनी हा इशारा १९१८ साली त्यांच्या एका पुस्तकात दिला होता. १९१८ साली त्यांनी इंडियन इकॉनॉमिक सोसायटीच्या जर्नलमध्ये (खंड १) 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडीज' असा प्रदीर्घ शोधनिबंध लिहला होता. (पहा खंड १, पृ.४५३ ते ४७९) त्यात भारतीय शेतीचे आकारमान लहान आहे. कुटुंबात मुलांची संख्या जास्त असल्याने भाऊ हिस्से वाढत जातात. तसेच जमिनीचे तुकडे वाढतात. परिणामी शेती परवडत नाही, असा मुद्दा मांडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हे तुकडे एकत्र करणे (तुकडे बंदी) हा त्यावर उपाय असला तरी एकमात्र उपाय नाही. मुळात शेती एकटी कधीच, कुठेच परवडत नसते. जोवर शेतकरी शेतीवरील बोजा कमी करीत नाही.म्हणजे शेतीवर अवलंबून असलेल्या काही मुलांना दुसऱ्या क्षेत्रात पाठवीत नाही तोवर शेती किफायतशीर होणारच नाही. शेतकऱ्यांच्या मुलांनी उद्योग, व्यापार, स्वयंरोजगार, शिक्षण अशा अन्य क्षेत्रात गेले पाहिजे, अन्यथा त्यांना हलाखीचे दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा ते ९८ वर्षापूर्वी देत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे द्रष्टेपण १९९८ साली आपल्याला कळलेले नाही. जातीय मानसिकतेमुळे अनेक शेतकऱ्यांना आजही बाबासाहेब जवळचे वाटत नाहीत. आम्हीही बाबासाहेबांच्या या योगदानाची फारशी चर्चा केली नाही.

आज बऱ्याच मंडळींना कुटुंब नियोजनाचे महत्व कळू लागले आहे. परंतु ज्या काळात फारसे कोणीही या विषयावर बोलत नव्हते. त्या काळात (सन १९३७ ते १९५२) बाबासाहेब अतिशय पोटतिडकीने हा विषय मांडत होते. सन १९३७ व १९५२ सालच्या निवडणूक जाहिरमान्यात त्यांनी हा विषय घेतला होता. त्यांचा स्वतंत्र मजूर पक्ष हा कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करणारा पहिला राजकीय पक्ष होय. आपला पक्ष सत्तेत आला तर कुटुंब नियोजनाचा कायदा करु, असे आश्वासन त्यांनी दिले होते. १९३७ साली हा पक्ष सत्तेवर येऊ शकला नाही. तथापि विरोधी पक्षात असताना बाबासाहेंबानी देशातील पहिले कुटुंब नियोजन विषयक विधेयक मुंबई विधिमंडळात दि. १० नोव्हेंबर १९३८ रोजी मांडले. जन्मदर महत्वाचा नसून, पोषणदर महत्वाचा आहे.असा एक मौलिक विचार त्यांनी त्या विधेयकात मांडला होता. किती मुले जन्माला घातली हे महत्वाचे नसून, त्यांचे पालनपोषण, शिक्षण कसे करता, त्यांच्यावर कोणते संस्कार करता, यावर ती मोठी होणं वा दुर्लक्षित राहणे अवलंबून आहे, असा एक नवा दृष्टिकोन भारतीय समाजाला देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. भारतातील जनमानस 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' यातून मुक्त केल्याशिवाय भारताला भवितव्य नाही, असा खणखणीत इशारा त्यांनी दिला होता. शंभर कौरव, अमक्या राजाला १०० मुलं असल्या कथाही बदलल्याशिवाय अबोध मनावरील संस्कार बदलता येणार नाहीत, असे ते म्हणत. जगातील सर्व देशांची दूध, भाजीपाला, पौष्टिक आहार यांची उपलब्धता आणि लोकसंख्या याची माहिती (आकडेवारीसह) देऊन ते भारतात अशीच खानेसुमारी वाढत राहिली तर कुपोषणाची, साथ येणार असे बजावतात. हे विधेयक काँग्रेस, कम्युनिस्ट, मुस्लीम लीग, हिंदु महासभा या साऱ्यांच्या असहकारामुळे पास होऊ शकले नाही. तसे झाले असते तर आज भारताची लोकसंख्या ५० कोटी राहिली असती आणि बेरोजगारी, महागाई, टंचाई, बेघर जनता या समस्याच दिसल्या नसत्या. दि.१२ डिसेंबर १९३८ रोजी त्यांनी स्वत:चे उदाहरण देऊन युवकांनी एकाच अपत्यावर थांबावे



कुटुंबियांसमवेत डॉ. बाबासाहेब. डावीकडून मुलगा यशवंत, पत्नी रमाबाई आणि वहिनी लक्ष्मीबाई.

असे आवाहन केले होते. दि.२० जुलै १९४२ रोजी महिला परिषदेत त्यांनी जास्त मुले जन्माला घालणे हा राष्ट्रीय गुन्हा असल्याचे ठणकावले होते. हे द्रष्टे बाबासाहेब आम्हाल कधी कळतील काय? तो दिवस कधी उगवेल काय?

घटना क्र.१

वाराणसी येथील शीतळा घाटावर दशहतवाद्यांनी स्फोट घडविला. या शक्तिशाली स्फोटात एक मुलगी बळी पडली. स्फोटानंतर या परिसराची पोलिसानी कसून छाननी केली. त्यांना तेथे एक १५ महिन्याची मुलगी सापडली. या बेवारशी मुलीचे नाव गौरी पांडे होते. सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करणाऱ्या निलेश पांडे या तिच्या पित्यानेच खुद्द मुद्दाम ही मुलगी या घाटावर सोडून दिली होती. त्यांना मुलगा हवा होता.तथापि दुसरीही मुलगीच झाली म्हणून तिला घाटावरील गर्दीत सोडून तो पसार झाला होता.

घटना क्र.२

गुजरात व राजस्थानच्या सीमेवरील डांग जिल्हयात एकाच कुटुंबातील आठ भावांनी स्वरुप नावाच्या मुलीशी लग्न केले. मुलीच्या घटलेल्या संख्येमुळे या भागात उपवर मुलांना लग्नासाठी मुलगी मिळणे कठिण झाले आहे. (साधना, दिवाळी अंक–२०१०)

घटना क्र.३

प. राजस्थानमधील बारमेर जिल्हयातील राजपुतांचा प्रभाव असलेल्या एका गावात जवळपास २०० राठोड कुटुंब आहेत. प्रत्येक कुटुंबात सरासरी २ ते ४ मुलगे आहेत, पण दोनशे कुटुंबात मिळून फक्त दोनच मुली आहेत. म्हणजेच सरासरीने सहाशे मुलांमागे दोनच मुली राठोड मंडळीकडे आहेत. (साधना, दिवाळी अंक–२०१०)

घटना क्र.४

भारतात दरवर्षी पाच लाख मुली जन्माला येण्यापूर्वीच जीवनाला मुकतात. रुढी (मुलाचा हव्यास व आधुनिक तंत्रज्ञान (सोनोग्राफी) यांच्यातील घातक हातमिळवणीने भारतीय समाजात गहजब माजवला आहे. (साधना, दिवाळी अंक–२०१०)

घटना क्र.५

० ते ६ वयोगटातील बालक–बालिकांचे बिघडलेले संतुलन नीट करणे कठीण आहे आणि त्याचे दुष्परिणाम भारताला दिर्घकाळ भोवणार आहेत. (भारताचे तत्कालीन महानिबंधक आणि जनगणना आयुक्त.)

या पाच घटनांवरुन स्त्री–पुरुष विषमतेबाबत विद्यमान परिस्थितीची प्रखर जाणीव व्हायला हरकत नाही.

सुमारे ७३ वर्षापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागपूर येथील महिला परिषदेत म्हणाले होते की, देशाची आणि समाजाची प्रगती ही स्त्रियांच्या स्थिती आणि गतीवरुनच ठरत असते. बाबासाहेबांनी दिलेली फुटपट्टी वापरली तर आज आपला देश नेमका कुठे आहे असे म्हणता येईल?

दि. २५ डिसेंबर १९२७ रोजी बाबासाहेबांनी महाडला विषमतेचे माहेरघर असलेल्या मनुस्मृती या ग्रंथाचे दहन केले होते.

मनुस्मृती एकीकडे स्त्रियांची पुजा करावी असेही सांगते. त्याचवेळी स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये असेही बजावते. मनुस्मृतीचे भाष्यकार मेधातिथी यांच्यानुसार पुजेचा अर्थ शिक्षण, सत्ता, अधिकार किंवा मालमत्ता देणे असा नसून फक्त स्त्रियांना नटण्या मुरडण्याची मोकळीक द्यावी असा आहे. म्हणजे मग मनुस्मृतीच्या या वचनाचा अर्थ स्त्रियांना माणूस म्हणून अधिकार द्यावेत असा नसून, त्यांना फक्त शरीर असते आणि ते सजवण्याची त्यांनी खबरदारी घ्यावी असाच लावला पाहिजे.

पुरुषप्रधान मनोवृत्ती आजही आरपार बदलली आहे काय ? या प्रश्नाचे प्रांजळ उत्तर हेच आहे की नाही. गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स व पुण्याच्या पॉप्युलेशन रिसर्च सेंटरने अभ्यास करुन असे दाखवून दिले ओ की, ज्या जिल्हयात सोनोग्राफी केंद्राची संख्या जास्त आहे, तेथे ० ते ६ वयोगटातील बालक–बालिकांचे प्रमाण बिघडलेले आहे. आर्थिक व सामाजिकदृष्टया सुधारलेल्या पंजाब, हरयाणा, दिल्ली, चंदिगड, गुजरात आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांमध्ये मुलींच्या प्रमाणात प्रचंड घट झालेली आहे महाराष्ट्र राज्यातील ७८ टक्के सोनोग्राफी केंद्र ही मुंबई, पुणे, नाशिक, कोहापूरसह पुढारलेल्या १६ जिल्हयांत आहेत उर्वरित १९ जिल्हयांमध्ये २२ टक्के केंद्र आहेत. तसेच मनपा क्षेत्रात सुमारे ५० टक्के केंद्र आहेत. ही केंद्रे व मुलींचे घटणारे प्रमाण यातील थेट संबंध सिध्द झालेला आहे. मुलींचा होणारा छळ, स्त्रियांवरील अत्याचार यातून सुटका करण्याचा हा फारच नामी उपाय म्हटला पाहिजे. दि. ९ मे १९१६ रोजी डॉ.आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापिठात एक शोधनिबंध सादर करुन भारतीय जात वास्तव आणि स्त्रियांवरील बंधने यांचा संबंध उलगडून दाखवला होता. बालविवाह, विधवा विवाहाला बंदी, सती, केशवपन ही सारी बंधने जातिव्यवस्थेची अपत्ये असल्याचे त्यांनी दाखवून दिले होते. जाती निर्मूलन हाच स्त्री–पुरुष समता स्थापित करण्याचा राजमार्ग आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले होते.

महाडला स्त्रियांच्या परिषदेत बोलताना डॉ.आंबेडकर म्हणाले होते, घर प्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात त्याचप्रमाणे समाजाचा अडचणी सोडविल्या पाहिजेत. तुम्ही सर्वांनी जुन्या व गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत. वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पध्दतीने लुगडी नेसतात त्या पध्दतीने तुम्ही नेसण्याचा प्रघात पाडला पाहिजे. दागिना घालायचा झाला तर तो सोन्याचा करुन घालावा, नाही तर घालू नये. त्याचप्रमाणे स्वच्छतेने वागण्याची खबरदारी घ्या. तुम्ही घरच्या गृहलक्ष्मी आहात. घरात कोणतीही अमंगळ गोष्ट होऊ न देणे याबद्दल तुम्ही काळजी वाहिली पाहिजे. आपली पुढील पिढी जर तुम्हाला सुधारावयाची असेल, तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका.

पुरुष कार्यकर्ता घरातील महिलेला सोबत घेवून आल्याशिवाय त्याला कार्यक्रमाला प्रवेशच दिला जाणार नाही, असा बाबासाहेबांनी पक्ष संघटनेचा नियमच बनवला होता. त्याचे कडक पालन केले जाई. स्त्रियांच्या सहभागाशिवाय समाज परिर्वनाची चळवळ यशस्वी होऊच शकत नाही, असा त्यांचा दृढ विश्वास होता.

भारतीय राज्यघटनेत पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क स्त्रियांना देण्यास बाबासाहेब आग्रही होते. हिंदू कोड बिल (महिला हक्क कायदा) मंजूर होत नाही म्हणून केंद्रीय मंत्रिपद सोडणारे बाबासाहेब स्त्री हक्कांबाबत कोणतही तडजोड करायला तयार नव्हते. दि.२० जुलै १९४२ रोजी भाषणात ते म्हणाले होते, तुमच्या मुला–मुलींनी शिक्षण द्या.त्यांच्या मनात महत्वाकांक्षा रुजवा.ते मोठे होणार आहेत असे त्यांच्या मनात बिंबवा. त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा करा.लग्न करण्याची घाई करु नका.लग्न म्हणजे जोखीम (जबाबदारी) आहे. लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पेलण्याइतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लग्न लादू नका. जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, जास्त मुले जन्माला घालणे हा गुन्हा आहे. आपल्या लहानपणी तुम्हाला मिळू शकली त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या मुलांना देणे हे आई–वडीलांचे कर्तव्य आहे. सर्वात अधिक महत्वाचे म्हणजे लग्न झालेल्या प्रत्येक स्त्रीने पतीची मैत्रीण बनून त्याच्या कार्यात सहकार्य करावे. पत्नी नवऱ्याच्या बरोबरीची असते. ती गुलाम नसते. हे सांगणारे क्रांतिकारी बाबासाहेब जगातील सर्वच स्त्रियांना वंदनीय आहेत.

आजच्या स्त्री मुक्ती चळवळीने या दृष्ट्या बाबासाहेबांचा आदर्श घेतला तरच स्त्री पुरुष समतेची चळवळ गतीमान आणि आरोग्यदायी बनेल.

संपर्क क्र. ९४२१०८१२१४



सन १९४२ मध्ये नागपूर येथील अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



कोकणातील भूमीपुत्रांचा लढा आणि बाबासाहेब

श्री. कुमार कदम, मुख्य संपादक, महाराष्ट्र वृत्त सेवा, मुंबई.
संदर्भ सहाय्य : श्री. शशिकांत कदम, पडवे, ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. १७ सप्टेंबर,१९३७ रोजी तत्कालीन मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात (म्हणजे त्यावेळच्या राज्य विधानसभेत) 'खोती अंता'चे ऐतिहासिक विधेयक मांडले. या माहितीचा उल्लेख या अंकातील अन्य लेखात आलेला असेलच. पण डॉ.बाबासाहेबांनी कोकण प्रांतातील ठाणे, कुलाबा (आता रायगड) आणि रत्नागिरी (आता रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग) या जिल्हयात अस्तित्वात असलेली अन्यायी 'भूधारणा पध्दत' नष्ट करण्यासाठी जो पुढाकार घेतला त्यालाही फार मोठी पार्श्वभूमी होती. इतकेच नव्हे तर त्याकाळी खोती पध्दतीविरोधात झालेल्या जीवघेण्या संघर्षातील सहभागी व्यक्तींची यशस्वी वकीली करण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी सावंतवाडीसारख्या त्या काळातील आडवळणीच्या ठिकाणी जाऊन न्यायालयीन लढा दिल्याचा इतिहास मोठा रोमहर्षक आहे.

पडवे गाव विरुध्द सावकारशाही

सध्याच्या कुडाळ शहरापासून तेरा मैलावर वसलेल्या पडवे (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) या शेतीप्रधान गावात स्थानिक ग्रामस्थ आणि जमीनदार यांच्यात झालेला प्रदीर्घ संघर्ष याला एक मोठे ऐतिहासिक महत्व आहे.

पडवे ग्रामस्थ व तत्कालीन जमीनदार वराडकर यांचेमध्ये अनेक वर्षापासून एवढा टोकाचा संघर्ष सुरु होता की, हे प्रकरण महात्मा गांधी यांच्यापर्यंत गेले होते. पडवे गाव जमीनदाराच्या जाचातून हिंदी स्वातंत्र्याबरोबरच मुक्त होईल आणि हा मुक्ततेचा दिवसही लवकरच उजाडेल असा आशिर्वाद महात्मा गांधी यांनी पडवे ग्रामस्थांवरील तत्कालीन जमीनदारांनी केलेल्या अन्यायाची हकिकत ऐकून गावाला दिला.

पडवे हे गाव 'परब' या आडनाव असलेल्या बहुसंख्य कुटूंबाच्या मालकीचे होते. शेती, हा या लोकांचा मूळ व्यवसाय, तसा ऐतिहासिक पुरावा देखिल आहे. उपलब्ध असलेल्या माहितीनुसार सन १८२० च्या सुमारास परब घराण्यातील एका गृहस्थाने त्याच्याकडे असलेला पडवे गावातील शेवरे या नावाचा भूभाग (जमिनीचा थोडासा हिस्सा) नाडकर्णी या नावांच्या व्यक्तीकडे फक्त चारशे रुपयांस गहाण ठेवला होता. हा नाडकर्णी त्यावेळी पडवे गावाचा सरकारी सारा वसूल करणाच्या कामावर होता. पुढे काही वर्षे लोटल्यानंतर गहाणाची रक्कम अदा होण्यापूर्वीच नाडकर्णी याने शेवरेमधील ती जमीन लक्ष्मण ऊर्फ दाजी वराडकर या सावकाराकडे सुपूर्त केली आणि त्याचबरोबर त्याने त्याच्याकडे असलेले सदर गावातील सरकारी सारा वसुल करण्याचे कामही या वराडकर सावकाराच्या स्वाधीन केले. पुढे या धूर्त आणि कावेबाज सावकाराने गफलती करुन केवळ शेवरे भूभागच नव्हे तर संपूर्ण पडवे गावच आपल्या मालकीचे आहे, असा कागदोपत्री दावा केला. या सावकाराने आपल्या बौध्दिक व सांपत्तीक सामर्थ्याच्या जोरावर तोच त्या गावचा मालक असल्याचे आणि पडवे गावातील शेतकरी आपली कुळे असल्याबद्दलच्या नोंदी सरकारी कागदोपत्रात बेमालूमपणे करुन ठेवल्या. अशा प्रकारे आपल्या मानेभोवती कायद्याचा गळफास पडलेला असून तो घट्ट करण्यात येत आहे, या कृतीची जाणीव या अडाणी शेतकऱ्यांना फार उशिरा झाली. दरम्यान, त्यांना जमीनदारीच्या मालकी हक्काचा बडगा दाखविण्यात आला होता. पुढे सन १९०७ च्या सुमारास आधीच नानातऱ्हेची कारस्थाने करुन रचलेल्या पुराव्यांच्या जोरावर या वराडकरने हे पडवे गाव आपल्या मालकीचे आहे असा निर्णय सरकार दरबारी मिळविला. त्यामुळे आपली अक्षम्य फसवणूक झाली आहे, हे शल्य शेतकऱ्यांच्या अंत:करणातून नाहीसे झाले नाही. परिणामी, ते शेतकरी गावावरील आपले मालकीहक्क सोडण्यात बिलकुल तयार होईनात. अशा परिस्थितीत आणखी ३ ते ४ वर्षे लोटली तरीही वराडकर याला जमीन बळकावण्यात यश आले नाही. मात्र, ब्रिटीश मंडळी जमीनदारांना-सावकारांना नेहमीच पाठिंबा देत आणि सहकार्य करीत असत. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना त्यावेळी कोणीही वाली नव्हता.

शेतकऱ्यांवर भीषण हल्ला

वराडकर याला जमीन बळकावण्यात यश न मिळाल्यामुळे त्यांने सन १९११ च्या ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस बेळगाव जिल्हयातील मौजे कान्हुर या गावातून शंभर सशस्त्र बेरड व त्यांचे साथीदार असलेले इतर पाचशे लाठीधारी लोक गावात आणले. पडवे गावात येताच या आक्रमकांनी बंदुकीचे बार काढीत व ढोल वाजवीत गावातील निरपराध शेतकऱ्यांवर हल्ला केला. त्यांना मारझोड केली. कित्येकांना भाल्यांनी, कुऱ्हाडी व इतर शस्त्रांनी जखमी केले. बायका-मुले या भीतीने सैरावैरा पळू लागली. कान्हुर गावात एकच आकांत उडाला. त्याचबरोबर दाजी वराडकर याने दिलेल्या सुचनेवरुन या हल्लेखोरांनी, शेतकऱ्यांनी शेतामध्ये विविध पिकांची कापणी करुन ठेवलेला धान्यसाठा व इतर ठेवलेल्या सर्व वस्तू लुटुन नेल्या. तसेच काही गावातील ५० ते ६० लोकांना पकडून त्यांच्या डोक्यावर माडाच्या झाडांचे ओंडके ठेवुन त्यांची जवळच असलेल्या मौजे सुकळवाड या गावाच्या बाजारपेठेतून दाजी वराडकर यांच्या घरापर्यंत म्हणजे अंदाजे ६ ते ७ मैलापर्यंत वाजत-गाजत धिंड काढली. इकडे इतरही गावातील बरेच शेतकरी या हल्ल्यांत जबर जखमी होऊन विव्हळत पडले होते. त्यांना स्थानिक काही लोकांनी तशाही भीषण जखमी अवस्थेत डोलीतून कुडाळ येथील ग्रामीण रुग्णालयात नेले. परंतु दाजी वराडकर याच्या दमदाटीमुळे रुग्णालयातील डॉक्टरांनी त्या जखमींची साधी विचारपूसही न करता रुग्णालयामध्ये दाखल करुन घेण्यास नकार दिला. शेतकऱ्यांवर संस्थानातील एका जमीनदाराने बेरडांच्या टोळीकरवी केलेल्या प्रचंड आक्रमणाची दाद कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने घेतली तरच नाहीच, परंतु उलटे शेतकऱ्यांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेले अर्जसुध्दा दडपून टाकले. या क्रुर हल्ल्यानंतर सशस्त्र बेरडांची एक टोळी मौजे पडवे गावात कायमचीच ठेवण्यात आली. बेरडांकडून शेतकऱ्यांना शेती करण्यास, गुरे चारण्यास, लाकुडफाटा आणण्यास मज्जाव करण्यात

आला होता. वराडकर यांच्या चिथावणीने बायका-मुलींची विटंबना करणे, शेतकऱ्यांना मारझोड करणे, शेतकऱ्यांच्या मालकीच्या शेतातील आंबा, फणस, काजू, फळझाडे व फुलझाडे इत्यादी उपयुक्त झाडांची नासधुस करुन ती तोडणे, झाडांची विक्री करणे, वैगेरे हरप्रकारे गावातील गावकऱ्यांची छळवणुक करण्यात आली. यामुळे लोकांची उपासमार व कोंडी होऊन लोक बेजार झाले. शेवटी शेतकरी व गावकऱ्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन सन १९१३ च्या सुमारास दाजी वराडकर या सावकाराने त्यांच्याकडून कबुलायती लिहून घेतल्या आणि अशाप्रकारे शेतकऱ्यांवर सावकाराने तात्पुरता विजय मिळविला.

छळवणुकीचा विजयस्तंभ

पुढे, पडवे गावात ज्या ठिकाणी बेरडांकडून शेतकऱ्यांवर हल्ला चढविण्यांत आला त्याच ठिकाणी दाजी वराडकर सावकाराने एक भव्य बंगला म्हणजेच एक मोठी कोठीघर बांधले होते. त्या ठिकाणी रात्रीचे नाच-गाणे इत्यादी कार्यक्रम जमीनदारांच्या उपस्थितीत होत असत. (आता ती कोठीघर जुनी झाली असून जीर्ण स्वरुपात त्याचे फक्त अवशेष शिल्लक आहेत.)

सरकारकडे दाद मागणे

सन १९२३ मध्ये कै.श्रीमंत खेम सावंत ऊर्फ बापुसाहेब महाराज हे सावंतवाडी संस्थानच्या गादीवर आले. त्यावेळी पडवे ग्रामस्थांनी आपल्यावर झालेल्या जुलुमांची सविस्तर हकिकत त्यांना सांगितली. परंतु महाराजांची इच्छा असूनही ते याबाबतीतही काहीच करुन शकले नाहीत. त्याचे कारण संस्थानच्या सल्लागारांनी महाराजांना सल्ला देण्याच्या कामात प्रयत्नपूर्वक कसूर केली, हे होय. मात्र सन १९२८ च्या सुमारास त्यावेळचे दिवाण रावबहादूर रावण यांनी उभय पक्षात तडजोड करण्याची बरीच खटपट केली. परंतु आपल्या नेहमीच्या बेदरकारीने दाजी वराडकर सावकाराने ती धुडकावून लावली.



पडवे बचाव समितीचे अध्यक्ष रावबहाद्दूर सी. के. बोले यांच्या समवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.


पडवे गावच्या काही शेतकऱ्यांना नामोहरम करण्यासाठी त्यांच्या जमिनी ताब्यात मिळण्याचे हुकूमनामे मिळवून सन १९२८ सालापासून दाजी वराडकर याने शेतकऱ्यांची घरे-दारे पाडून जमिनी ताब्यात घेतल्या. अखेरीस परब नावाच्याच एका गृहस्थाचे घर आपल्या मदतनिसांसह उखडून काढीत असताना दाजी वराडकरची आणि ग्रामस्थांची चकमक होऊन त्यात दाजी ठार मारला गेला.

अशाच प्रकारचा 'सावकार विरुध्द ग्रामस्थ' असा आणखी एक संघर्ष पडवे नजिकच कुणकवळे गावातही सुरु होता. तेथे दाजी वराडकर याच्याच बाबा वराडकर या जमीनदार भाऊबंदाने अशाच पध्दतीने शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बळकावल्या होत्या. तेथे देखिल आपल्यावर होणाऱ्या छळाला आणि उपासमारीला कंटाळून शेतकऱ्यांनी आपापल्या जमिनी पडीत ठेवल्या होत्या. अनेक गावकरी उदरनिर्वाहासाठी गावाबाहेर गेले होते. गावात अशा प्रकारे सर्व दृष्टीने निराशाजनक परिस्थिती होती आणि त्याच दरम्यान गावचे जमीनदार बाबा वराडकर हा कुणकावळे गावी गेला असता त्याचा व त्याच्या कारकुनाचा खुन झाला. वास्तविक, बाबा वराडकर हा मुंबई विद्यापीठाचा पदवीधर होता व मालवण येथील टोपीवाला हायस्कुलचा मुख्याध्यापक होता. असे असूनही त्याला अखेरीस शेतकऱ्यांवर केलेल्या जुलुमाकरिता प्राणाचे मोल द्यावे लागेल.

कुणकवळे व पडवे या दोन्ही गावातील जमीनदाराच्या हत्येनंतर देशाच्या राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कायदामंत्री झाले. नंतर त्यांनी सर्व आरोपीच्यावतीने सेशन्स कोर्ट व वरिष्ठ कोर्टात हजर राहुन कायदे पंडितांच्या मदतीने न्यायालयातील खटल्याचे कामकाज चालविले होते. पडवे आरोपींना सेशन्स कोर्टात शिक्षा होताच मुंबईतील महाराष्ट्रीय जनतेत फार प्रक्षोभ निर्माण झाला. कारण ज्यावेळी ही केस कोर्टात चालू होती त्यावेळी कोणी जमीनदाराला मारले हे कोणीच कबुल करत नसल्यामुळे तत्कालीन न्यायाधिशांनी सर्वांनाच फाशी देणार असे सांगितल्यानंतर पडवे गावातील टिपगो (म्हादबा) हेरले या एका दलित व्यक्तीने स्वत:हून पुढे येऊन आपणच जमीनदाराला मारले असा कबुलीजबाब देऊन न्यायालयात कुऱ्हाड सादर केली. टिपगो (म्हादबा) हेरले याच्या या कबुलीजबाबानंतर न्यायालयाने त्याला फाशीची आणि इतर आरोपींना १० ते २९ वर्षपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. मात्र, टिपगो (म्हादबा) हेरले याला फाशीच्या शिक्षेतून सोडवून त्याचे प्राण वाचविल्यासाठी मुंबई शहरात पडवे बचाव समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे अध्यक्षपद रावबहादूर बोले यांनी स्वीकारले होते, तर रावबहादूर आवळे हे समितीचे उपाध्यक्ष, डॉ.जी.एम. भोसले हे खजिनदार होते. त्याशिवाय बी.डी. भालेकर, रगजी व परब हे कार्यवाह, भास्करराव जाधव, ए. एन. सुर्वे, रावबहादूर वंडेकर, ॲड.के.एस दौडकर असे अनेक कायदेपंडित आणि विविध क्षेत्रातील प्रसिध्द कार्यकर्ते या समितीचे सभासद होते. तत्कालीन मुंबई इलाख्यातील शेतकऱ्यांच्या मोठमोठया पुढाऱ्यांनी या पडवे बचाव समितीला विविध प्रकारे मदत करुन फाशी जाणाऱ्या शेतकऱ्यांना काळाच्या दाढेतून ओढून काढण्यास फार मोठी मदत केली.

पडवे बचाव समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सावंतवाडीचे संस्थानिक कै.श्रीमंत खेमसावंत (पंचम खेमराज) ऊर्फ बापुसाहेब महाराज यांच्यासमोर टिपगो (म्हादबा) हेरले आणि इतर आरोपींचे अपील चालविण्याची विनंती केली. त्यानुसार डॉ.आंबेडकर यांनी सदर खटला

(पान २५ वर)



भारताच्या शेतीसमस्यांचे जाणकार

प्रा. अविनाश डोळस, सदस्य सचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शेती उद्योग हा मानवी जीवनात सर्वात महत्त्वाचा उद्योग असून तो प्राथमिक व सर्वात प्राचीन असा उद्योग आहे. उद्योगांचे ते दोन भाग करतात. (१) प्राथमिक उद्योग (२) दुय्यम उद्योग. जमिनीपासूनच मानवास माती व पाणी प्राप्त झाले आहे. त्याच्या जगण्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक गरजा ते या जमिनीतूनच मिळवतो. पुढे जगण्यासाठी तो शिकार, मासेमारी, शेती उत्पादन, खनिज प्राप्ती या गोष्टी जमिनीतून घेवून उपजिविका करताना दिसतो. या घटकांपासूनच तो त्याच्या भौतिक गरजा भागवत असतो. म्हणून हे घटकही त्याच्या जगण्यासाठी संसाधने ठरतात. हा प्राथमिक उद्योग ठरतो. या संसाधनातून इतर उद्योगासाठी लागणारा कच्चा माल प्राप्त होतो व यापासून तो वस्तू उत्पादन करतो. त्यामुळे जमीन व त्यातून मिळणारे घटक हे या दोन्हीही उद्योगासाठी आवश्यक असतात. एवढेच नव्हे तर याशिवाय उद्योग उभे राहू शकत नाहीत. यात मानवाला आवश्यक असणारा अन्नपुरवठा करणारा उद्योग म्हणून शेती हा सर्वात महत्त्वाचा उद्योग असल्याचे आपले मत 'स्मॉल होल्डिंग इन इंडिया' या निबंधात मांडताना दिसतात. त्यामुळेच शेतीकडे व त्यापासून होणाऱ्या उत्पादनासंबंधी त्यांनी मांडलेले विचार हे मूलभूत व शेतीच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्याकडे आपले फारसे लक्ष गेल्याचे दिसत नाही.

भारतात शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नाने अनेक रुपे घेतलेली दिसतात. आजमितीस शेती किफायतदार न बनल्यामुळे हजारो शेतकरी आत्महत्या करताना दिसत आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेने याची जबाबदारी जनतेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी निवडून दिलेल्या शासनव्यवस्थेवर टाकली आहे. त्यामुळे सरकार वेळोवेळी या संकटातून शेती व शेतकरी मुक्त व्हावा यासाठी वेगवेगळ्या योजना पुढे आणते. कर्जबाजारी शेतकरी ही एक मुख्य समस्या आहे.ती सोडविण्यास कर्जमाफी हा एक उपाय शोधला जातो. पूर्वानुभव असे सांगतो की, हा तात्पुरता उपाय ठरतो. कायम स्वरुपाचा उपाय ठरत नाही. आज सरकार सुध्दा हाच मुद्दा पुढे आणताना दिसते. थोडक्यात, आज शेतकऱ्याला शेती किफायतशीर बनविण्यासाठी केवळ कर्जमाफी हा एकमेव मार्ग ठरत नाही. शेती व्यवसाय हा 'उद्योग' म्हणून जोपर्यंत आपण त्याच्याकडे बघत नाही तोपर्यंत त्यातील प्रश्न सुटत नाहीत व शेतीउद्योग उद्योग म्हणून शेतकऱ्याला परवडत नाही. हा उद्योग मानवाला अन्नपुरवठा करणारा अत्यंत गरजेचा उद्योग असल्यामुळे त्याच्याकडे अन्न उत्पादन उद्योग म्हणून पाहून त्याच्या समस्येकडे आद्य प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे, असा डॉ. बाबासाहेबांचा आग्रह आहे. हा उद्योग प्रत्यक्ष अन्ननिर्मिती करणारा असल्यामुळे त्याच्याशी संबंधित सर्व प्रश्नांचा विचार करुन त्या समस्यांचे निराकरण केले पाहिजे. कोणते उत्पादन करावे, या उत्पादनासाठी आवश्यक असणारी शेती (जमीन), तिचा आकार, तिचा कस, उत्पादन निर्मितीसाठी लागणारी साधने (उदा. बैल, नांगर, पाणी, मजूर इ.) या सर्व गोष्टींचा विचार करुन ती शेती किफायतदार होते किंवा नाही, हे ठरवून ती किफायतदार होत नसेल तर का होत नाही ?त्याची कारणे शोधून ती किफायतदार कशी होईल, यासाठी करावयाच्या उपायांचा विचार व त्याची उपलब्धता करणारी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. यासाठी एक जे कारण काही समित्यांनी व शेती अभ्यासकांनी दिलेल्या कारणांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'अल्पभूधारणा' व 'शेती एकत्रिकरण व विस्तार' या सूचविलेल्या उपायांची चर्चा या त्यांच्या निबंधात अत्यंत शास्त्रशुध्द व अभ्यासपूर्ण रितीने केलेली आहे.

डॉ. बाबासाहेबांना केलेल्या या चर्चेबाबत समजून घेण्यापूर्वी भारतीय संदर्भात शेती संबंधी जे निष्कर्ष वेळोवेळी मांडले गेले. त्याचा एक धावता आढावा घेतल्यास वावगे ठरणार नाही. स्वातंत्र्यानंतर नेमण्यात आलेल्या पाहिल्या 'गोरवाला कमिटी'ने भारतीय शेतकऱ्यांचे वर्णन करताना 'भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जातच मरतो.' अशा शब्दात त्याच्या विषन्न अवस्थेचे वर्णन केल्याचे दिसते. थोडक्यात शेतीसाठी लागणारे भांडवल त्याच्याजवळ नसल्यामुळे तो कर्जबाजारी होतो. व त्या कर्जातून त्याची कधीही सुटका होत नाही. यावर सरकारने वेगवेगळ्या संस्था उभारुन त्याची ही गरज भागविण्याची व्यवस्था केल्याचे दिसते. उदाहरणदाखल खाजगी सावकारांच्या चक्रवाढ वा अव्वाच्या सव्वा कर्जातून त्याला मुक्त करण्यासाठी शेतकऱ्याला पतपुरवठा करणाऱ्या सहकारी बँका, लँण्ड डेव्हलपमेंट बँक, पतपुरवठा करणाऱ्या सहकारी सोयायट्या यांचे जाळे उभे केले. त्यांनी शेतकऱ्यास भांडवल पुरविले. या व्यवस्थेलाही आता साठ-सत्तर वर्षे झाली, तरीपण शेतकऱ्यांनी खाजगी सावकारांकडून न परवडणारे कर्ज घेतले आहे व त्यातून तो जमिनीचा मालक म्हणून सात-बाऱ्यावरुन उडालेला दिसतो. असे का झाले ?याचा विचार आज केला पाहिजे. नव्या अर्थव्यवस्थेने व जातिव्यवस्थेने काही नवे प्रश्न निर्माण केले आहेत का ? शोध घेतला तर कारणे सापडण्याची शक्यता आहे.

डॉ. बाबासाहेबांना किफायतदार शेतीला आड येणाऱ्या काही बाबींची चर्चा या निबंधात केली आहे. त्यांच्या मते केवळ अल्पभूधारणा एवढे एकच कारण शेती किफायदार होण्यासाठी पुरेसे नाही. तसेच एकसंद



शेतीधारणा हेही कारण ठरत नाही. केवळ या दोन गोष्टींचाच विचार केला तर अल्पभूधारणा असलेल्या शेतीतही किफायतशीर शेती होऊ शकते. जपानसारख्या देशाचे उदाहरण ते देतात. तसेच एकसंद शेती असूनही ती बिगरफायदेशीर होऊ शकते. त्यासाठी शेतीधारणेपेक्षाही त्याच्या उत्पादनावरुन शेती ही फायदेशीर ठरते की नाही, हे ठरविले पाहिजे. केवळ अल्पभूधारणा हे बिगरफायदेशीर शेतीसाठी कारणीभूत ठरते हे 'बरोडा कमिटी'चे म्हणणे त्यांना पुरेसे व तर्कदृष्ट्या बरोबर असल्याचे वाटत नाही. प्रोफेसर जेवान्स व श्री. किटींजे यांनी मतांचा हवाला देवून ते असे म्हणतात की, अल्पभूधारणा व एकसंदभूधारणा यापेक्षाही ती किफायतशीर धारणा असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे असलेल्या विखुरलेल्या (scattered) भूखंडाला एकत्रिकरण (consolidation) करुन शेती फायदेशीर होते असे म्हणणे शंभर टक्के बरोबर आहे, याला कुठला आधार नाही. बरोडा कमिटीने consolidition या सूचविलेल्या उपायाला हे का करायचे याचे उत्तर सापडत नसल्याचा आक्षेप बाबासाहेबांनी घेतलेला आहे. भारतासारख्या देशात शेतजमिनीशी शेतकऱ्याचे केवळ व्यावसायिक नाते नाही तर भावनिक नाते आहे. शेतीच्या मालकीपेक्षाही आपल्या नावावर 'सातबारा' आहे. या मानसिकतेवर तो शेतीकडे पाहतो. त्यामुळे पिता गेल्यानंतर मुलं केवळ स्वतंत्र क्षेत्राचा विचार न करता सर्व शेतीमध्ये आपला हिस्सा असावा याला अधिक महत्व देतो. त्यामुळे ही प्रक्रिया होतच राहणार व एकसंद शेतीचे छोटे छोटे तुकडे होऊन ती आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होत नाही. होणार नाही. अर्थशास्त्रज्ञ ॲडमस्मितनेही ही गोष्ट मान्य केली असून ती 'The natural law of succession divides it like then among all children of the family' या शब्दांत मांडली आहे. १९२७ सालच्या सर्व्हेक्षणाचा दाखला डॉ. बाबासाहेबांनी भारतात असलेल्या अल्पभूधारकाचे चित्र आपल्यासमोर ठेवताना दिला आहे. पिंपळे सौदागर नावाच्या पुण्याजवळील शेतीचे वर्गीकरण केल्यावर एकूण शेतकरी कुटुंबाच्या संख्येपैकी १ ते २ एकर अल्पभूधारकांची संख्या १६४ तर २० ते ३० गुंठाधारकांची संख्या १३६ असल्याचे दिसते. यावरुन भारतातील शेती व त्याचे वारसाहक्काने होणारे विभाजन हे अल्पभूधारणा पध्दतीस जबाबदार असल्याचे मान्य करुन ही शेती आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसल्याचे मान्य केले आहेत. परंतु केवळ एवढेच कारण जे पुढे केले जाते ते पुरेसे नसल्याचे प्रतिपादन बाबासाहेबांनी केले आहे. श्री. किटींजे यांनी मांडलेल्या किफायतशीर भूधारणेच्या विचाराशी बाबासाहेब सहमती दर्शवितात. श्री. किटींजे म्हणतात 'a holding which allows a man chance of producing sufficient to support himself and his family in reasonable confort after paying his necessary expencess' या किफायतशीर शेतीसाठी काय केले पाहिजे याचा विचार मुख्य विचार म्हणून व्हायला हवा, असे त्यांचे म्हणणे आहे.

भारताची शेती ही किफायतदार होत नसल्याची कारणे अल्पभूधारणा, एकसंद भूधारणा ही नसून वेगळी असल्याचे ते नमूद करतात. त्यात (१) भारत हा कृषि प्रधान देश आहे. (२) जगामधील शेतीची तुलना करता या शेतीची उत्पादकता सर्वात कमी (निच्चतम) अशी आहे. त्यापैकी एक कारण भारतात शेतीवर अवलंबून राहणारी लोकसंख्या ७१.५ टक्के एवढी आहे. इंग्लंडमधील हीच संख्या १५.३ टक्के तर अमेरिकेत ती ३३.३ टक्के एवढी आहे. थोडक्यात जगातील कुठल्याही देशातील लोकसंख्येचा विचार केला तर भारतातील ही संख्या प्रचंड आहे, एवढेच म्हणता येईल. याचा अर्थ दुसऱ्या शब्दांत खूप मोठ्या प्रमाणातली लोकसंख्या ही शेतीची एवढी गरज नसताना त्यावर रिकामटेकडी अशी आहे. या शेतीवर मोठा बोजा आहे. हा ज्यादा बोजा कमी केल्याशिवाय शेती ही 'किफायतशीर' वा आर्थिकदृष्टया परवडण्यासारखी होणार नाही. म्हणून ही जादाची (Extra ,Idle) लोकसंख्या बिगरशेती उद्योगास वापरली पाहिजे. त्यासाठी भारतात औद्यागिककरणाची (Industrilization) गरज आहे. यासाठी उपजिविकेचे दुसरे साधन सरकारने उपलब्ध करुन दिले पाहिजे, त्यासाठी सुनियोजित विकास आराखडा बनवून तो अमलात आणला पाहिजे. हा उपाय बाबासाहेबांनी भारतीय संदर्भात विचार करुन सूचविला आहे. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, बाबासाहेबांनी सूचविलेला हा उपाय जागतिकीकरणाच्या अगोदरचा आहे. ज्या प्रक्रियेत औद्योगिकरण हे उद्योगाचे स्वरुप घेताना भरपूर प्रमाणात रोजगारनिर्मिती करत होता. आज बाजार अर्थशास्त्रात मनुष्यबळापेक्षा व मोठ्या कारखान्यापेक्षा सुटे सुटे उद्योग यास ग्लोबल अर्थशास्त्र समजले जाते. त्यातून मोठ्या प्रमाणात निर्मितीक्षम उत्पादने होत नाहीत. त्यामुळे आज शेतीवर बोजा कमी करण्यासाठी जेथे मनुष्यबळ वापरुन उत्पादन केले जाईल व त्यावर भर दिला जाईल अशी इंडस्ट्री जाणीवपूर्वक उभी केली पाहिजे. सरकार समोर हे आव्हान आहे.

डॉ. बाबासाहेबांनी याच निबंधात अल्पभूधारणेचे दुष्परिणाम सांगितले आहेत. ते सांगताना भारतीय समाजात विषम वाटप हा सामाजिक अर्थशास्त्राचा परिपाक असल्याचा एक मुद्दा मांडला आहे. त्या संबंधिचा विचार होणे आवश्यक आहे. भारतात नैसर्गिक संसाधनाचे वाटप समानतेच्या आधारावर झालेले नाही. त्यामुळे शेतीधारणाही सर्वांच्या वाट्याला आलेली नाही. काहींना आहे तर काहींना काहीच नाही, अशी ही वाटणी आहे. जातीव्यवस्थेने जातीनुसार व्यवसाय जन्मजात लादलेले आहेत.त्यामुळे हे व्यवसाय हे एका अर्थव्यवस्थेचे अंगभूत भाग आहेत. जमिनीच्या अल्पभूधारणाबरोबरच उत्पादन साधनापासून वंचित असलेला व मजूर म्हणूनही शेतीवर बोजा ठरलेल्या समाजातील मोठी लोकसंख्या ही उत्पादक शक्ती ठरण्यापासून वंचित होते. यांना जमिन देवून ती पडिक वा गायरान, देवस्थान जमीन, मठाला दिलेली जमीन उत्पादक घटक म्हणून उपयोगात आणली पाहिजे. त्याचबरोबर जमीनदारी पध्दत नष्ट केली पाहिजे. उपजादू जमिनीसाठी भांडवल पुरवठा व्यवस्था पुन्हा एकदा व्यवस्थित करणे गरजेचे आहे.

आजचा शेतकरी हा देखील जातीव्यवस्थेचा पर्यायाने सामाजिक अर्थशास्त्राचा बळी ठरला आहे. जातीचा बेगडी अभिमान, बेगडी प्रतिष्ठा,



स्वतंत्र भारताचे पहिले विधिमंत्री म्हणून शपथ घेताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

जातवृक्ष अभिमान या चक्रात तो अडकला आहे. त्यापैकी विवाहपध्दती हा एक बेगडी अभिमानापायी तो जास्तीतजास्त हुंडा देवून जावई खरेदी करण्यात प्रतिष्ठा मानतो, एवढेच नव्हे तर कर्ज काढून श्रीमंती दाखवण्यासाठी प्रचंड खर्चिक लग्नसोहळे करतोय, सुशिक्षित बेरोजगार जावई शोधून भरपूर हुंडा दिल्यावरही त्याच्या नोकरीसाठी फारसा पगार न देणाऱ्या भ्रष्ट संस्थांना शेती गहाण वा सावकाराला रजिस्टर करुन कर्ज काढून पैसे भरुन तुटपुंजा पगाराच्या नोकरीसाठी देतो. त्यातून तो शेतकऱ्याचा शेतमजूर होतो. या पायी तो स्वत:चे जीवनही संपवतो. सजातीय विवाहाच्या बंधनातून तो अजूनही सुटका करुन घेत नाही. जातीभिमानापायी शंभर दिडशे वर्षापूर्वी महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सांगितलेल्या सत्यापासून तो कितीतरी पटीने दूर आहे. जातीअंताच्या विचारावर तो अद्यापही येत नाही. जोपर्यंत शेती व शेती किफायतदार बनण्याचा विचार तो करत नाही तोपर्यंत यावर तोडगा निघत नाही. डॉ. बाबासाहेबांनी याच निबंधात आणखी एक मुद्दा चर्चिला आहे. किफायतदार शेती बनण्यासाठी शेती उत्पादनाची किंमत ठरविण्यासाठी उत्पादन खर्च + नफा = किंमतही ठरविण्याची व्यवस्था शेतकऱ्यांच्या हातात आल्याशिवाय भारतीय शेतकरी या बिगरफायदेशीर शेतीच्या चक्रातून सुटू शकणार नाही. त्यासाठी शेती हा उद्योग आहे व त्याच्या उत्पादनाची किंमत त्याच्या निर्मिती खर्चाचा विचार करुन नफ्यासह शेतीमालाची किंमत ठरेल अशी एक बाजारव्यवस्था निर्माण करावी लागेल, आज अल्पभूधारणा, पाणी, वीज, बियाणे, पाऊस यामुळे परावलंबी झालेला शेतकरी आणखी कंपन्यावर अवलंबून झाल्याने त्याचे स्वावलंबन नष्ट झाले आहे. डॉ. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे ही प्राथमिक अत्यावश्यक इंडस्ट्री आहे. अनादीकाळापासून ती चालत आलेली आहे. हीच मुख्य इंडस्ट्री म्हणून ती जगवीणे, वृध्दींगत करणे हे प्रश्न मानवी समाजाचे गांभीर्याने विचार करुन शेती कशी किफायतदार होईल हे पाहिले पाहिजे.

शेती व शेतीव्यवसाय याकडे डॉ. बाबासाहेबांनी खूप गांभीर्याने बघितले आहे. 'कसेल त्याची शेती' या न्यायाने त्यांनी भरमसाठ जमिन ताब्यात ठेवणाऱ्या खोती पध्दतीविरोधात सन १९३६-३७ मध्ये कोकणात मोठे आंदोलन केले आहे. पाटलांच्या घरी स्पृश्य-अस्पृश्यांच्या एकत्र पंगती बसून 'आम्ही तुम्ही भाऊ भाऊ' असा जातीअंताचा विचार दिला. या आंदोलनातून पुढे 'सिलिंग कायद्याची' पायाभरणी झाली. सन १९५३ मध्ये दादासाहेब गायकवाड यांच्यावर जमिन सत्याग्रहाची जबाबदारी देवून बाबासाहेबांनी मराठवाड्यात सत्याग्रह घडवून आणला. शेती व शेतीच्या प्रश्नावर राष्ट्रीय स्तरावर भूमिका घेतली. शेतीवरच्या लोकसंख्येच्या बोजाचा विचार प्रथमच मांडून २/३ लोकसंख्या ही केवळ शेतीवर अवलंबून आहे या जेम्स काइर्ड यांच्या सन १८८४ च्या अहवालाचा आधार घेवून भारताच्या या लोकसंख्येचे आणि जगातील इतर देशातील लोकसंख्येचे प्रमाण अधोरेखित करत हा बोजा इतर उद्योगधंद्यात वळविण्याचा विचार मांडला. तसेच भांडवल व साधने उपलब्ध करुन उत्पादन खर्चाच्या आधारावर शेतीमालाची किंमत ठरविली जावी, हा विचार सुध्दा बाबासाहेबांनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मांडून आजच्या शेतीच्या समस्यांची चर्चा करुन भारताला एक दिशा दिली आहे. **संपर्क क्र.** ९४२२२११६२०

(पान २२ वरून)

चालविला आणि टिपगो (म्हादबा) हेरले याची फाशीची शिक्षा रद्द करुन घेतली. टिपगो (म्हादबा) हेरले याला बापुसाहेब महाराजांनी जन्मठेपेची आणि इतरांना सश्रम कारावासाची शिक्षा दिली. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या सर्व आरोपींची मुक्तता करण्यात आली असे सांगण्यांत आले. या बापुसाहेब महाराजांच्या निधनानंतर त्यांच्याबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेले गौरवपर निवेदन आजही सावंतवाडीत स्मृतीस्तंभावर कोरलेले पहावयास मिळते.



तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसोबत डॉ. बाबासाहेब. डावीकडून शंकरराव खुणे, नारायण नागो पाटील, गोविंदराव आद्रेकर, चंद्रकांत अधिकारी, आणि सरखोत महादू रामजी टेंभे.

ब्रिटीश सरकारने खोतांना शेतसारा वसुल करण्याचा अधिकार देतानाच त्यांना आणि त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना भुधारक तसेच त्यांच्या कुटूंबियांशी वाट्टेल तसे वागण्याचे अलिखित विशेष अधिकारही बहाल केले होते. त्या अधिकाराचा खोत मंडळी सर्रासपणे दुरुपयोग करुन भुधारक आणि त्यांच्या कुटूंबियांवर सर्व प्रकारचे अन्याय, जुलूम करीत. ही बाब डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अभ्यासू आणि चाणाक्ष नजरेतून सुटली नव्हती. म्हणूनच त्यांनी खोती अंताच्या कायदेशिर लढयाचे नेतृत्व केले. त्यांचे यासाठीचे विधेयक स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या जमीनसुधारणा विषयक कायद्यांचा पाया घालणारे ठरले यात शंकाच नाही. विशेष म्हणजे आपल्या खोती अंताच्या विधेयकात डॉ. बाबासाहेबांनी खोतांनाही वाजवी नूकसानभरपाई देण्याची तरतुद करुन त्यांचेवर अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली हे विशेष !

संपर्क क्र. ९४०४५६३०१०/९८६९६१२५२६



शेतकऱ्यांचे नेते

श्री. प्रमोद जाधव, उपायुक्त, समाजकल्याण, रत्नागिरी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य बहुआयामी असे आहे. राज्यघटनेचे शिल्पकार, वंचित शोषित समाजघटकाचे नेते, प्रज्ञासुर्य असे विविध पैलू आपल्याला माहित आहेतच. मात्र, याचबरोबर ते सर्व जातीजमातीच्या शेतकऱ्यांचेही नेते होते. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे.

कोकणातील जुलमी खोती व सावकारांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी दोन दशके जनचळवळ उभारली. या चळवळीतील परमोच्च बिंदू म्हणजे चरी गावच्या परिसरातील चौदा गावांनी तब्बल सात वर्षे सावकारांच्या विरोधात प्रदीर्घ संप केला. या संपूर्ण जनचळवळीचा तपशील मोठा रंजक असा आहे.


खोती ऊर्फ गुलामगिरी

कोकणातील जमीन डोंगराळ आहे. तसेच एका बाजूला समुद्र व खाडी आहे. ही जमीन शेतकऱ्यांनी सपाट करून तसेच समुद्र खाडीला बंधारे बांधून लागवडीयोग्य केली. आदिलशाहाच्या काळापासून कोकणातील गावामधून जमीन महसूल गोळा करण्यासाठी खोतांची नेमणूक केली होती. खोतांनी ठराविक महसूल जमा करून राजाला भरायचा व त्यातील काही भाग स्वत:ला ठेवायचा अशी रचना होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात खोतांवर बंधने होती. तसेच त्यांनी वतने द्यावयाची पद्धत बंद केली होती. मात्र नंतर विशेषत: पेशवाईच्या काळात खोतांनी आपले हातपाय पसरले. महसूल जमा करण्यात मनमानी होऊ लागली. बहुतेक गावात खोत सावकार म्हणूनही कार्यरत होते. अशिक्षित जनतेला कर्ज देऊन त्याची दामदुपटीने वसुली होऊ लागली. हळूहळू बहुतांश जमीन खोतांच्या मालकीची झाली आणि मूळचे शेतकरी कूळ बनले. बहुतांश खोतांनी सुलतानाप्रमाणे वागण्यास व मनमानी करण्यास सुरुवात केली. खोतांनी विविध मार्गांनी बळकावलेल्या जमिनी कूळ कसू लागले. येणाऱ्या उत्पन्नातील बहुतांश वाटा खोत सावकाराला व अत्यल्प वाटा कुळांना मिळत असे. खोतांनी वेठबिगारी पद्धतही सुरू केली. खोतांच्या शेतावर दरवर्षी १० ते ६० दिवस नाममात्र मोबदल्यात राबावे लागे. चिखलप (ता. म्हसळा) येथील एका कुळाने वेठबिगारी करण्यास नकार दिला. त्यामुळे त्याला खोताने चाबकाने इतके मारले की, तो मृत्युमुखी पडला. कुळांच्या घरांजवळील फळे, कोंबड्या इत्यादी बाबींही खोत उचलून नेत. खोतासमोर तसेच गावात कुळांनी चांगले कपडे घालण्यास बंदी असे. कुळांनी छप्पर म्हणून कौले वापरण्यास बंदी होती. छप्पर म्हणून भाताचा पेंढा वापरणे सक्तीचे होते. हा पेंढा खोताकडूनच घ्यावा लागे. पेंढा एक वर्षातून खराब होतो. म्हणजे साहजिकच कुळांनी खोतांवरच अवलंबून राहावे, असा यामागे हेतू होता. खोतांकडे सत्ता व संपत्तीचे अवैध मार्गांनी केंद्रीकरण झाले होते. यामुळे विषमता पसरली होती. याची प्रचिती खालील दोन उदाहरणांवरून येईल.

१) भेंडखळ, ता. उरण या गावच्या परिसरातील एकूण ९६० एकर जमिनीपैकी ७०० एकर जमीन त्या गावातील सावकाराकडे होती.

२) कुलाबा (रायगड) जिल्ह्यात १९ व्या शतकात १,०४,९०८ शेतकऱ्यांकडे २,१३,१९९ एकर जमीन होती. याउलट खोत सावकार, जमीनदार अशांचा समावेश असणाऱ्या ५,६९३ व्यक्तिंकडे एकूण ४,०३,४४० एकर जमीन होती. विशेष म्हणजे सन १८७८ मध्ये कुलाबा (रायगड) जिल्ह्यात ५,९२७ सावकार होते.

या गुलामगिरीमुळे जनता त्रस्त झाली होती. याविरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी नारायण नागु पाटील (पेझारी), सुरबा नाना टिपणीस (महाड), भाई अनंत चित्रे यांनी व्यापक जनआंदोलन उभे केले. संपूर्ण कोकण भाग त्यांनी पिंजून काढला. भाई अनंत चित्रे स्वत: खोत होते. मात्र खोती पद्धतीमुळे निर्माण झालेली विषमता व अन्याय त्यांना सहन होत नव्हता. म्हणून ते या चळवळीमध्ये सहभागी झाले. या चळवळीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी ब्राम्हण, मराठा, कुणबी, आगरी इत्यादी तसेच अनुसूचित जातीतील शेतकरी होते. बाळा बेंडके व त्यांचा मुलगा हे चळवळीत आघाडीवर होते. खोतांना हे सहन न झाल्याने त्यांनी त्यांना जबर मारहाण केली. त्यात त्यांचा अंत झाला. खोतांनी त्यांचे घरदार, गुरेढोरे, विकली. अक्षरश: रस्त्यावर आलेला त्यांचा मुलगा त्यावेळी आजारी होता. तापाने फणफणलेल्या अवस्थेत श्री. भाई चित्रे यांना ही बाब सांगण्यासाठी तो निघाला. मात्र तोही मुखी पडला. काही जुलमी खोत आपल्या अधिकाराचा अतिरेक करून स्त्रियांचे शोषण करू शकत. खोतांच्या या विविध प्रकारच्या जुलमामुळे कोकणपट्टीतील वातावरण स्फोटक बनले होते. त्यातच दक्षिण कोकणातील तीन जमीनदार खोतांची हत्या कुळांनी केली. गावातील सुमारे २३ व्यक्तींवर खटला भरण्यात आला. या खटल्यात कुळांची वकीलपत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेऊन त्यांची बाजू प्रभावीपणे मांडली.



डॉ. आंबेडकर व त्यांचे कार्यकर्ते सुरबा नाना टिपणीस, भाई चित्रे, ना.ना. पाटील, शंकरराव खुळे, रावसाहेब भिलारे आदि प्रभूती.

चरीच्या शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप

चरी गावच्या परिसरातील शेतकऱ्यांची परिस्थितीही उर्वरित कोकणपट्टीप्रमाणे होती. बहुतांश जमीन सावकारांनी गिळंकृत केली होती. मूळचे शेतकरी त्यामुळे कूळ/भूदास अवस्थेत आले. सावकार एक लेखी करार (कबूलायत) करून घेऊन जमीन कुळांना कसायला देत. त्यातील अटी अतिशय जाचक असत. वीस मणांचा एक खंडी भात असे मोजण्याचे परिमाण होते. यातील बारा मण सावकाराला व आठ मण कुळांना मिळे. या आठ मणातील दोन मण धान्य पुढच्या वर्षासाठी बियाणे म्हणून ठेवावे लागे. म्हणजे प्रत्यक्षात सहा मण धान्य कुळांना मिळे. त्यावेळी धान्याचे आकारमान मोजण्यासाठी 'फरा' हे साधन वापरले जाई. यातही सावकार लबाडी करत. स्वत: धान्य घेताना ते अधिकृत फऱ्यापेक्षा मोठा फरा वापरत. याला सावकाराला पोसणारा म्हणून 'पोश्या फरा' म्हणत. मात्र कुळांना धान्य देताना अधिकृत फऱ्यापेक्षा लहान फरा वापरल्या जाई. याला शेतकऱ्यांना नाडणारा म्हणून 'नाड्या फरा' म्हटले जाई. एखाद्या वर्षी दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड असे कोणत्याही कारणामुळे उत्पन्न कमी आले तरीही सावकार त्याचा हिस्सा वसूल करत असे. या सावकारशाहीने त्रस्त होऊन सन १९०५ व १९१२ मध्ये वढाव (ता. पेण) येथे तसेच सन १९२१-२२ मध्ये वाशी (ता.पेण) येथे संप झाले. भेंडखळ (ता. उरण) येथेही संप झाला. मात्र ते फार काळ टिकले नाहीत. सन १९२७ मध्ये रावबहादूर श्री. सी.के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली कोकण प्रांत शेतकरी संघाची स्थापना झाली. दि. १४ एप्रिल १९२९ साली चिपळूण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद भरली. तर दि. २५ डिसेंबर १९३० रोजी पेण येथे नारायण नागू पाटील व भाई अनंत चित्रे यांच्या नेतृत्वाखाली कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद भरली. शेतकरी परिषदा, बैठका यांचा धडाका सुरू झाला. जनजागृती होऊ लागली. यामुळे ब्रिटिश सरकारने सन १९३२ साली शेतकरी संघ बेकायदा ठरविला.

चरी परिसरातील शेतकरीही संघटित होत होते. श्री. नारायण नागु पाटील यांनी शेतकऱ्यांच्या वतीने सावकारांकडे १२:८ या प्रमाणाऐवजी थोडा वाटा शेतकऱ्यांना वाढवून ११:९ असे प्रमाण करावे अशी मागणी सन १९३२ सालापासून सुरू केली. पण मुजोर सावकारांनी ही रास्त मागणीही फेटाळली. यामुळे संघर्ष करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आजूबाजूच्या गाव/पाड्यावरचे शेतकरी स्व. श्री. तुकाराम खंडू जाधव यांच्या अंगणात दिनांक २७ ऑक्टोबर १९३३ रोजी जमले. श्री. ना.ना. पाटील अध्यक्षस्थानी होते. त्यावेळी उत्पन्नाचा स्रोत म्हणजे शेती हाच होता. होणारे परिणाम व अडचणी यांचा सविस्तर विचार करून शेतकऱ्यांनी संप घोषित केला. संप म्हणजे कुणीही सावकारांच्या शेतावर जमीन कसण्यासाठी जायचे नाही. तसेच शेतीची अन्य अनुषंगिक कामेही करायची नाहीत. तसेच शांततामय मार्गाने संप करायचा हेही ठरविण्यात आले. संपाचे लोण आजूबाजूच्या १४ गावात पसरले. शेकडो एकर जमीन ओस पडली.

श्री. ना. ना. पाटील या काळात धीर देऊन मार्गदर्शन करत असत. उदरनिर्वाहाचा मुख्य स्रोत बंद झाल्याने शेतकऱ्यांच्या हालाला पारावार उरला नाही. जागोजागी फिरून कांदेबटाटे इत्यादी पदार्थ विकणे, मिळेल ते काम करणे या बाबी शेतकऱ्यांनी सुरू केल्या. पण चरितार्थासाठी त्या पुरेशा नव्हत्या. त्यातच ब्रिटिश सरकारने सावकारांची बाजू घेत शेतकऱ्यांवर कर्ज वसुलीच्या नावावर जप्ती आणणे सुरू केले. गुरेढोरे, भांडीकुंडी जप्त केली. पशुधन गेल्याने हालात अधिकच भर पडली. अशावेळी कॉ. ग. ल. पाटील हा युवक मुंबईतल्या कामगार वस्तीत फिरून मदत गोळा करून शनिवार, रविवार चरीला येत असे. मात्र आभाळच फाटल्यावर ढिगळ कुठे लावायचे अशी परिस्थिती निर्माण झाली होती. गणेश मोकल हा शहापूर गावचा गिरणी कामगार महिन्यातून दोनचार वेळा गावात येऊन चळवळीत भाग घेत असे व चळवळीची गाणी शिकवत असे.

उठाव झेंडा संपाचा । उठाव झेंडा बंडाचा
झेंडा अपुल्या रक्ताचा ।
शेतकरी स्वातंत्र्याचा, कामकरी स्वातंत्र्याचा ।
पिऊनी रक्त आपुले,
फार माजली सावकारशाही । फार माजली भांडवलशाही ।।
उडवून देण्या तिला एकदम । सुरू करा मोहिम आपुली ।।

लहान थोर शेतकऱ्यांना हे गीत स्फूर्ती देत असे. सन १९३४ साली शेतकरी संघावरील बंदी सरकारने उठवली. मग श्री. ना.ना. पाटीलांनी कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद चरी येथे भरवण्याचे निश्चित केले. त्याचे अध्यक्षस्थान भूषविण्याची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. सावकारांना ही बातमी समजताच त्यांनी बुद्धिभेद करण्यास सुरुवात केली. त्याकाळी जातीयता मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे श्री. ना. ना. पाटील हे आगरी जातीला बाटवीत आहेत. असा अपप्रचार सुरू केला. पण या अपप्रचाराकडे श्री. ना. ना. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी लक्ष दिले नाही. एवढेच नव्हे तर सामाजिक समतेच्या दृष्टीने एक पाऊल म्हणून शेतकरी परिषदेत सहभोजन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समुद्रमार्गे रेवस येथे दि. १६ डिसेंबर १९३४ रोजी आले. रेवस (बंदर), सारळ, हाशिवरे, नारंगी या गावोगावी त्यांचे शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने जमून स्वागत केले. सुमारे २००० शेतकऱ्यांनी पेझारी चरी या परिसरात शेतकरी मिरवणूक काढली. चरी येथील सभास्थानी सुमारे ६००० शेतकरी जमले होते. बाबासाहेबांचे भाषण सुरू होताच शेतकऱ्यांनी उत्साहात प्रतिसाद दिला. भाषणात त्यांनी पुढील मुद्दे मांडले. ''सद्यस्थितीत मूठभर लोकांकडे जमिनीची मालकी आहे, मात्र ते स्वत: कष्ट करीत नाहीत. मात्र जे शेतीत कष्ट करीत आहेत, त्यांच्याकडे जमीन नाही. या दोन्ही वर्गात संघर्ष आहे. गेली काही वर्षे चरीचे शेतकरी सावकार व जमीनदाराविरुद्ध संपावर गेले आहेत. अशाप्रकारचा वाद हा लवादामार्फत मिटविणे आवश्यक आहे. ज्यामध्ये दोन्ही बाजूकडील व्यक्तींना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळेल. शासनानेही यात लक्ष देण्याची गरज आहे. कोकणातील खोती पद्धतीमुळे शेतकऱ्यांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे याची मला जाणीव आहे, हा अन्याय यापुढे चालू देता कामा नये. या अमानवी पद्धतीच्या अत्याचाराला शासनही जबाबदार आहे. योग्य पद्धतीचा कायदा करणे हा या सर्व समस्यांवरील कायमस्वरूपी तोडगा आहे. यासाठी तुमच्या हितसंबंधाचे नेहमीच संरक्षण करणारे लोकप्रतिनिधी तुम्ही निवडणुकीत निवडणे आवश्यक आहे.''

बाबासाहेबांच्या या भाषणामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. शेतकऱ्यांच्या हिताचे विविध ठराव या परिषदेत मान्य करण्यात आले. काळ पुढे सरकत होता. मात्र महिन्यापासून महिने गेले तरी संप काही मिटेना.

या सर्व प्रश्नावर कायस्वरुपी तोडगा निघावा म्हणून बाबासाहेबांनी खोती पद्धती नष्ट करण्याचे व कसणाऱ्याला जमिनीचे मालकी हक्क द्यावे याबाबतचे विधेयक दि. १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत मांडले.

मात्र ते त्यावेळी मंजूर झाले नाही. त्यामुळे दि. १० जानेवारी १९३८ रोजी सुमारे १० हजार शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली मुंबईत काढण्यात आला. उन्हात रापलेले देह व फाटकीतुटकी वस्त्रे घातलेले दहा हजार शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. आपल्या व्यथा मांडण्यासाठी ठाणे, कुलाबा (रायगड), रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, नाशिक या जिल्ह्यातले शेतकरी यांत प्रामुख्याने सामील झाले होते.

खोती पद्धती नष्ट करावी, शेतमजुरांना किमान वेतन निश्चित करावे. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या शोषण करणाऱ्या खोती, वतनदारी, जमीनदारी या पद्धती मोबदला देऊन किंवा न देता रद्द कराव्यात. तसेच इतर मागण्या या मोर्चाद्वारे करण्यात आल्या. अशाप्रकारे 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व मांडण्यात आले. शासनाकडे बाजू मांडल्यानंतरच्या सभेत डॉ. बाबासाहेबांनी स्फूर्तीदायी भाषण केले. ''तुमच्या गरिबीचे मूळ कारण शोषणकर्त्या श्रीमंतांमुळे आहे. तुमच्यावरील अन्याय दूर होण्यासाठी जात–पात विसरून आपण एकत्र यावयास हवे. तुम्ही तुमचे खरेखुरे लोकप्रतिनिधी निवडले पाहिजेत. जेणेकरून जे धान्य पिकवतात व राष्ट्राची संपत्ती निर्माण करतात ते उपासमारीने मरणार नाहीत, तसेच त्यांना वस्त्र व निवाराही मिळेल.'' या जनआंदोलनामुळे डिसेंबर १९३७ मध्ये तत्कालीन महसूलमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी चरीला भेट दिली. नारायण नागू पाटील यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी संपात मध्यस्थी केली. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून लवादाचा निर्णय त्यांनी दिला. त्यात कुळाला १० मण व सावकाराला १० मण असे सूत्र मान्य करण्यात आले.

या तोडग्यानंतर जगातला एकमेव, शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप मिटला. मात्र समुद्र व खाडीच्या भरती ओहोटीच्या पाण्याने बांध फुटल्याने सर्व शेती खराब झाली होती. ती पूर्ववत करण्यासाठी शासनाने फडके स्कीम आणली. ही जमीन पूर्ववत होण्यास अजून ७ वर्षे लागली. अशी १४ वर्षे जीवन मरणाच्या संघर्षात गेले. या सात वर्षात शेतकऱ्यांची वाताहत झाली. चरितार्थाचा मुख्य स्रोत बंद झाला. अन्य स्रोत नसताना उपासमारीला लढवय्या शेतकऱ्यांनी कसे तोंड दिले याची कल्पनाही करवत नाही.

'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो बंड करून उठेल' हे बाबासाहेब वारंवार सांगत असत. त्याचे प्रत्यंतर चरी गावाच्या परिसरात आले.

या काळात लेकरांना खायला काय द्यायचे, याची मोठी कसरत माताभगिनींची झाली. तांदूळ संपले, गुरेढोरे सरकारने जप्त केली. अशावेळी घरात गुराढोरांसाठी ठेवलेला भाताचा कोंडा शिल्लक होता. जंगलात भोकर नावाची छोटी जंगली फळे आढळतात. पिकल्यावर त्यात थोडा बुळबुळीत पदार्थ असतो. हा पदार्थ व भाताचा कोंडा यापासून 'खापुर्ला' नावाचा पदार्थ मायभगिनीनी विकसित केला. आजही चरी परिसरात हा चविष्ट पदार्थ तयार केला जातो. उपासमारीच्या काळात इतरही पदार्थ विकसित झाले. मोरारजी भाई देसाईंनी चरीच्या संपात लवादाचा निर्णय दिला. मात्र खोती पद्धत बंद करणार नाही, असे जाहीर केले.

याच सुमारास स्वातंत्र्य जवळ येत चालले होते. दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारताचा राज्यकारभार कसा चालावा यासाठी घटना समितीची निर्मिती करण्यात आली. त्याच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. अत्यंत परिश्रमाने त्यांनी राज्यघटना निर्माण केली. दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करण्यात आले. त्यापूर्वी दिनांक २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचा अंतिम मसुदा सादर करताना त्यांनी संविधान सभेत भाषण केले. घटनेचे शिल्पकार म्हणून जबाबदारी पूर्ण केलेली असताना व आयुष्यात एक परमोच्च बिंदूवर असतानाही त्यांना चरी, कोकण व देशात असणाऱ्या विषम सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विसर पडला नव्हता. ते म्हणाले–

''प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या राजकारणातील समतेला आपण मान्यता देणार आहोत. सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत आहोत. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे.''

चरीच्या शेतकऱ्यांचा संप, खोतीविरुद्ध चळवळ ही अतिशय विषम लढाई होती. एकीकडे प्रबळ खोत, सावकार विरुद्ध दीनदरिद्री शेतकरी असा संघर्ष होता. खोतांची प्रबळ संघटना होती. ते खोती नष्ट करण्याचा प्रखर विरोध करत. श्री. मोरारजी देसाई व अन्य नेत्यांनीही खोती नष्ट करणार नाही. असे स्पष्टपणे सांगितले होते. पण बाबासाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वसामान्य माणूस जागा केला. जेव्हा माणूस जागा होतो तेव्हा तो प्रबळांवरही मात करतो, हे सिद्ध झाले.

चरीला भेट देणाऱ्या मोरारजी देसाईंनी लोकांच्या रेट्यामुळे तत्कालीन कुळकायद्यामुळे बदल सुचविले ते दि. २३ जुलै १९४८ सालच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले. त्यावर मोरारजी देसाई यांचीच स्वाक्षरी आहे.

खोती निर्मूलन अधिनियम शासनाने मंजूर करून दि. १५ मे १९५० पासून लागू केला. कुलाबा (रायगड) जिल्ह्यातील सुमारे १,२२,८६० एकर जमीन खोतांच्या मगरमिठीतून मुक्त झाली. चार शतकांच्या जुलमी पद्धतीचा अस्त झाला.

चरीच्या शेतकऱ्यांचा संप, खोतीविरुद्ध आंदोलन, देशात जागोजागीच्या शेतकऱ्यांचा असंतोष व बाबासाहेबांचा संविधान सभेतील इशारा या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व मान्य करण्यात आले. सुधारणासह कूळ कायदा दि. १ एप्रिल १९५७ पासून लागू करण्यात आला व हा दिवस कसणाऱ्यांचा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

या कूळ कायद्याच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात कुलाबा (रायगड) जिल्ह्यात दि. ३० सप्टेंबर १९६३ पर्यंत ८२,८३० कुळांना ठराविक रक्कम जमीनदारांना देऊन जमिनीचे मालकी हक्क मिळाले. तर संपात सहभागी शेतकऱ्यांच्या त्यागाला फळ मिळाले. आत्मसन्मानाने जगण्याचे साधन मिळाले. संपत्तीचे समन्यायी वाटप (Equitable Distribution of Wealth) झाले. याचे फार सकारात्मक व दूरगामी परिणाम झाले.

माझे पणजोबा स्व. तुकाराम खंडू जाधव या संपात पुढारी होते. पुढे कुळकायदा लागू झाल्यावर माझ्या आजोबांना सुमारे साडेचार एकर कोरडवाहू जमीन विकत मिळाली. चरितार्थासाठी स्वत:चा उत्पन्नाचा स्रोत निर्माण झाला. या जमिनीमुळे उपासमार टळली. यामुळे टप्प्याटप्प्याने प्रगती झाली. माझ्या वडिलांना भातशेतीमध्ये विक्रमी उत्पादन घेतल्याबद्दल राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. मी स्वत: स्व. तुकाराम जाधव यांचा पणतू आता उप आयुक्त, समाजकल्याण या पदावर काम करत आहे. तर त्यांचा अजून एक पणतू डॉ. विजय हा कुशल नेत्रशल्यविशारद (Eye-Cornia Specialist) आहे. आमच्या पूर्वजांनी केलेल्या त्यागाची मधुर फळे आम्हाला मिळाली. **(पान ५५ वर)**



लोकसंख्या वाढ, ग्रामीण विकास व औद्योगिकीकरणामधील योगदान

डॉ. विनोद अनाव्रत, प्रमुख शास्त्रज्ञ, राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र, अमरावती रोड, नागपूर

ज्या देशात जी सांस्कृतिक मुल्यव्यवस्था प्रबळ असते त्यानुसार समाजाची जडणघडण होत असते. कारण त्या संस्कृतीच्या अधिन राहूनच समाजव्यवस्था, राजकीय मुल्यव्यवस्था आणि एकंदर समाजजीवनाचे नियमन होत असते. भारतातील ग्रामीण भागात असलेल्या दारिद्र्याचे दृश्य कारण आर्थिक असले तरी प्रत्यक्षात ते दृश्य परिणाम आहेत. अशा विवंचनेतून नागरिकांना पर्यायाने देशवासीयांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सांस्कृतिक मुल्यव्यवस्थेनुसार प्रभावित होतात. या पार्श्वभूमीवर लोकसंख्या वाढ, ग्रामीण विकास, औद्योगिकीकरण या त्रयीचा परस्पर संबंध आणि त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनाकडे नुसत्या विद्वत्ता प्रचूरतेच्या दृष्टिकोनातून न बघता, त्या चिंतनामागची त्यांची भूमिका समजून घेणे जरुरीचे ठरते.

शेतीप्रधान देश आणि ग्रामीण विकास

भारत हा कृषिप्रधान आणि ग्रामप्रधानही देश म्हणविला जातो. जागतिक बँकेच्या सन २०१६ च्या अहवालानुसार ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे प्रमाण अमेरिकेत १८ टक्के, इंग्लंडमध्ये १७ टक्के, ब्राझिलमध्ये १४ टक्के, फ्रान्समध्ये २० टक्के तर जपानमध्ये केवळ ७ टक्के असून तेच प्रमाण चीनमध्ये ४४ टक्के आहे. कोणताही देश हा जसजसा विकासशील होतो तसतसा सकल राष्ट्रीय उत्पादनात 'कृषि' क्षेत्राचा वाटा घटून ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाणही कमी होत जाते. उदाहरणार्थ, वर्ष २०१६ मध्ये जर्मनीच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात कृषिचा वाटा केवळ ०.८ टक्के, अमेरिकेत १.१२ टक्के, इस्राईलमध्ये २.५ टक्के, तर चीनमध्ये १० टक्के आहे. परंतु भारतात मात्र कृषि क्षेत्राचा वाटा १७.४ टक्के एवढा आहे. त्यामुळेच कृषि क्षेत्रावर विसंबून असलेल्या श्रमजीवींचे प्रमाण भारतात सर्वाधिक (४९ टक्के) आहे. त्याखालोखाल चीन (३० टक्के), जर्मनी (१.६ टक्के), इंग्लंड (१.३ टक्के) आणि इस्राईल (१.१ टक्के) आणि अमेरिकेत केवळ ०.७ टक्के आहे. एकट्या कृषिक्षेत्रामध्ये ४९ टक्के एवढी श्रमशक्ती एकवटलेली असणे हेसुद्धा भारताच्या मागासलेपणाचे लक्षण आहे. म्हणून भारताचे कृषिप्रधान तसेच ग्रामप्रधान असणे ही काही अभिमान बाळगण्यासारखी बाब नाही. परंतु सम्यक आकलनासाठी अपरिहार्य असलेल्या दृष्टीअभावी समस्येच्या परिणामांनाच समस्या मानू लागल्याने समस्यांच्या सोडवणुकीसाठी चुकीच्या दिशेने ऊर्जा खर्च करणे सुरू होते.

भारतात शेतजमिनीवर अवलंबून असलेल्या शेतकरी आणि शेतमजुरांची लोकसंख्या अधिक आहे. ही निर्भरता कमी केली जाणे आवश्यक आहे. कारण ''भारताची लोकसंख्या दर दहा वर्षाने भौमितीय दराने वाढते. या असिमित लोकसंख्या वाढीच्या तुलनेत लागवडीसाठी केवळ मर्यादित जमीन नसून अशी मर्यादित जमीन आहे की, जिची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत आहे. एकीकडे लोकसंख्येची आनुक्रमिक वाढ तर दुसरीकडे जमिनीची आनुक्रमिक घटती उत्पादकता अशा कचाट्यात भारत दोन्ही बाजूने अडकला आहे.''१. परिणामत: दशकाच्या शेवटी आपण लोकसंख्या आणि उत्पादनात उणे शिल्लक आणि सातत्याने आकसत जाणारे जीवनमान अशी अवस्था झाली. या कचाट्यातून बाहेर न काढता केल्या जाणाऱ्या उपाययोजना तकलादू ठरतील. म्हणून कृषिला उद्योगाशी जोडून कृषिवर सरळ विसंबून असलेल्या लोकसंख्येचा दबाव कमी करण्यासाठी भारताला औद्योगिकरणाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

आपण गावाला (खेड्याला) एक एकक समजायला हवे, हा मुद्दा घटना समितीच्या चर्चेत बाबासाहेबांनी मांडून वादळ निर्माण केले होते. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी शासन वीज, शिक्षणसंस्था, बँका, आरोग्यकेंद्र व परिवहनाच्या सोयी उपलब्ध करून देते. परंतु अशा व्यवस्थेमुळे समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा फायदा होण्याऐवजी गावातील काही निवडक लोकांचाच फायदा झाला. गरिबीरेषेखाली जीवन जगणारे शेतकरी, मजूरवर्ग ज्या स्थितीत होते ते तिथेच आहेत, उलट त्यांची आर्थिक स्थिती ढासळली व अज्ञानाला बळी पडून अजूनही त्यांचे शोषण सुरू आहे. कारण जोपर्यंत ही तथाकथित हीन कामे करणारा वर्ग खेड्यात वास्तव्याला आहे, तोपर्यंत वर्णाधिष्ठीत छळातून आणि वर्ण/वर्णबाह्य नियत कर्मातून त्यांची मुक्ती नाही. यावर तोडगा म्हणून भारतातील खेड्याच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनाद्वारे जे प्रयत्न केले जातात त्याचा पाया 'सामाजिक न्याय' च असायला हवा असे प्रतिपादन बाबासाहेबांनी केले. कारण 'वर्तमानातील समाजव्यवस्था ही जाती व्यवस्थेला खतपाणी घालणारी तर आहेच, शिवाय त्यामुळे कृषिच्या प्रगतीत सुद्धा अडसर निर्माण करते' असे त्यांचे मत होते.

कृषित्तर उद्योगात समायोजन याचा अर्थ, ग्रामीण भागाचे गुणगान आणि खेडे स्वयंपूर्ण व्हावे वगैरेचा जो आलाप केला जातो, तो किती वरपांगी आहे; याची आपल्याला कल्पना येऊ शकते. कारण समजा खेडी स्वयंपूर्ण झालीत, पण त्या खेड्यातील लोकांचे मानस तसेच राहिले तर काय होईल? म्हणून जमिनीचे नुसते एकत्रीकरण करणे हा बाबासाहेबांचा मुद्दा नव्हता. कारण शेतीयोग्य प्रत्यक्ष उपलब्ध जमिनीवर खूप सारे शेतकरी/रोजमजूर विसंबून राहणे, याचा अर्थ खूप साऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांचे श्रममुल्य हे पुरेशा प्रमाणात न वापरणे ठरेल. म्हणजेच या अतिरिक्त लोकसंख्येचे कृषिव्यतिरिक्त अन्य दुसऱ्या उद्योगात समायोजन करणे हा त्यावरचा प्रभावी उपाय आहे. त्यामुळे जमिनीच्या ज्या किमती आहेत; त्यासुद्धा आटोक्यात येतील असे त्यांचे मत होते. अशाप्रकारे कृषिशी उद्योगाचे नाते हे अशा परिवर्तित स्वरूपात स्थापन होणे आवश्यक आहे. कारण शेती हे आपल्या देशातील बहुतांश शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. मात्र कृषिक्षेत्र हे भारतीयांच्या दैनंदिन जगण्याशी निगडीत आहे. कृषिक्षेत्र हे सर्व प्राथमिक तसेच दुय्यम उद्योगांशी निगडीत असले तरी, या क्षेत्रात राबणारा वर्ग दुर्लक्षीत आहे.

म्हणून जमीनदारी प्रथा नष्ट करणे हा उपाय नसून शेती ही शासनाच्या

मालकीची असण्यासोबतच देशाच्या वैचारिक चारित्र्यात बदल घडवून आणल्याशिवाय परिवर्तन शक्य नाही, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. कारण सामूहिक शेती कम्युनिस्ट रशियात यशस्वी ठरली. परंतु भारताचे सामाजिक चारित्र्य हेच मुळात सामुदायिक स्वभावाचे नसून ते व्यक्तिवादी आहे. त्यामुळे भारतातील काही राज्ये उदा. बिहार, राजस्थान, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश येथील भूमिहीन शेतकरी जेव्हा आपल्या शेतात काम करून त्याद्वारे उपजीविकेचे साधन मिळविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा संघटित जमीनदारवर्गाच्या सशस्त्र सेना त्यांच्यामध्ये सामूहिक दहशत निर्माण करतात. शेतमजुरांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे हे वर्णव्यवस्थेच्या हितसंबंधाना बाधा आणणारे कृत्य वाटते. त्यामुळे त्यांना तिथेच खितपत ठेवण्याची सामाजिकस्तरीय धार्मिक मनोवृत्ती कार्यरत आहे. म्हणून शेतीच्या राष्ट्रीयकरणाचा सर्वाधिक लाभ शोषित–पिडीत आणि भूमिहीन जनतेला होऊन ते तर स्वावलंबी होतीलच, शिवाय देशातील कृषिउत्पन्नात वाढ होऊन राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात कमालीची भर पडेल, अशी डॉ. आंबेडकरांची भावना होती. श्रमिकांना कृषिव्यतिरीक्तच्या उत्पादन प्रक्रियेत सामावून घेतल्यास एका दगडात दोन पक्षी मारल्यासारखे होऊ शकते.''सीमांत आणि लहान भूधारणा हे जर कृषिक्षेत्राच्या आजाराचे कारण असेल तर त्यावर निर्विवाद उपाय म्हणजे औद्योगिकीकरण होय.''२. कारण त्यामुळे कृषियोग्य जमिनीवरील अनावश्यक ताण कमी होईल आणि त्यासोबतच जमिनीचे अवाजवी मूल्यही कमी होईल. त्याव्यतिरिक्तच फायदा म्हणजे, जे श्रमिक शेतीच्या आश्रयाने जगताहेत ते अधिक उत्पादन करू शकतील आणि अधिक उत्पादन म्हणजेच अधिक भांडवल हे समीकरण आहे.

वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी (१२१ कोटी) ७० टक्के (८३.३ कोटी) ग्रामीण तर ३० टक्के (३७.७ कोटी) लोकसंख्या शहरी भागात राहते. स्वातंत्र्योत्तर काळात हे प्रमाण ८०:२० एवढे होते. देशाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरण आवश्यक असले तरी त्याचे प्रमाण ग्रामीण भागात कमी झाल्यास लोकांचा लोंढा गावांकडून शहराकडे येणे अटळ असते. आर्थिक विकासाचा वेग औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांनाच कायम ठेवणे शक्य असल्याने लोकसंख्येची कृषिवरील अवलंबिता घटवून ती औद्योगिक तसेच पूरक क्षेत्रात समायोजित करणे आवश्यक असते. ते हेरूनच भारताला भेडसावणाऱ्या समस्यांकडे समग्र दृष्टिकोनातून बघण्याची दृष्टी बाबासाहेबांनी दिली. ग्रामीण भागात नुसताच राब राब राबणारा शेतकरी आणि श्रमिक वर्ग हा शेवटी सुसंस्कृत जीवन जगण्याच्या मूल्यांपासून वंचित राहू नये ही त्यांची विवंचना होती. त्यामुळे कष्टांच्या रहाटगाड्यातून त्याची मुक्ती करण्यासाठी तसेच वर्षभर रोजगार उपलब्ध होण्यासाठी औद्योगिकरणाला चालना देऊन कृषि क्षेत्रातील श्रमभार कमी करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्या श्रमशक्तीचे समायोजन उद्योगाच्या क्षेत्रात केले जाणे अत्यंत जरुरी असल्याची त्यांची भूमिका होती. ते न झाल्यास, ग्रामीण भागातील धनदांडगे आणि धनवान यांच्यावर पराश्रीत राहणारा शेतकरी, मजूर हा शेवटी वर्णव्यवस्थेच्या यथास्थितीवादालाच अप्रत्यक्षपणे खतपाणी घालणारा कारक ठरेल, याची त्यांना कल्पना होती.

ग्रामीण विकास आणि औद्योगिकीकरण

वर्षभर पुरेसे काम नसणे आणि मिळालेल्या कामाचा अपुरा मोबदला मिळणे ही ग्रामीण क्षेत्रातील गरिबीची दोन मुख कारणे आहेत. जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०१० मध्ये भारतातील केवळ ३५ टक्के जमीन खात्रीलायकरीत्या सिंचित केली जाऊ शकली. याचा अर्थ जिराईत क्षेत्र सुमारे ६५ टक्के असल्याने त्यातून कसेबसे एक पीक मिळते, ज्यामुळे शेतात ४ महिनेच काम असते. म्हणजेच शेतीपासून वर्षभर रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. दुसरी महत्त्वाची बाब अशी की, शेतीवर लोकसंख्येचा भार अधिक असल्याने तिथे काम कमी व त्यावर विसंबून असलेली माणसे जास्त अशी विरुद्ध स्थिती आहे. परीणामत: श्रमाचा मोबदला सुद्धा स्वाभाविकपणे कमीच मिळणार. त्याचप्रकारे शेतीत जे पिकते त्याला बाजारात स्पर्धा असल्याने हमी भावाचा प्रकार नसतो. (काही निवडक पिकांसाठी तो दिला जातो पण त्यातही सातत्य नसते). वाढत्या महागाईमुळे उत्पादनखर्च वाढला असून त्याप्रमाणात मालाला किंमत कमी असा प्रकार असतो. म्हणजेच शेतीला लागणाऱ्या कच्च्या मालासाठी जास्त दाम मोजावे लागणे, मात्र शेतात उत्पादित मालाला बरेचदा पडत्या दरात विक्री करावी लागते. म्हणून शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त बोजा कमी करणे अत्यावश्यक आहे. एवढेच नव्हे तर, औद्यागिकरणामुळे शेतीवरील दबाव कमी होऊन जमिनीच्या एकत्रीकरणाचा मार्ग प्रशस्त होईल, म्हणजेच औद्योगिकरणामुळे जमिनीचे एकीकरण होणार नाही, मात्र त्या प्रक्रियेला चालना मिळेल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्याअभावी ग्रामीण भागाचे वैचारिक मागासलेपण आणि आर्थिक सामाजिक रूढीवाद कमी होण्यास मदत होणार नाही. ग्रामीण भागात नुसते पक्के रस्ते, पिण्याचे स्वच्छ पाणी, मलनिस्सारणाची सोय, दुचाकी– चारचाकी वाहनांची संख्या वाढणे हे ग्रामीण विकासाचे लक्षण नाही. नागरी सुविधाची वाढ आणि जीवन जगण्याचा स्तर वाढणे यात मोठा फरक आहे.

दळणवळणाच्या सोयी आणि तंत्रज्ञानामुळे शहर आणि ग्रामीण भागातील अंतर कमी झाले असले तरी, मानवी संबंधातील अंतर मात्र कमी होत असल्याचे दिसत नाही. स्वयंकेंद्री आणि बंधुतारोधक वृत्तीमुळे ते अंतर उत्तरोत्तर वाढण्याची स्थिती विकसित होत चालली आहे. कृषि उत्पादनासाठी लागणाऱ्या आदानांचा खर्च वाढत आहे. त्यानुसार उत्पादन पण वाढत असले तरी खर्चाच्या प्रमाणात उत्पादनाला बाजारभाव मिळत नसल्याने बरेचदा शेती तोट्यात जाते. धान्याची कोठारे भरली असलेल्या भारतात म्हणूनच क्रयशक्तीअभावी लोकांना भूकबळी जावे लागते. विषम संपत्तीच्या वाटणीतून गरिबी आणि दारिद्र्य फोफावत आहे. काहींकडे भरपूर शेती तर काही शेतीहिन किंवा अल्पभूधारक असल्यामुळे सामाजिक व्यवस्थेतील सर्वात खालच्या वर्णा/वर्गाला आणि अवर्णीयांना त्याचा फटका बसणे क्रमप्राप्त आहे. अर्थात समाजातील आर्थिक व्यवस्थेच्या सामाजिक आजारामुळे हे घडून येत आहे.

औद्यागिकीकरण म्हणजे नुसते तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि मानवी संसाधनांची कमी आवश्यकता नव्हे. कारण अशाने नुसतीच भौतिक प्रगती दिसेल. म्हणून आर्थिक बदलाला तंत्रज्ञानाच्या सुधारणांची जोड आणि सोबतच सामाजिक बदल व त्यासाठी राष्ट्रीय अनुकूलशीलता सुध्दा आवश्यक आहे. पाश्चात देशातील विशेषत: फ्रान्स, इंग्लंड इथे त्यानुरूप एकिकृत प्रयत्नांमुळे तिथे क्रांती शक्य झाली. भारतात मात्र अजूनही राज्यघटनात्मकदृष्ट्या सरंजामशाही नसली तरी ती मानसिकदृष्ट्या जिवंत आणि प्रभावशाली असल्याचे दिसून येते. त्यामुळे समता, स्वातंत्र्य, बंधुतेच्या राज्यघटनात्मक मूल्यांविरोधात हीच मनोवृत्ती कार्यरत

असते. परीणामत: श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना जपण्याच्या वैचारिक द्वंदात बंधुतेची मूल्ये गौण ठरविली जातात. यास्तव,विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत सामाजिक समता मूल्यांना अंगीकारणारी वैचारिक क्रांती झाल्याशिवाय समग्र परिवर्तनाचे चक्र गतीने फिरणार नाही. म्हणूनच कृषिप्रधान अर्थव्यवस्था लयास जाऊन ती उद्योगप्रधान झाल्याने भारताचा विकास होणार नाही तर औद्योगिकीकरणासोबत सामाजिक मूल्यांमध्ये परिवर्तन घडून आल्याने ते शक्य होईल.

लोकसंख्या आणि ग्रामीण क्षेत्रातील दैनावस्था

आधुनिक वैद्यकीय सोयी आणि सुविधांमुळे जन्मदर वाढला, पण मृत्यूदर घटल्याने लोकसंख्या वाढीचा प्रश्न दीर्घकाळपर्यंत भेडसावणार आहे. शहरातील गरिबाचे मूळ मोठ्या प्रमाणात ग्रामीण क्षेत्रातील गरिबीत असते व ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या गरिबीचे मूळ ग्रामीण क्षेत्राच्या दैन्यावस्थेत असते. म्हणून अप्रत्यक्षपणे ग्रामीण क्षेत्रातील विकासावरच प्रत्यक्ष देशविकास अवलंबून आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या वाढीवर नियंत्रणाच्या उपाययोजनासुद्धा तशाच गांभीर्याने राबवाव्या लागतील. त्यासाठी जन्मदर, जो ग्रामीण भागात आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या नडलेल्या लोकसमुहात सर्वाधिक आहे त्याला घटविणे जरुरी आहे. शेतात कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याच्या संसाधनाच्या सोयी वाढवाव्या लागतील. कोणते पीक केव्हा घ्यायचे व कोणते घ्यायचे नाही तेही ठरवावे लागेल. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी जोडधंदे आणि अर्थ निर्माण करणारे प्रकल्प राबवीत अतिरिक्त हातांना काम द्यावे लागेल. म्हणजे बिगरशेती क्षेत्रात अनेक उत्पादक कामे हाती घ्यावी लागतील. अन्यथा आर्थिक विवंचनेतून सामाजिक समस्या आणि त्यातून मानसिक व परिणामत: एकंदर सामाजिक मागासलेपणा असे दुष्टचक्र कायम राहील.

लोकसंख्या नियंत्रणाबाबत दूरगामी विचार करून डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या (स्वतंत्र मजूर पक्ष) पक्षाचे प्रतिनिधी श्री. पी.जे. रोहम यांच्याकरवी दि. १० नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई विधिमंडळापुढे तसा प्रस्ताव मांडला होता. मात्र त्याला योग्य तो प्रतिसाद लाभला नाही. त्यावेळी महसूलमंत्री असलेले मोरारजी देसाई यांच्या मते आत्मसंयम हा लोकसंख्या नियंत्रणाचा प्रभावी मार्ग होता. सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री असलेल्या डॉ. गिल्डर यांनी तर विरोधासाठी जो युक्तिवाद दिला होता तो असा की, आपल्या देशाचे उत्पन्न लोकसंख्येपेक्षा जलद गतीने वाढत आहे. त्यांच्यासोबतच मार्क्सवादीसुद्धा होते. देशवासीयांच्या गरिबीसाठी भांडवलशाही जबाबदार असून उत्पादनाच्या साधनांची मालकी बदलविली की गरिबीची समस्या चुटकीसरशी सुटेल, अशी त्यांची नेहमीची भूमिका होती. मात्र संततिनियमन हे किती महत्त्वाचे आहे. याबाबतचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती प्रभावीपणे केला होता, याची प्रचिती त्यांच्या युक्तिवादावरून येऊ शकते. एवढेच नव्हे तर केवळ जीवन महत्त्वाचे नसून दर्जेदार जीवन जगणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटत होते.त्या अनुषंगाने ते एक प्रश्न विचारत, 'महत्त्वाचे काय आहे. जननप्रमाण की जगण्याचे प्रमाण (बर्थ रेट ऑर रेट ऑफ सरव्हायवल)?' तीनपेक्षा अधिक मुले होण्याची आपली प्रवृत्ती असेल तर तीनपुढील मुलांचा मृत्यूदर वाढत जातो. (म्हणून) जननदरापेक्षा जगण्याचे प्रमाण अधिक महत्त्वाचे आहे. दीर्घकाळाचा विचार करता, संततिनियमनानेच मागासवर्गीयांचे भले होईल, त्यांचे आरोग्य व सांपत्तिक स्थितीही सुधारेल'' अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. सन १९३८ मध्ये संततिनियमनाच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेले स्वानुभूतीच मनोगत सुध्दा अत्यंत महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, ''मला पाच मुले झाली, पैकी चार मेली. त्याबद्दल मला आता वाईट वाटत नाही. उलट, मला एकप्रकारे आनंदच वाटतो आहे. पाचही मुले जगली असती तर आज त्या सर्वांचे खाणेपिणे व शिक्षण यांचा बोजा माझ्यावर पडला असता व ते मला फार त्रासाचे झाले असते.''३.

त्यामुळे लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवले नाही तर, कोणताही उपाय हा तात्कालिकच ठरेल. परंतु याबाबत राज्यकर्ते हे वेळखाऊ भूमिका घेण्यातच अधिक रुची दाखवीत असल्यामुळे राष्ट्रविकास म्हणजे काही अल्पांची प्रगती आणि बहुतांची अधोगती असे चित्र देशहिताचे ठरू शकणार नाही. कारण ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढते त्याप्रमाणात धान्याचे उत्पादन वाढू शकत नाही. परिणामत: मग अनुवंशीकरित्या परिवर्तित अन्नधान्याचे निर्माण आणि त्याच्याशी निगडीत व्याधी इत्यादींवर विरोध, चर्चा अशा बाबी या अनुषंगाने पुढे येणे क्रमप्राप्त आहे. अर्थात शिक्षणाचे प्रमाण अधिक असलेल्या देशात संख्येऐवजी दर्जाचाच विचार प्राधान्याने केला जातो. त्यामुळे भारतात सर्वांना शिक्षणाच्या आणि पर्यायी रोजगाराच्या समान संधी निर्माण झाल्यास राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेला अधिक गती येईल. कारण जीवन जगण्याचा स्तर महत्त्वाचा असण्याबाबतची जाणीव शिक्षणातून (प्रत्यक्षात मूल्यशिक्षणातून) निर्माण होणाऱ्या अंत:दृष्टीतून येते. ती अंतदृष्टी विकसित करणारे शिक्षण आणि ग्राम तसेच शहरी विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत धोरणांनुसार निर्देशित केल्यास भारताचा विकसनशीलचा शिक्का लवकर पुसला जाऊन विकासशील देश म्हणून नाव कमावेल.

कृषि तंत्रज्ञान प्रसार आणि ग्रामविकासाचे मिथक

दरवर्षी भारतात देशाच्या राजधानीपासून ते राज्य आणि जिल्हा तसेच तालुकास्तरावर सुध्दा कृषि तंत्रज्ञान प्रदर्शनी आयोजित केल्या जातात. त्यामागची रूढमान्य भूमिका जी सांगितली जाते ती अशी की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची प्रगती, त्यायोगे शेतकरीवर्गाला लाभ आणि परिणामत: उन्नत कृषि आणि सुखी शेतकरी तसेच समृद्ध ग्रामीण जीवन असे समीकरण प्रचारित केले जाते. परंतु भारतीय कृषि आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर हा उपाय खरोखरच प्रभावी आहे की नुसता वरवरची मलमपट्टी करणारा याची प्रचिती डॉ. आंबेडकरांच्या अतिशय मूलगामी चिंतनातून पुढीलप्रमाणे व्यक्त होते. ''प्रत्येक दशकात लोकसंख्या आणि उत्पादनामधील उणे शिल्लक भयावह प्रमाणात वाढत असून भारताला गरिबी, अधिक गरिबी आणि जुनाट गरिबीचा वारसा मागे ठेवत आहे. कुजण्याची सुरुवात झाली आहे. ही कुज कृषि प्रदर्शनी किंवा प्राणी प्रदर्शनी भरवून अथवा चांगल्या उर्वरकांच्या वापराचा प्रचार करून थांबविली जाऊ शकणार नाही, हे मी खात्रीने सांगू शकतो. शेती फायद्याची झाल्या/केल्यानंतरच ते थांबविले जाऊ शकते. औद्यागिकीकरणाच्या बाजूने गंभीर उपायांशिवाय भारतीय शेती फायद्याची करण्याच्या शक्यता निर्माण होऊ शकणार नाही. ज्या अधिकच्या लोकसंख्येचा दबाव जमिनीवर पडतो तिला कृषिव्यतिरीक्तच्या लाभदायक व्यवसायात वाहून नेणे केवळ औद्योगिकीकरणामुळेच शक्य आहे.''४.

अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात ज्या उपाययोजनांमुळे प्रगती शक्य झाली, त्याचा जसाच्या तशा अवलंब करण्याचा प्रयत्न केल्यामुळे इथे विकास शक्य

होऊ शकत नाही. कारण अमेरिकेत कृषिच्या भरभराटीसाठी, तंत्रज्ञान प्रसाराच्या ज्ञानासोबत उत्पादनाची आदाने आणि उन्नत तंत्रज्ञानाची जोड दिल्यास कृषि विकास होतो या प्रमुख प्रमेयाचे मॉडेल भारतात अवलंबिले गेले. सत्तरच्या दशकातील प्रशिक्षण आणि भेट योजनेचा अवलंब हे त्याचेच फलस्वरूप होते. परंतु भारतीय समाजव्यवस्था ही थरीकृत आणि स्तरीकृत असल्याकारणाने तंत्रज्ञानाचा प्रसार सुलभतेनी सर्व समाजात होण्यास स्वाभाविक अडसर होते. त्या अडसरांना दूर करण्याच्या उपाययोजना सामाजिक मुल्यव्यवस्थेशी निगडीत असल्याने शासकीयस्तरावर शक्य नव्हत्या, हे मान्य. पण त्या मॉडेलमुळे काय झाले? प्रगत तंत्रज्ञानाचा खरा लाभ आधीच सधन असलेल्या शेतकऱ्यांनी लाटला. त्यामुळे ग्रामीण भागात असलेली आर्थिक दरी अजून रुंदावत गेली. ज्याकडे सुरुवातीच्या काळात म्हणजेच उत्पादन वाढीच्या झगमगाटात दुर्लक्ष केले गेले. परंतु पंजाब, हरियाणासारख्या राज्यातील हरितक्रांतीच्या अनुषंगाने समीक्षा करताना त्याचे पूनर्विवेचन करण्याची गरज असल्याची परखड मते अभ्यासकांनी व्यक्त केली आहेत.

दुसऱ्या विश्वयुध्दा (सन १९३९-१९४५) नंतरच्या काळात भारताची पुनर्बांधणी करताना पश्चिमी देशांना ज्या समस्यांवर मात करून ते साध्य करायचे आहे तेच मापदंड भारताबाबत लावणे योग्य नसल्याचा पुनरुच्चार बाबासाहेब आंबेडकरांनी केला. ''अन्य देशात पुनर्बांधणीची समस्या ही उद्योगांच्या पुनर्वसनाची आहे. परंतु भारताच्या पुनर्बांधणीची समस्या, जशी मी पाहतो, ती मुख्यत: उद्योगांच्या पुनर्वसनाची आणि औद्योगिकरणापेक्षा भिन्न असून खऱ्या अर्थाने जुनाट गरिबीच्या निर्मूलनाची समस्या आहे.''५. कारण गरिबी ही गरिबांची समस्या नसून देशाची समस्या आहे, म्हणूनच ती देशवासीयांची समस्या आहे. परंतु भारतीय समाजमन हे त्या दृष्टिकोनातून बघायला अजूनही तयार नाही किंवा तसा त्यांचा मानस घडविला गेला नाही. त्यामुळे गरिबांना दान, गरिबांना मदत करणारे लोक, लोकसमूह त्याचप्रकारे गरिबांप्रति सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोनातून बघत त्यांच्यासाठी काही फुटकळ कल्याणकारी योजना राबवून कृतार्थ होणाऱ्या गैरशासकीय संस्था, संघटना देशाच्या विविध प्रांतात कार्यरत असलेल्या दिसतात.

भांडवली आणि सांसदीय लोकशाही या दोन्ही व्यवस्थेतील विरोधाभास समजून घेण्याची आवश्यकता डॉ. आंबेडकर विशद करतात. भांडवली व्यवस्थेत ''अपार संपत्ती आणि पराकोटीची गरिबी/दारिद्र्य तेही साध्या नव्हे तर अतिशय गंभीर स्वरूपात आपण बघतो. जे काम करीत नाही त्यांना संपत्ती आणि जे काम करतात त्यांना दारिद्र्य. दुसरा विरोधाभास हा राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेत आढळतो. राजकारणात समता, अर्थकारणात (अर्थशास्त्रात) विषमता, एक माणूस एक मत, एक मूल्य हे आपले राजकीय ब्रीद आहे. (पण) अर्थकारणाचे ब्रीद आहे- राष्ट्रीय ब्रीदाला नकार. विरोधाभास घालविण्याबाबत मतभेद असू शकतात. परंतु हे विरोधाभास आहेत यावर मतभेद असू शकत नाही.''६.

याचा अर्थ हे विरोधाभास तसेच ताटकळत ठेवून ग्रामीण विकास, ग्रामीण जीवनमान उंचावणे, अपुऱ्या रोजगाराची समस्या यावर मात दिली जाऊ शकत नाही. त्याचबरोबर नुसते औद्योगिकीकरण हा सुध्दा 'सर्व रोगांचे एकच औषध' सारखी हमखास उपाययोजना ठरविली जाऊ शकणार नाही. कारण वर्तमानातील खासगीकरणाच्या युगात उद्योगांना खासगी हातात सोपविण्याचे उपाय केले जात असताना, त्यावर शासकीय नियंत्रण न राहिल्यास शोषणाचे स्वरूप तेवढे बदलेल. मात्र ते दारिद्र्य घालविण्याबाबत ठोस काही निष्पन्न होण्याची आशा केली जाऊ शकणार नाही. कारण खासगी उद्योगात, नफा हे जरी केंद्रीभूत तत्त्व असले तरी, यापूर्वी विशद केलेल्या सामाजिक विरोधाभासाच्या विश्वात वावरणारे खासगी उद्योग असल्याने त्या मनोवृत्तीला चाप बसेल अथवा त्यावर संसदीय व्यवस्थेचे नियंत्रण राहील, अशी व्यवस्था जरुरी आहे.

समाज निर्माणातून रोष निर्माण

सामान्य लोकांना अशा विरोधाभासाची ढोबळ कल्पना येत असली तरी, त्यावर उपाययोजना मात्र त्यांच्या दृष्टिक्षेपाबाहेरच्या आहेत. म्हणूनच त्यांच्यासाठी पुरेसा निवारा, पुरेसे वस्त्र, शिक्षण, चांगले आरोग्य आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार या समस्यांना वगळून कोणत्याही परिवर्तनाची -कल्याणाची अशा करणे अयोग्य ठरेल, ही बाब डॉ. आंबेडकरांनी अधोरेखित केली. त्यामुळेच ''भारताचा औद्योगिक विकास हे ध्येय ठरविणे पुरेसे, असा कुठलाही औद्योगिक विकास हा सामाजिकदृष्ट्या वांछित स्तरावर कायम करावा लागेल, हे आपल्याला मान्य करावे लागेल.''७. याचा पुनरुच्चार त्यांनी केला. कारण नुसते उत्पादन आणि अधिक उत्पादन त्याचप्रकारे संपत्तीचे निर्माण यामुळे देशविकासाचा दर इत्यादिबाबत एक चांगले चित्र लोकांना दिसेल. तशी प्रतिमा लोकाभिमुख करून देशविदेशात आपली पत आणि दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला जाईल. विकासदर, एकूण सकल घरेलु उत्पादन (जीडीपी) इत्यादिबाबत आकडेवारी सादर करून जर उपरोक्त मूलभूत गरजांच्या पूर्तीबाबत जर अनास्था असेल किंवा त्या बाबी ताटकळत राहिल्यात तर त्याला नुसता आभासी विकास आणि तत्सम आभासी उन्नती म्हणावी लागेल. त्याबाबतची एक स्पष्ट वैचारिक आणि धोरणात्मक भूमिका बाबासाहेबांनी व्यक्त केली ती याप्रमाणे -''भारतात अधिक संपत्ती निर्माणासाठी आपली ऊर्जा कामी लावणे पुरेसे असणार नाही. चांगले आणि सन्मानजनक जीवनयापनासाठी भारताच्या संपत्तीत सर्व भारतीयांचा वाटा असण्याचा मूलभूत अधिकार केवळ मान्य करून चालणार/भागणार नाही तर असुरक्षितेच्या विरोधात त्यांचे संरक्षण करण्यासाठी मार्गिका आणि साधने निर्माण करावी लागतील''८.. याचा अर्थ भारताचा मग ते ग्रामीण असो अथवा शहरी क्षेत्र, समाजनिर्माणाच्या प्रक्रियेला गतिमान केल्याशिवाय गत्यंतर नाही. जोपर्यंत देशवासीयांमध्ये परस्पर सद्भावना निर्माण होणार नाही, तोपर्यंत भारताच्या मातीत संसदीय लोकशाही व्यवस्था सुध्दा दृढतेनी रुजण्याची स्थिती विकास पावणार नाही. यास्तव समाजाचे नियमन, काही मूलभूत मानवी तत्त्व जसे की समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यानुसार व्हावे यासाठी नियंत्रण आणि नियमनाची जबाबदारी ही संसदीय लोकशाहीवर म्हणून अंतत: राज्यकर्त्यांवरच येऊन ठेपते.

संदर्भ

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १०, १९९१, पृ. १२६ (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १, पृ. ४७८. (३) जनता १७/१२/१९३८ (४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १०, १९९१, पृ. १२७ (५) उपरोक्त (६) उपरोक्त, पृ. १०४ (७) उपरोक्त, पृ. १०५ (८) उपरोक्त

संपर्क क्र. ७७९८२५०५५५



शेतीविषयक विचार व कार्य

प्रा. डॉ. सरोज डांगे, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव



कृषिप्रधानतेचा वारसा भारताला अगदी प्राचीन काळापासून लाभलेला आहे. भारतातील सर्वात प्राचीन असलेली सिंधू संस्कृती नांगर संस्कृती म्हणून ओळखली जाते. या नांगरसंस्कृतीचे अवशेष आम्हाला आजही भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व्यवस्थेत रुजलेले दिसून येतात. प्राचीन काळात शेतीचा शोध लागला आणि भारतातील सामाजिक जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. याच कृषि व्यवस्थेमुळे स्थिर नागरी व कृषि जीवनाची परंपरा निर्माण झाली. कृषि परंपरेची ही लक्षणे भारतातील अनेक सण आणि उत्सवाच्या माध्यमातून जोपासली जातात. शेतीच्या हंगामी काळात अनेक सणाची निर्मिती कृषिप्रधान जीवनाची व प्रगत कृषि परंपरेची साक्ष देतात.

परकीय हल्ल्यांनी ही प्रगत नांगरी संस्कृती उध्वस्त केली. सिंधू संस्कृतीची लूट ही भारतीय कृषिप्रधान संस्कृतीला लागलेली ओहोटी होय. सिंधू संस्कृतीच्या मातृप्रधान संस्कृतीने कृषि संस्कृती ज्या प्रकारे जोपासली व प्रगत केली तसा कृषि विकास भारतात नंतरच्या काळात झालेला दिसत नाही. पितृप्रधान आर्य संस्कृतीच्या उदयानंतर समाज जीवन बदलले. अर्थव्यवस्था बदलली. भारतीय समाज व्यवस्था वर्णव्यवस्थेत परिवर्तित झाली. या बदलाचा परिणाम कृषि व्यवस्थेवर सुध्दा पडला. कृषि व्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी वर्ग हा परंपरेने शूद्र ठरविला गेला. या सामाजिक विकास प्रक्रियेत दास-शूद्रांची, गुलामगिरी, अस्पृश्यता, स्त्रीदास्य या सारख्या अमानुष प्रथा समाजात रूढ होत गेल्या. या प्रथांचे संवर्धन आणि अंमल करणारे सर्वात मोठे क्षेत्र हे भारतीय कृषिक्षेत्र राहिले आहे. यात आजही फारसा बदल झाला नाही. शेती क्षेत्रात शेतकरी कामगार वर्ग राबायचे, शेती करायचे ती राजा, उमराव, भूस्वामी, जमीनदार यांच्यासाठी; जे शेतीकामाला कनिष्ठ श्रेणीचे काम मानायचे. एवढे नव्हे तर कृषि व अंग मेहनतीची कामे करण्याची दास-शूद्र जातीवर्गाची जबाबदारी असल्याचे गृहीतक रूढ केले होते. १.

अशा प्रकारे कृषि व्यवस्था जी सिंधू संस्कृतीतील अर्थ व्यवस्थेचा कणा होती ती ढासळून या महत्त्वाच्या कृषि व्यवस्थेला दुय्यम दर्जा प्राप्त झाला. सिंधू संस्कृतीच्या विनाशानंतर कृषि व्यवस्थेला लागलेली ओहोटी पुढेही चालूच राहिली. मुस्लीम राजवटीतही पूर्वापार चालत आलेली शेती व सामाजिक व्यवस्था अबाधित राहिली. मुस्लीम राजांनी शेती क्षेत्राच्या उन्नतीसाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. शेतकऱ्यांच्या शोषणाची प्रक्रिया वाढत गेली.

भारतात परकीयांच्या शासनाचा तिसरा टप्पा ब्रिटिशांचा. ब्रिटिश काळात शेतकऱ्यांच्या शोषणाला उधाण आले. रयतवारी पद्धती याच काळात अंमलात आली. त्याच बरोबर जमीनदारी, सावकारशाही, नोकरशाही या सगळ्या जाचक पद्धतींचा उदय ब्रिटिश काळात झाला. या पद्धतींच्या उदयानंतर शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस व शोषणास अधिक बळकटी मिळाली.

आधुनिक काळात शेती संबंधी तंत्रज्ञान विकसित होत गेले मात्र, शेतकऱ्यांच्या शोषणात काहीच फरक पडला नाही. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत होत असलेल्या शेतकऱ्यांच्या शोषणाला कुणीही वाचा फोडली नाही. आधुनिक काळातील समाजसुधारकांनाही शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना दिसल्या नाहीत. मात्र, आधुनिक काळातील समाजसुधारक ज्यांनी भारतीय समाज व्यवस्था व वर्ण, जात व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास केला त्यात प्रामुख्याने महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची दखल घेतली. शेतकऱ्यांच्या शोषणाला वर्णव्यवस्था कशी जबाबदार आहे, याची चिकित्सा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न या महामानवांनी केला. सन १८८३ मध्ये महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांच्या तत्कालीन दारुण परिस्थितीचे चित्रण अतिशय मार्मिक नोंदविले आहे.

शेतकऱ्यांचे डॉ. आंबेडकर

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा उद्देश सामाजिक न्याय हाच आहे. त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानात देशातील शेतकरी, कुळे आणि शेतमजूर या सर्वांच्याच कल्याणाचे जातिनिरपेक्ष पातळीवरून आर्थिक चिंतन दडले आहे. डॉ. आंबेडकरांनी सन १९१८ मध्ये 'भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या लेखात भारताच्या शेतीप्रश्नावरील अत्यंत मूलभूत प्रश्नावर प्रकाश टाकला आहे.

डॉ. आंबेडकरांनी शेती समस्येवरील उपायासोबतच भूधारकांच्या शोषणाला मूठ माती देण्यासाठी खोती पद्धती विरुद्ध बंड करून दि. १७ सप्टेंबर १९३६ रोजी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धत रद्द करण्याविषयक विधेयक सादर केले. खोती अंताचे विधेयक सादर करून जमिनसुधारणेसाठी केलेले त्यांचे महत्त्वपूर्ण कार्य होय.

डॉ. आंबेडकरांनी दि. १० जानेवारी १९३८ रोजी मुंबई येथे आझाद

मैदानात कोकण, सातारा, नाशिक वगैरे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मोर्चा घडवून आणला. स्वतंत्र मजूर पक्ष व इतर शेतकरी संघटनांनी मिळून या मोर्चाचे नेतृत्व केले. डॉ. आंबेडकरांनी या मोर्चास मार्गदर्शनपर भाषण केले. तसेच दि. १० जानेवारी १९३८ राजी मुंबई सरकारच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळापुढे डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्या सादर केल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.२.

१) शेतकरी वर्गाला स्वतंत्रपणे व सुखासमाधानाने राहता यावे म्हणून जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्यालाच त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे.

२) जमिनीची मशागत करून तीवरच जगणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल व त्यांच्या आर्थिक हिताची व्यवस्था व्हायची असेल तर खोत–इनामदारांसारखे (जमीनदार) मध्यस्थ नसले पाहिजेत.

३) जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यावर कर अगर पट्टी बसविण्यापूर्वी त्याला चरितार्थापुरती योग्य ती सोय करून देणे हे सरकारने आपले कर्तव्य मानले पाहिजे.

४) त्याचप्रमाणे शेतमजुरांना किमान मजुरी देण्याची कायद्याने सोय करून त्यांच्या हिताला जपणे हे ही लोकमतवादी सरकारचे कर्तव्य आहे.

शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्या सरकारपुढे सादर केल्या. भारतीय इतिहासात शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणारे व त्याच्या मूलभूत मागण्या सरकारपुढे ठामपणे मांडणारे डॉ.आंबेडकर हे भारतातील पहिले समाजसुधारक होत याची प्रचिती येते. डॉ. आंबेडकरांनी सरकारला शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्याच पूर्ण करण्यासाठी सुचवीले नाही तर शेतकरी ज्या जमीनदारी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे बळी आहेत व ज्या अर्थव्यवस्थेमुळे त्यांची पिळवणूक व शोषण होते अशा सगळ्या बाबींतून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी, म्हणून काही तातडीच्या मागण्याही त्यांनी सरकारपुढे सादर केल्या. त्यांच्या तातडीच्या मागण्या पुढीलप्रमाणे...

१) ज्याप्रमाणे थकलेला शेतसारा माफ करण्यात आला त्याचप्रमाणे आजपर्यंतच्या थकलेल्या खंडाच्या बाक्याही ताबडतोब माफ कराव्या.

२) जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्नावर सारा माफ करावा व किमान उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या जमिनीवर वाढत्या मानाने साऱ्याची आकारणी करण्याच्या दृष्टीने जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे बाजारभाव उतरले असल्यामुळे ही दुरुस्ती होईपर्यंतच्या मुदतीत ज्यांना सालिना ७५ रु. अगर त्यापेक्षा कमी शेतसारा द्यावा लागतो. त्यांचा सारा ताबडतोब ५० टक्क्यांनी कमी केला पाहिजे.

३) खोती पद्धती व इनामदारी पद्धती या आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक व सामाजिकदृष्ट्या जुलमी असल्यामुळे या पद्धती भरपाईसह नष्ट करण्यासाठी कायदा करण्याची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. त्याचप्रमाणे कुळाकडून खंड वसूल करण्यासाठी व त्यांना छळण्यासाठी जमीनदार जे जे मदती दाव्यांसारखे जुलमी उपाय योजतील अगर योजण्याचा बेत करतील ते ते सर्व ताबडतोब बंद पडले पाहिजे व सरकारने यासाठी योग्य ती व्यवस्था करावयास पाहिजे.

४) (अ) तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम कूळ समजले जावे, असा कायदा सर्व जमीनदारांच्या कुळांना लागू केला पाहिजे. या कायद्याला बगल देण्याची कारवाई जमीनदारांना करता येऊ नये, म्हणून एक लॅंड कमिशन नेमण्यात यावे व या कमिशनच्या परवानगीशिवाय कुणाच्या अंगाखालील जमीन काढून घेतली जाता काम नये. कूळ जोपर्यंत खंड देत आहे तोपर्यंत त्याकडे तीन वर्षे असलेली जमीन कोणत्याही सबबीवर काढून घेतली जाता कामा नये. (आ) साऱ्याच्या मानाने फक्त तिसरा हिस्सा अधिक खंड घ्यावा. जास्त खंड कुळाकडून घेऊ नये.

५) लहान शेतकऱ्यांची पाणीपट्टी ५० टक्क्यांनी कमी केली पाहिजे. बहुसंख्य लहान–लहान शेतकरी व कुळे यांना फायदेशीर होईल, असे धोरण सिंचन खात्याने चालविण्याच्या दृष्टीने इरिगेशन कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे.

६) सर्व खेड्यांना चराई राने असावीत.

७) कर्जनिवारणाचा योग्य तो कायदा सर्वत्र लागू होईपर्यंत कर्ज तहकुबी जाहीर करावी.

८) शेतकऱ्यांच्या हातून सावकाराच्या हाती जमीन जाऊ नये ,या दृष्टीने सावकारीवर बंधन घालावे.

९) शेतकऱ्यांच्या निर्वाहासाठी लागणारी किमान जमीन व त्यांच्या चरितार्थाला लागणाऱ्या वस्तूवर सावकारी जप्ती आणण्यास बंदी झाली पाहिजे.

१०)वयात आलेल्या सर्व स्त्री–पुरुषांस मताधिकार.

११)वेठबिगार करून घेणे व बेकायदेशीर रितीने पैसे उकळणे हे फौजदारी गुन्हे ठरविले पाहिजेत.

१२)जमीन महसूल खात्यातील सर्व मॅजिस्ट्रेटी अधिकार काढून घ्यावेत.

१३)कसता येण्याजोगी सर्व पडीक जमीन उपरी शेतमजुरांना मोफत वाटून द्यावी.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या पिळवणुकीला जबाबदार असलेल्या सर्व परंपरा व कायदे रद्द करून कायद्यात बदल घडवून शेतकऱ्यांची खोत व सावकारापासून कशी सुटका होईल या अनुषंगाने सरकारपुढे तातडीच्या मागण्या केल्या. गरीब व दारिद्र्य शेतकरी वर्गाची शोषणातून मुक्तता करून शेतकरी स्वाभिमानी जीवन कसे जगू शकतील या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी कष्टकरी शेतकऱ्यांच्या कष्टांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्यांसाठी चालविलेला लढा बघता बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्याचे खरे कैवारी होते हे स्पष्ट होते. डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्याची वैयक्तिक पातळीवर होणारी पिळवणूक थांबविण्याचा प्रयत्न तर केलाच पण देशाच्या आर्थिक पायाभरणीत शेतीसंबंधी आणखी संशोधन करून शेतकरी व देशपातळीवर अर्थव्यवस्था खंबीर करण्यासाठी राज्य समाजवादाची संकल्पना मांडली.

राज्ये आणि अल्पसंख्यांक

डॉ. आंबेडकरांनी सन १९४६ साली 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'च्या वतीने घटना समितीला एक मसुदा सादर केला होता. तो 'राज्ये आणि अल्पसंख्याक' या नावाने प्रसिद्ध आहे. या मसुद्यात अस्पृश्यांच्या संरक्षणाची एक योजना अंतर्भूत होती. त्याचबरोबर स्वतंत्र भारताच्या आर्थिक पुनर्रचनेचा आराखडाही सादर करण्यात आला होता. डॉ. आंबेडकरांनी या मसुद्यात शेती विषयक अतिशय महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे. या विवेचनात शेती हा शासकीय उद्योग असावा, असे आंबेडकरांचे मत होते. त्यात त्यांनी सर्व जमीन शासनाने आपल्या ताब्यात घ्यावी असे सुचविले होते.

डॉ. आंबेडकर लोकशाहीला फक्त शासनाचा प्रकारच मानत नाहीत

तर तिला विशिष्ट जीवनशैली मानतात. लोकशाही स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित आहे. ही मानवतावादी मूल्ये समाजाचे समाजपण आणि राष्ट्राचे राष्ट्रपण टिकविण्यास आवश्यक आहेत. या मूल्यांच्या आधारेच डॉ. आंबेडकरांना या देशातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या सगळ्या अंगामध्ये सुधार घडवायचा होता. डॉ. आंबेडकरांनी भारतातील सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याचे अटोकाट प्रयत्न केले. त्यांनी राज्यसमाजवादाची संकल्पना मांडली. देशातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांची 'राज्य समाजवादा'ची अतिशय उपयुक्त अशी संकल्पना होय. डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाच्या संकल्पनेत अंतर्भूत त्यांचे शेतीविषयक चिंतन पुढीलप्रमाणे आहे.३.

(I) १) शेती हा राज्याचा उद्योग असावा म्हणजे शेतजमिनीचे राष्ट्रीयकरण व्हावे.

२) मालक, कूळ किंवा गहाणवर घेणारा धनको या नात्याने खाजगी व्यक्तींच्या ताब्यात असलेले उद्योगधंदे, विमा आणि शेतीची जमीन यांच्या वहिवाटीचे हक्क राज्याकडे असावेत. या खाजगी व्यक्तींना जमिनीच्या मूल्याइतकी भरपाई सरकारी कर्जरोख्याच्या स्वरूपात दिली जावी. सक्तीने ताब्यात घेण्यासाठी जमीन व कारखाना यांचे मूल्ये निश्चित करताना आणीबाणीमुळे येणारी वाढ भावी काळातील संभाव्य किंवा अनार्जित मूल्य किंवा सक्तीने ताब्यात घेण्यासाठीच कोणतेही मूल्य यांची दखल राज्याने घ्यायची गरज नाही.

३) कर्जरोखा धारण करणाऱ्याला रक्कम मिळण्याचा हक्क कोणत्या प्रकारे आणि केव्हा असेल ते राज्य ठरवेल.

४) सदर रोख्याचा विनिमय करता येईल आणि त्यावर वारसाहक्क राहील. तरी मूळ रोखाधारक वा मूळ ताब्यात घेतलेली जमीन किंवा कोणत्याही औद्योगिक कंपनीस हिस्सा परत मिळण्याची मागणी करता येणार नाही. अथवा त्या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करता येणार नाही.

५) कायद्याने ठरविल्यानुसार रोखेधारकास रोख्यावर व्याज मिळण्याचा हक्क राहील, हे व्याज रोखरुपाने वा वस्तुरुपाने वा योग्य वाटेल त्या पद्धतीने सरकार घेईल.

(II) **शेतकी उद्योग पुढील पायांवर संघटित केला जाईल.**

अ) ताब्यात घेतलेल्या जमिनीची प्रमाणबद्ध आकारांच्या शेतांमध्ये सरकार विभागणी करील आणि खेड्यातील कुळांना म्हणजे काही कुटुंबाच्या गटांना पुढील अटीवर शेते लागवडीसाठी दिली जातील.

ब) शेतीची लागवड सामूहिक पद्धतीने केली जाईल.

(III) **सरकारने जारी केलेल्या नियमानुसार आणि आदेशानुसार शेतीची लागवड केली जाईल.**

क) शेतीवर निश्चित केलेली आकारणी दिल्यानंतर शेतीतील उर्वरित उत्पन्न राज्याने ठरविलेल्या नियमांनुसार कुळे वाटून घेतील.

ख) जात, पंथ असा भेद न करता गावातील रहिवाशांना जमीन भाड्याने दिली जाईल. या पद्धतीत कुणी जमीनदार असणार नाही, कुणी जमीनदाराचे कूळ असणार नाही आणि कुणी भूमिहीन वा मजूर असणार नाही.

(IV) **शेतीसाठी पाणी, जनावरे, अवजारे, खत, बियाणे इत्यादींचा पुरवठा करून सामुदायिक शेतीची लागवड करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे राज्यावर बंधनकारक राहील.**

(V) **राज्याला पुढील बाबतीत हक्क राहतील.**

अ) शेती उत्पन्नावर पुढीलप्रमाणे आकारणी करता येईल.

१) जमीन महसुलीसाठी एक भाग

२) कर्जरोखे धारकांना परतफेड करण्यासाठी एक भाग

३) पुरवठा केलेल्या भांडवली वस्तूच्या वापरासाठी एक भाग

आ) जे कूळ कायद्याच्या नियमाचा भंग करतील किंवा राज्याने दिलेल्या लागवडीच्या साधनांचा योग्य उपयोग न करता हेळसांड करतील किंवा सामुदायिक शेती योजनेला बाधा येईल अशी कृती करतील, त्यांना राज्य योग्य ती शिक्षा करू शकेल.

डॉ. आंबेडकराच्या राज्यसमाजवादाची संकल्पना ही देशात आर्थिक लोकशाही प्रस्थापित करणारी योजना होय. वर्णव्यवस्थेमधून व्यवसायाच्या उच्चनीचतेची जी योजना हजारो वर्षापासून भारत देशात राबविण्यात येत होती, ती मोडीस काढणारी ही संकल्पना होती. या संकल्पनेच्या अवलंबामुळे आर्थिक उच्च-नीचतेची जातीची प्रतवारी मोडीत निघणार होती. डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद हजारो वर्षांपासून शेती व्यवसायात गुंतलेल्या गरीब कष्टकरी कामगारांना श्रमाचा मोबदला व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारा होता. सावकारी, जमीनदारी, भांडवलशाहीसारख्या जाचक रूढी नष्ट करणारा होता. भारतातील ८० टक्के लोकसंख्या असलेल्या दलित, बहुजन समाजाला न्याय मिळवून देणारी ही संकल्पना होय. म्हणून डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादाचा अंतर्भाव कायदेशीररीत्या संविधानात करण्यात यावा, अशी मागणी केली. पण सत्तेवरील भांडवलशाहीच्या प्रभुत्वाने राज्यसमाजवाद हा कायदेशीररीत्या संविधानात समाविष्ट होऊ शकला नाही. जर राज्य समाजवादाचा समावेश राज्यघटनेत केला गेला असता तर आज देशात शेतीसंबंधी व शेतकऱ्यांच्या बाबतची जी समस्या उभी आहे ती समस्या निर्माण झाली नसती. देशाच्या आर्थिक विकासाचा पायाभूत आधार असलेल्या शेतकऱ्यांची उपेक्षा व अवहेलना झाली नसती. डॉ. आंबेडकरांच्या शेतीविषयक चिंतनावरून भारताच्या शेती व शेतकऱ्यांबद्दल त्यांना किती आस्था होती व शेती हा राज्याचा उद्योग बनवून देशाच्या विकासाचा विचार करणारा डॉ. आंबेडकरांसारखा राष्ट्रभक्त निराळाच.

डॉ. आंबेडकरांनी शेती विकास व औद्योगिक विकास या दोन्ही गोष्टीसाठी शासनाने पुढाकार घेऊन देशासमोर बेरोजगारी, दारिद्र्य या गोष्टीवर मात केली पाहिजे, हे उद्दिष्ट समोर ठेवून राज्य समाजवादाचा पुरस्कार केला. डॉ. आंबेडकरांची शेती संबंधिची अर्थनीती ही आर्थिक विषमता दूर करणारी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारी आहे. डॉ. आंबेडकरांनी 'राज्य समाजवादा'चा पुरस्कार करून 'राष्ट्रीय एकात्मते'चा विचार मांडला.

संदर्भ ग्रंथसूची

१) ॲड. विष्णू ढोबळे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका, सुगावा प्रकाशन, पुणे, २६ जानेवारी २००९, पृ.२३

२) कामगार चळवळ, डॉ. आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, संपादक- प्रदीप गायकवाड पृ. ३० ते ३१

३) डॉ. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन पृ. ५९ ते ६०

४) डॉ. आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पृ. ४०६

संपर्क क्र. ९४२३९७४२४०


M.A.I.D.C.
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)
कृषिउद्योग उत्पादनांची मिळता साथ, शेतकऱ्याची होईल भरभराट!
कृषिउद्योग खते
कृषिउद्योग जंतुनाशके
सुग्रास पशुखाद्य
कृषिव्हेटर
आमची लोकप्रिय असलेली दर्जेदार व स्वादिष्ट नोगा उत्पादने
NOGA
प्रशासकीय कार्यालय:
कृषिउद्योग भवन, आरे दुग्ध वसाहत,
गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५.
दूरध्वनी: ९१-२२-२९२७ २०२७/२८/२९/३१/३२
फॅक्स: ९१-२२-२८७१ ९३९९
ईमेल: headoffice@maidcmumbai.com
वेबसाईट: www.maidcmumbai.com
www.samarthadvertisers.com



देशाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान

डॉ. प्रदीप आगलावे, प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग व डॉ. आंबेडकर अध्यायन,
राष्ट्रीय तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाचे आणि विचारांचे मूल्यांकन केल्यानंतर स्पष्ट होते की, त्यांचे देशाच्या विकासामध्ये प्रचंड योगदान आहे. डॉ. आंबेडकरांनी देशाचे संविधान लिहिले आणि त्यांनी देशातील वंचित लोकांच्या उत्थानाकरिता चळवळ केली. या दोनच बाबी सर्वसामान्य लोकांना माहीत आहेत. परंतु त्यांनी एकंदरीत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांमध्ये अत्यंत मूलभूत स्वरूपाचे योगदान दिले, याची माहिती येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतात मताधिकाराच्या संदर्भात सुधारणा करण्यासाठी लॉर्ड साउथबोरो यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीला 'साऊथबोरो समिती' असे म्हटले जाते. या समितीत दि. २७ जानेवारी १९१९ रोजी डॉ. आंबेडकरांनी लिखित साक्ष दिली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले होते की, ''लोकप्रिय शासनाचा अर्थ केवळ लोकांकरिता शासन असा नाही, तर लोकांचे शासन असा आहे. म्हणून भारतात लोकप्रिय शासनाकरिता मताधिकार आणि निर्वाचन क्षेत्राची व्यवस्था करताना मताधिकार समितीला हे ध्यानात ठेवावे लागेल की, विचारांचे प्रतिनिधित्व आणि व्यक्तीच्या प्रतिनिधित्वाची व्यवस्था करावी.''

'लोकांचे शासन' हा खरा शासनाचा अर्थ आहे. त्याकरिता लोकांना आपले प्रतिनिधी निवडण्यासाठी प्रौढ मताधिकाराचा स्वीकार केला पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांनी लॉर्ड साउथबोरो यांना सन १९१९ मध्ये ठणकावून सांगितले होते. यावरून डॉ. आंबेडकरांचे देशप्रेम दिसून येते. त्यावेळी त्यांचे वय केवळ २८ वर्ष होते.

मजुरांच्या विकासाकरिता चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरांच्या उत्थानाकरीता विशेष कार्य केले. मजुरांच्या समस्या राज्य आणि राष्ट्रीयस्तरावर मांडण्यासाठी त्यांनी दि. १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला होता. या पक्षात सर्व जाती-धर्मांचे मजूर होते. या पक्षातर्फे त्यांनी मुंबई आणि सी. पी. ॲन्ड बेरार प्रदेशातील विधानसभेच्या निवडणुका सन १९३७ मध्ये लढविल्या होत्या. त्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाचे उमेदवार निवडून आणले. विशेष म्हणजे ते वेगवेगळ्या जातीचे होते.

सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधानसभेत शासनाने 'औद्योगिक विवाद विधेयक' सादर केले होते. या विधेयकात विशिष्ट परिस्थितीत कामगारांचा संप बेकायदेशीर ठरविण्याची तरतूद होती. डॉ. आंबेडकर हे त्यावेळी मुंबई विधानसभेत विरोधी पक्षनेते होते. त्यांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला. 'औद्योगिक विवाद विधेयक म्हणजे मजुरांकरिता काळा कायदा होय' अशा शब्दात त्यांनी या बिलाची निर्भत्सना केली होती.

या विधेयकास विरोध करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दि. १५ सप्टेंबर १९३८ रोजी मुंबई विधानसभेत म्हणाले की, ''माझ्या मते, या विधेयकास कामगारांचे 'नागरिक स्वातंत्र्य हनन विधेयक' या नावाने संबोधले पाहिजे. हे विधेयक याच रूपात पारित करायला नको. हे विधेयक कामगारांना अपंग बनविते. संपावर प्रतिबंध लावणे म्हणजे कामगारांना गुलाम बनविणे होय. कामगारांना माहित नसेल की, हे विधेयक काय आहे. परंतु जेव्हा हे विधेयक लागू होईल आणि कामगारांना या विधेयकाचा सामना करावा लागेल तेव्हा ते म्हणतील की, हे विधेयक वाईट आहे, खुनी आहे आणि क्रूर आहे.''

मुंबई विधानसभेत या विधेयकाला विरोध करून डॉ. आंबेडकर थांबले नाहीत तर त्यांनी कामगारांना संघटित करून गिरणी आणि कारखान्यातील कामगारांचा एक दिवसाचा संप दि. ७ नोव्हेंबर १९३८ रोजी घडवून आणला. भारतीय कामगारांच्या इतिहासातील हा सर्वात मोठा संप होता. त्या दिवशी सर्व कापड गिरण्या आणि इतर उद्योगातील आणि महानगरपालिकेचे सर्व कारखाने बंद होते. संपात गिरणी कामगार युनियन देखील सहभागी झाली होती. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात झालेल्या या संपात जमनादास मेहता, कॉ. परुळेकर, कॉ. डांगे इत्यादी अनेक कामगार नेते सहभागी झाले होते. या ऐतिहासिक संपामुळे डॉ. आंबेडकर हे कामगार नेते म्हणून प्रसिद्धीस आले.

मजुरांच्या कल्याणासाठी विविध कायदे

जुलै १९४२ मध्ये व्हाईसराय जनरलच्या मंत्रिमंडळात मजूरमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांचा समावेश करण्यात आला होता. डॉ. आंबेडकर मजूरमंत्री झाल्यानंतर देशातील मजुरांच्या कल्याणाच्या संदर्भात त्यांनी अनेक कायदे केले. आज पुरुष आणि स्त्री मजुरांच्या कल्याणाबाबत जे विविध कायदे आढळतात, त्या सर्व कायद्याची मुहूर्तमेढ डॉ. आंबेडकरांनी सन १९४२ ते ४६ या आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात केली होती.

दि. ७ ऑगस्ट १९४२ ला दिल्ली येथे झालेल्या संयुक्त श्रमिक अधिवेशनात दिलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी या अधिवेशनाचे पुढीलप्रमाणे तीन मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

१) श्रमासंबंधी कायद्यांच्या एकरूपतेस प्रोत्साहन देणे.
२) औद्योगिक विवाद त्वरित निकालात काढण्याची प्रक्रिया निश्चित करणे.
३) कर्मचारी आणि नियोजक यांच्यामधील अखिल भारतीय महत्त्वाच्या बाबींवर विचारविमर्श करणे.

त्यानंतर त्यांनी श्रमासंबंधीच्या कायद्यामध्ये एकरूपता आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यावेळी जे अनुभवी आणि अर्धशिक्षित तंत्रज्ञ वेगवेगळ्या योजनांमधून तयार होत होते, ते नोकरीसाठी भटकत असत. म्हणून डॉ. आंबेडकरांनी अशा बेरोजगार तरुणांची नोंदणी करण्यासाठी सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. ही बाब अनुभवी आणि अर्धशिक्षित बेरोजगार तरुणांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरली.

डॉ. आंबेडकरांनी मजुरांच्या हिताच्या दृष्टिकोनातून कामगार कायद्यांमध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्यात. स्त्रियांना कारखाना कायद्यान्वये रात्री काम करण्याची बंदी घातली. स्त्रियांच्या प्रसूतीकाळात

त्यांना विशेष भरपगारी रजेच्या फायदा मिळावा म्हणून विशेष प्रयत्न केले. खाणी प्रसूती लाभ कायद्यात सुधारणा केली. भूमिगत कोळसा खाणीतील महिला कामगारांना प्रसूती लाभ (संशोधन) विधेयक मंजूर करवून घेतले. कामगारांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी कल्याण फंड स्थापन केला. महिला-पुरुष कामगारांना समान वेतनाची तरतूद केली. खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने खाण मालकांनी विशेष सोयी कराव्यात,. यासाठी सन १९२३ च्या भारतीय खाणी कायद्यात संशोधन करणारे 'भारतीय खाणी विधेयक' मंजूर करून घेतले. कामगारांच्या कामाचे तास कमी करण्यासाठी सन १९३४ च्या कारखाना कायद्यात सुधारणा केली.

कारखान्यातील बारमाही कामगारांना भरपगारी रजा द्यावी, अशी तरतूद कामगार कायद्यात केली. त्यापूर्वी अशा कामगारांना कुठल्याच रजेचा फायदा मिळत नसे. सक्तीची किंवा लवाद हे कामगारांना अत्यंत हितावह आहे. त्यामुळे हे तत्त्व कामगारांच्या न्याय पद्धतीत कायम स्वरूपाचे मान्य करण्यात आले.

कामगार स्थायी समितीची बैठक ऑगस्ट १९४५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी घरे बांधण्यासंबंधिची मालकांवरील जबाबदारी आणि भरपगारी रजा यावर भर दिला होता. डिसेंबर १९४५ मध्ये मुंबईच्या सचिवालयात विभागीय कामगार प्रशासकाची परिषद भरली होती. या परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, ''औद्योगिक अशांतता टाळण्यासाठी किंवा ती कमी करण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे समेट घडवून आणण्यासाठी योग्य अशी समेट यंत्रणा हवी. दुसरी गोष्ट म्हणजे औद्योगिक कलह कायद्यात सुधारणा केली पाहिजे आणि तिसरी गोष्ट कामगारांना कमीतकमी किती पगार असावा हे शासनाने ठरविले पाहिजे.''

आज शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्ता मिळतो. महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्ता देण्याची योजना डॉ. आंबेडकरांची आहे. ते कामगार मंत्री असताना कामगारांना जो महागाई भत्ता मिळत होता तो अपुरा आहे; भडकल्या महागाईला कामगार तोंड देऊ शकणार नाहीत म्हणून वाढल्या महागाईच्या निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्त्याची पूर्तता करण्यात यावी, असे त्यांनी प्रतिपादन केले होते.

केंद्र सरकारचे काही कामगार कायदे होते. परंतु ते कायदे अपुरे आणि कामगारांना जाचक होते. उदा. इंडियन बॉयलर्स ॲक्ट, मोटार वाहन कायदा, स्त्री प्रसूती लाभ कायदा, कारखाने अधिनियम, इंडियनडे युनियन ॲक्ट, पगार देण्याचा कायदा, अपघात नुकसान भरपाई कायदा, अभ्रक खाण कामगार कल्याण कायदा, औद्योगिक कलह कायदा इत्यादी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः पुढाकार घेऊन कामगारांच्या दृष्टीने अपुरे आणि जाचक असलेल्या विविध कामगार कायद्यात सुधारणा घडवून आणल्यात.

ऑगस्ट १९४७ मध्ये डॉ. आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी औद्योगिक कलह कायदा १९४७, कारखाने अधिनियम १९४८, किमान वेतन कायदा १९४८ इत्यादी कायद्यात मजुरांच्या हिताच्या दृष्टीने अनेक सुधारणा केल्या. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या कल्याणाकरिता कामगाराचे आंदोलन चालविले आणि स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हिताचे कायदे करून कामगारांना खरा न्याय मिळवून दिला. देशातील कामगारांच्या संदर्भात त्यांचे योगदान विशेष आहे. त्यांना कामगारांच्या प्रश्नांची जाणीव होती. इतकेच नव्हे तर कामगाराचे कल्याण व्हावे, ही त्यांची तळमळ होती.

भारताची अखंडता आणि एकता टिकविणारी राज्यघटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना लिहून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाची अखंडता आणि एकता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात राज्यघटनेचे विशेष योगदान आहे. राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क आणि न्यायाची हमी दिली. आपली राज्यघटना मानवी मूल्याचा पुरस्कार करणारी आहे, म्हणून आपल्या देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आहे. जगातील अनेक देशांनी भारतीय राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आणि अद्वितीय असल्याचे मान्य केले. ऑक्सफोर्ड आणि केंब्रिज विद्यापीठातील नामवंत प्राध्यापक आणि राज्यशास्त्रज्ञ अर्नेस्ट वार्कर यांनी सन १९५१ मध्ये ' Principles of Social and Political Theory' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ प्रोफेसर वार्कर यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेस अर्पण केला. ग्रंथाच्या प्रास्ताविकातच त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, ''माझ्या या प्रस्तुत ग्रंथाचे विचार सार भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सामावलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना या श्रेष्ठ मानवी मूल्यांचा अंगीकार केला, याचा मला अभिमान वाटतो.''

आपल्या देशाच्या शेजारच्या देशांचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार, नेपाळ इत्यादी देशांमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊ शकली नाही. त्या देशांमध्ये सतत राजकीय अस्थैर्य आहे. परंतु आपला देश मात्र राजकीयदृष्ट्या स्थिर आहे. इतकेच नव्हे तर सर्वात



भारतीय घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना दि. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा मसूदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

जास्त लोकसंख्या असलेला लोकशाही भारत म्हणून एक वेगळी प्रतिमा संपूर्ण जगात निर्माण झाली आहे. याचे एकमेव कारण म्हणजे भारतीय राज्यघटना होय. देशात शांतता आणि स्थैर्य असल्यामुळे देशाचा विकास होऊ शकला. भारतीय राज्यघटनेमुळे आपला देश अस्थिर झाला नाही. देश अस्थिर करण्याचे अनेकदा प्रयत्न झालेत. देशाचे विभाजन करणाऱ्या खलिस्तान, गोरखालँड इत्यादी अनेक विघटनकारी घटना घडल्यात. परंतु राज्यघटनेनुसार देशांचे केंद्र सरकार हे मजबूत आणि स्थिर असल्यामुळे या सर्व विघटनकारी शक्तीचा बीमोड करणे केंद्र सरकारला शक्य झाले.

आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे. कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत. कुणीही लहान किंवा मोठा नाही. 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' हे तत्त्व आपल्या राज्यघटनेने स्वीकारले आहे. सर्व गोष्टींच्या तुलनेत देश मोठा आहे, बाकीच्या गोष्टीनंतर देशाची अखंडता आणि एकतेबाबत कुठेही तडजोड नाही. देशाची अखंडता आणि एकता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे फार मोठे योगदान आहे. ही गोष्ट कुणालाही नाकारता येणार नाही. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना लिहिली नसती तर आपली राज्यघटना ही वेगळी राहिली असती. सर्वसामान्य लोकांना घटनेत स्थान राहिले नसते. कालबाह्य रूढी आणि परंपरांच्या आधारावर कायदे करण्यात आले असते. परंतु डॉ. आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना न्याय देणारी आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी राज्यघटना लिहिण्यात आली. म्हणून भारतीय राज्यघटनेच्या रूपात डॉ. आंबेडकरांचे देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये विशेष योगदान आहे.

आर्थिक विकासाच्या योजना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थशास्त्रज्ञ होते. त्यामुळे त्यांनी देशातील आर्थिक विकासाबाबत चिंतन करून अतिशय महत्त्वपूर्ण विचार मांडले होते. त्यांनी औद्योगिकरणाचा पुरस्कार केला होता. औद्योगिकरण हे देशातील आवश्यक गरजा आणि देशातील स्रोत यावर आधारित असले पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. अलीकडे शाश्वत विकास महत्त्वाचा मानला जातो. जगातील सर्व अर्थशास्त्रज्ञ आणि विचारवंत शाश्वत विकासाला महत्त्व देतात. डॉ. आंबेडकरांनी सन १९४२ ते ४६ च्या दरम्यान शाश्वत विकासाबाबत आपली भूमिका मांडली होती.

भारताच्या विकासाबाबत डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचा विचार मांडला होता. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधने आहेत. त्या नैसर्गिक साधनावर आधारित आपले उद्योगधंदे असले पाहिजे. विशेष म्हणजे नियोजन करून आपल्याला योग्यप्रकारे देशाचा विकास करणे शक्य आहे असे त्यांचे विचार होते. भारताचा विकास कशाप्रकारे केला पाहिजे? या संदर्भात ते म्हणतात की, ''आपल्या देशातील नैसर्गिक स्रोतांचे नियोजन करून त्या स्रोतांचा योग्य उपयोग केला तर भारताचा विकास होईल.''

डॉ. आंबेडकरांनी भारताच्या नियोजित विकासाबाबत केवळ विचार मांडले नाहीत. तर त्यांनी भारताच्या विकासाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाकांक्षी असे बहुउद्देशीय प्रकल्प देशात उभारलेत. बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्पाची संकल्पना त्यांनी मांडली. दामोदर आणि हिराकुड नदी खोरे प्रकल्पाची पूर्ण रूपरेषा त्यांनी तयार केली होती. दामोदर नदी योजना, हिराकुंड नदी योजना, सोने नदी खोरे योजनामुळे पुराचे संकट टळले. त्याचबरोबर धरणांमुळे लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था झाली. तसेच औद्योगिक विकासाकरिता विद्युतची निर्मिती करण्यात आली.

आज औद्योगिक विकास करण्यासाठी विद्युत ही आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांनी विद्युतच्या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण राष्ट्रीय धोरण तयार केले होते. त्या राष्ट्रीय विद्युत धोरणाच्या आधारावरच स्वातंत्र्योत्तर काळात विद्युतचा विकास झाला.

स्वातंत्र्योत्तर भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक आदर्श प्रारूप तयार केले होते. त्यांनी हे आर्थिक विकासाचे प्रारूप 'राज्य आणि अल्पसंख्यांक' मध्ये मांडले आहे. त्याकरिता त्यांनी राज्य समाजवादाची संकल्पना मांडली. त्यांच्या मते, ''देशातील मोठे आणि पायाभूत उद्योग हे राष्ट्राच्या मालकीचे असले पाहिजे.'' त्याचप्रमाणे त्यांनी शेती हा राष्ट्रीय उद्योग असावा ही अभिनव संकल्पना मांडली. संपूर्ण शेती ही राष्ट्राच्या मालकीची असेल आणि शेती करण्यासाठी ती शेतकऱ्यांना दिली जाईल. शेतीची लागवड आणि बी–बियाणे इत्यादीकरिता पतपुरवठा शासन करील. पीक आल्यानंतर शेतकरी शासनाने लावलेला पैसा शासनाला परत करील. परंतु ही त्यांची अभिनव संकल्पना विरोधामुळे राज्यघटनेत समाविष्ट होऊ शकली नाही.

शेतकऱ्यांची चळवळ

गरीब, दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सन १९२८ पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हातात घेतले होते. सन १९२७ मध्ये देशात समता प्रस्थापित व्हावी म्हणून महाडचा सत्याग्रह त्यांनी केला होता. तर त्यानंतर लगेच दुसऱ्या वर्षी म्हणजे सन १९२८ पासून त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांची खोतांच्या दास्यातून मुक्तता व्हावी म्हणून फार मोठी चळवळ सुरू केली होती.

स्त्रियांच्या उत्थानासाठी योगदान

कोणत्याही देशातील एकूण मनुष्यबळापैकी अर्धी संख्या स्त्रियांची असते. भारतात स्त्रियांचा विकास झाला तरच कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा विकास होऊ शकतो, हा विचार डॉ. आंबेडकरांनी प्रकर्षाने मांडला. त्यांनी स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. इतकेच नव्हे तर स्त्रियांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक गुलामीतून मुक्तता करण्यासाठी त्यांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले होते. 'स्त्रियांची प्रगती म्हणजे राष्ट्राची प्रगती होय.' असा विचार मांडून त्यांच्या उत्थानाकरिता त्यांनी विविध कायदे केले. ज्यामुळे स्त्रियांना विविध क्षेत्रात सुरक्षितता प्राप्त झाली. त्यावेळी स्त्रियांच्या विकासाबाबत डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांना प्रचंड विरोध झाला होता. परंतु आज मात्र स्त्रियांच्या विकासाबाबतचा विचार सर्वमान्य झाला आहे. डॉ. आंबेडकरांचे स्त्री विकासाबाबतचे विचार आज खरे ठरले आहेत.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात प्रचंड योगदान दिले. देशातील वंचित, शोषित आणि पीडित लोकांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विविध चळवळी उभारल्यात. त्यामुळे देशात सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले. त्यांच्या या योगदानामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारताची जडणघडण झाली. म्हणून डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. परंतु त्याचबरोबर ते स्वातंत्र्योत्तर भारताचे देखील शिल्पकार आहेत.

संपर्क क्र. ९८८१२६२६६०

दामोदर खोरे प्रकल्प

स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील मोठ्या धरणांना महत्त्व हे जवाहरलाल नेहरूंच्या नावे दिले जाते. वस्तुतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९४० च्या दशकात व्हाइसरॉयच्या कौंसिलचे सदस्य म्हणून मोठ्या धरणांच्या बाबतीत सर्वांत महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी आपले कौशल्य 'सेंट्रल वॉटर इरिगेशन अँड नेव्हीगेशन कमिशन' स्थापण्यासाठी वापरले. त्याचबरोबर आंतरराज्य सहकार व अर्थ या विषयांमुळे रखडलेल्या योजना साकार केल्या. यात हिराकुड व दामोदर खोरे या पहिल्या व महत्त्वपूर्ण आहेत.

बिहार व पश्चिम बंगालच्या सरकारने दामोदरवर लहान धरण बांधायचे ठरवलेले होते. पण त्यांच्या खर्चाबाबत त्यांचे एकमत होऊ शकले नाही. लॉर्ड वॅवेल व्हाइसरॉय असताना बाबासाहेब व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे सदस्य होते आणि त्यांनी मजूर व सार्वजनिक बांधकाम खाते भूषविले. त्यांचे हे पद केंद्रातील मंत्र्याप्रमाणे होते. व्हाईसरॉयप्रमाणे ब्रिटिश अभियंता दामोदर खोरे प्रकल्पासाठी शक्य होता तर बाबासाहेबांप्रमाणे टेनेसी घाटी परियोजना साकार करणारे अमेरिकन अभियंते यासाठी आवश्यक होते. त्यांनी व्हाइसरॉयबरोबर भांडण यासाठी नाही केले की, त्यांना त्यांच्या मुंबई राज्यात धरण हवे होते.

त्यांचे हे म्हणणे होते की, ब्रिटेनमध्ये मोठ्या नद्या नसल्याने तिथल्या अभियंत्यांना मोठे धरण बांधायचा अनुभव नव्हता. ज्याप्रकारे दामोदर नदीचा बंगाल, बिहार व झारखंडच्या क्षेत्रात पुराचा कहर होता व सन १८२३, १८४८, १८५६, १८५९, १८६३, १८८३, १८८२, १८९०, १८९८, १९०१, १९०५, १९१३, १९१६, १९२३, १९३५ व १९४३ मधले पूर अति विनाशकारी होते. त्यांचे भांडण या कारणासाठी होते. कॅबिनेट कक्षात व्हाइसरॉयने ब्रिटिश अभियंत्याचा प्रस्ताव दामोदर परियोजनेसाठी मांडला, तेव्हा डॉ. आंबेडकर उभे झाले व प्रस्तावाला प्रखर विरोध केला. फक्त विरोधच केला नाही तर तो प्रस्ताव फेटाळलासुद्धा. कॅबिनेटमधील भारतीय व ब्रिटिश सदस्य सगळेच बाबासाहेबांच्या विरोधात बोलायला लागले. काहींनी अपशब्दही वापरले. पण बाबासाहेब ठाम होते. असे असताना त्यांना त्या पदावरून काढून का टाकले नाही. त्याचे उत्तर हे आहे की, सार्वजनिक हिताचे काय आहे हे बोलण्यासाठी त्यांचा प्रगल्भ अभ्यास, धैर्य व वक्तृत्व कौशल्य होय.

बाबासाहेबांचे दामोदर परियोजनेमधील त्यांचे विचार या त्यांच्या वक्तव्यावरून दिसून येतात. ''भारत सरकारसाठी हा प्रकल्प स्वागतार्ह आहे. ही परियोजना नदीचे नियमन, पुराचे नियमन, वर्षभर सिंचनाचा प्रदेश मिळवणे, दुष्काळापासून मुक्तता व आवश्यक अशा ऊर्जेचा स्रोत हे सर्व प्राप्त करण्याची आशा दाखवतो. ही परियोजना बंगाल व बिहारच्या सरकारांना स्वागतार्ह राहील जर त्यांनी याची क्षमता पूर्णपणे गाठली असेल तर.''

ही परियोजना जगातील एक प्रसिद्ध परियोजना राहील असे त्यांना वाटत असे. दि. ३ जानेवारी १९४५ रोजी एका बैठकीत त्यांनी म्हटले ''सरकार विचाराधीन टेनेसि खोरे योजना आहे जी अमेरिकेत आहे. त्यांना असे वाटते की राज्यांनी जर आपसातील दुरावे सोडून सहाय्य करायला सुरुवात केली तर त्यांचा विकास थांबवणारे अडथळे दूर होतील आणि याच अनुषंगाने तांत्रिक तज्ज्ञ काम करीत आहेत.''

दामोदर घाटी परियोजना ही तातडीची योजना आहे आणि लवकर निर्णयावर न येणे हा गुन्हा व मूर्खपणा ठरेल. राज्यांनी निर्णय घेतल्याशिवाय हा प्रकल्प आम्ही सुरू करू शकणार नाही. म्हणून मला आशा आणि विश्वास वाटतो की, तुमच्या सहकार्याने आपण आज पूर्ण व दृढतापूर्वक निर्णय घेऊ. मला सांगायचे आहे की भारत सरकार हा प्रकल्प करण्याकरिता उत्साही, गंभीर आहे आणि महत्त्वाचा वाटा उचलायला तयार आहे.

त्यांनी भारत सरकारची संसाधने प्रकल्पासाठी देऊ केली होती. ''दोन्ही राज्ये युद्धपश्चात विकास कामात असल्याने त्यांच्या या कामात व्यत्यय न येऊ देता भारत सरकार त्यांना कर्मचारी व संघटना देईल. ज्याद्वारे प्राथमिक अन्वेषण करता येईल. भारत सरकारला बंगालच्या अभियांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या संस्थेच्या कमतरतेविषयी माहिती असल्याने वाटल्यास लष्करी सेवेतून अभियंत्यांची सेवा घेण्यात येईल. यामुळे अत्यावश्यक संसाधने मिळतील, उपकरणांचा पुरवठा नियमित होईल व राज्यांच्या ताणलेल्या संसाधनांवर भार पडणार नाही.''

दि. १५ नोव्हेंबर १९४३ ते दि. ८ नोव्हेंबर १९४५ मध्ये त्यांनी पाच संमेलनांमध्ये संबोधित केले. त्यापैकी दोन दामोदर खोरे प्रकल्प, एक महानदी खोरे प्रकल्प, दोन विद्युत ऊर्जेवर होते. तसेच ते मजूर विभागाच्या 'औपचारिक समिती'बरोबर निगडीत होते. या समितीचे काम जल व ऊर्जा धोरण ठरविणे होते. त्यांच्या मते जल ही संपत्ती असते व त्याचे वाटप अनिश्चित असल्याने त्याच्या स्वरूपाविषयी तक्रार करण्यापेक्षा त्याच्या संवर्धनाकडे लक्ष दिले जावे. त्यांनी म्हटले की, माणूस पाण्याच्या अतिरिक्ततेपेक्षा त्याच्या कमतरतेने जास्त हैराण होतो. दामोदर खोरे प्रकल्पाच्या चारपैकी तीन संमेलनांचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले तसेच मार्गदर्शन केले व नेतृत्व केले.

दामोदर खोरे प्रकल्पाच्या पहिल्या संमेलनात सन १९४४ मध्ये ते म्हणाले की, ''पूरनियंत्रणाबरोबर जलविद्युत औष्णिक वीजप्रकल्प, सिंचन, शेतीचा विकास, जलवाहतूक, बंदरांचा विकास, वनीकरण हेसुद्धा दामोदर खोरे प्रकल्पातून करता येतील.''

दामोदर खोरे प्रकल्पाच्या दुसऱ्या संमेलनात दि. २३ ऑगस्ट १९४५ रोजी ते म्हणाले, ''पूरनियंत्रण आपल्या धोरणाचा भाग आहे व यावर दुमत नाही आणि जी कोणतीही अंदाजित शक्यता आहे. त्यांच्यावर उपाययोजना प्राथमिक यादीप्रमाणे सुचविलेल्या आहेत.'' याच संमेलनात त्यांनी प्राधान्याने काही निर्णय घेण्यावर जोर दिला. जसे धरणाचे स्थळ, प्राथमिक तपास संस्था, धरणाचा आराखडा व बांधकाम करणारी संस्था, प्रशासकीय संरचना, जल व विद्युत उपयोगाचा सर्व्हे तसेच या प्रकल्पाला त्यांनी रोजगार निर्मिती प्रकल्प म्हणूनसुद्धा पाहिले. कारण युद्धानंतर रोजगार निर्मिती कमी झाली होती.

धरणाच्या स्थळांवरून राज्यांमध्ये मतभेद होते. बाबासाहेबांनी हे सर्व मतभेद दूर केले व त्यांना एकत्र येऊन निर्णय घ्यायला समजावले. त्यांनी प्राथमिक निधीसुद्धा केंद्रातूनच दिला. त्यांची ही अपेक्षा होती की या प्रकल्पातून होणारे फायदे हे त्या परिसरातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावेत.

बाबासाहेबांच्या प्रयत्नांमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्यातील मतभेद दूर केले गेले. आर्थिक जबाबदारी पूर्ण केली गेली. स्वायत्त महामंडळ स्थापण्यात आले व उत्साही अभियंत्यांनी प्रकल्पाचे काम जोमाने सुरू केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली या इतक्या मोठ्या व क्लिष्ट प्रकल्पांची प्रक्रिया चार वर्षांपेक्षा कमी वेळात पूर्ण झाली. यामधून त्यांची कोणतेही काम पूर्णत्वाला नेण्याची धडपड, कसोशीचे प्रयत्न, निर्णयक्षमता समेट घडवून आणण्याचे कौशल्य व तळागाळातील लोकांसाठी औद्योगिकीचा उपयोग हे विविध पैलू दिसून येतात.

श्री. अजय ढोके,
आयकर सहआयुक्त, आयकर विभाग, पुणे
संपर्क क्र. ७५८८६३००३४



शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढा

डॉ. त्रिलोक हजारे, माजी प्रधान शास्त्रज्ञ, ५, इंगळे लेआउट, परसोडी, रिंग रोड, नागपूर

स्वत:ची दु:खे, दारिद्र्य दूर करण्यासाठी स्वत: प्रयत्न करावे, असे डॉ. बाबासाहेब खास करून शेतकऱ्यांना म्हणत असत. ''माझ्याइतके कष्टमय जीवन कोणीही आयुष्यात काढलेले नाही. म्हणून माणसाचे जीवन सुखासमाधानाच्या अभावी कसे कष्टमय होते याची मला जाणीव आहे. आर्थिक उन्नतीची चळवळ अवश्य आहे असे मी मानतो.'' असे नमूद करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''शेतकरी बंधूनो, तुमची दु:खे अनेक आहेत. ती दूर करण्यास तुम्हीच कंबर कसली पाहिजे आणि आपली संघटना बळकट केली पाहिजे.'' या देशात ७० टक्के लोक खेड्यात राहतात. ते शेतात कष्ट करतात उन्हापावसात राबतात. इतके अपार कष्ट व अतोनात मेहनत करून त्यांना पोटभर खायला अन्नही मिळत नाही. अंगावर पुरेसे वस्त्र नाही तसेच राहायला धड साधी झोपडी नाही. मुलांच्या साध्या प्राथमिक शिक्षणासाठी पुरेसा पैसा नाही. अशा कष्टाने गांजलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बघून डॉ. बाबासाहेबांचे अंतकरण फार दु:खी होई. भारतीय शेतकऱ्यांना किती हालअपेष्टांचे जीवन जगावे लागते, याची पूर्ण जाणीव डॉ. बाबासाहेबांना होती. शेतकरी वर्गाचे, शेतमजुरांचे राहणीमान सुधारून त्यांचे जीवन सुखी व्हावे, त्यासाठी डॉ. बाबासाहेब धडपडत असत. स्वातंत्र्योत्तर काळातच नव्हे तर अगदी ब्रिटिश राजवटीच्या काळापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती आणि शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्नांकडे अगत्यपूर्वक लक्ष दिल्याचे दिसून येईल. शेतीच्या प्रश्नाशी अस्पृश्यतेचाही प्रश्न निगडित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना : जमिनीच्या एकत्रीकरणाने किंवा कायद्याने कोट्यावधी बहुजनांचे काही कल्याण होणार नाही. कारण ते भूमिहीन आहेत. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मंजूर पक्ष हा आपला पहिला राजकीय पक्ष ऑगस्ट १९३६ मध्ये स्थापन केला. या पक्षाचे ध्येय आणि उद्दिष्ट वेगवेगळ्या क्षेत्रात श्रम, काबाडकष्ट करणाऱ्या, घाम घालणाऱ्या मजुरांना त्यांच्या हलाखीच्या जीवनातून मुक्त करण्याचा होता. शेतीशी संबंधित लोकांच्या हिताचा त्यात प्राधान्याने विचार करण्यात आला होता. भूमिहीन शेतमजूर आणि गरीब शेतकरी यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर उपाय सुचवणे आणि प्रत्यक्षात त्यांच्या कल्याणाचे लढे उभारणे याला पक्षांनी अग्रक्रम दिला होता.

''शेतीशी आणि शेतकऱ्यांशी संबंधित समस्या या देशातील मालगुजारी, जमीनदारी आणि खोतीपद्धतीतून जन्माला आल्या आहेत. गरीब शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी सावकारांकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय नसतो. ते घेताना होणाऱ्या लिखापढी प्रसंगी सावकाराने लबाडीने टाकलेल्या अटी अशिक्षित शेतकऱ्याच्या लक्षात येत नाहीत. परिणामत: पुढे येणाऱ्या काळात तसेच लहरी निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतीतून अपेक्षित उत्पादन जर मिळाले नाही, तर त्याला गंभीर संकटांना तोंड द्यावे लागते. खोती नष्ट करण्यासाठी मी जे बिल कायदे मंडळात आणले ते मंजूर होणे, हे माझ्या प्रयत्नापेक्षा तुमच्या एकजुटीवर अधिक अवलंबून आहे. तुमची संघटना जेवढी मजबूत असेल तितके तुमच्या हिताचे कायदे तुम्हाला मंजूर करून घेता येतील.'' असे डॉ. बाबासाहेब म्हणतात.



खोती पद्धती : खोती पद्धत ही मुंबई इलाख्यातील स्वरूपाची भूधारणा पद्धत असून ती रत्नागिरी, ठाणे व कुलाबा (रायगड) जिल्ह्यांच्या काही भागात प्रचलित होती. खोती आणि सर्वसाधारण रयतावरी भूधारणा पद्धतीमध्ये फरक असा की, रयतावरी पद्धतीमध्ये शासन व जमीन कसणारे यांच्यात प्रत्यक्ष संबंध असून त्यांनी शासनाला शेतसारा द्यावयाचा पण खोती पद्धतीमध्ये शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केलेली असे. या पद्धतीमध्ये जमीन कसणाऱ्या (कुळाला) कनिष्ठ भूधारक आणि खोताला वरिष्ठ भूधारक असे म्हटले जाई. अशाप्रकारची खोती पद्धत ही काही प्रमाणात उत्तर भारतात प्रचलित असलेल्या जमीनदारीशी मिळतीजुळती आहे.

खोती पद्धतीमध्ये भूधारकाकडून शेतसारा गोळा करून त्याचा काही हिस्सा शासनाच्या तिजोरीत भरण्याची जबाबदारी खोत या व्यक्तीकडे असे. एकदा शेतसाऱ्यापैकी ठराविक रक्कम शासकीय तिजोरीत भरणा करून झाली की भूधारक वाटेल तसे वर्तन करण्याचे खोताला स्वातंत्र्य देत असे. खोत या स्वातंत्र्याचा सर्रासपणे दुरुपयोग करीत, त्यामुळे भूधारकांची आर्थिक परिस्थिती अगदी हलाखीची होत असे. पुढे याचा परिणाम असा झाला की, भूधारकामध्ये असंतोष खदखदू लागला. खोत व भूधारक यांच्यातील संबंध इतके विकोपाला गेले की, भूधारकांनी तीन खोतांना ठार मारले. या खोती पद्धतीमुळे मुंबई इलाख्याच्या एका भागातील शांतता धोक्यात आली. डॉ. आंबेडकरांनी खोती प्रश्नाची चर्चा 'बहिष्कृत भारता'तून केली. त्यात खोताकडून होणाऱ्या वेठबिगार व शेतकरी छळाची हकिकत मांडली आहे.

तत्कालीन खोतीसंबंधाचा कायदा अत्यंत अपुरा होता. त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होऊ शकत नव्हती आणि जोपर्यंत खोती नष्ट होत नाही निदान तिची नखे काढून टाकण्यात येत नाहीत व तिचे दात पाडण्यात येत नाहीत तोपर्यंत त्या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होणे केव्हाही शक्य नाही, हे बाबासाहेबांनी ओळखले होते. सदरील कायद्यांत तात्पुरती दुरुस्ती करूनही काही उपयोग व्हावयाचा नाही. याकरिता डॉ. आंबेडकर यांनी कायदे कौन्सिलमध्ये खोतीसंबंधाने एक झणझणीत बिल आणण्याचे ठरविले होते व तसे त्यांनी चिपळूणच्या शेतकरी परिषदेमध्ये

जाहीरही केले. डॉ. बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणून जमीनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि ही प्रवृत्ती शेतकऱ्याच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे, अशा स्वरूपाचे कायदे केले. राष्ट्रीयस्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करून डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्यांविषयी केवढी कणव बाबासाहेबांना होती, हे यावरून दिसून येते.

विधेयकामागील कारणे

खोतांनी शासनाला महसूल, कर देणे बंधनकारक असले तरी त्या शेतजमिनीवर राबणाऱ्या मजुरांवर अन्यायकारक अटी लादण्याचे स्वातंत्र्य शासन खोतांना देत असल्याने खोत शेतमजुरांकडून जुलुमी वसुली करतात, बेकायदा मागणी करतात, परिणामत: शेतमजूर कंगाल, लाचार, दरिद्री होत. एकप्रकारे हतभागी गुलामगिरी त्यांना भोगावी लागते. गेल्या काही वर्षात शेतावर राबणाऱ्या मजुरांनी या खोतांच्या विरोधात आंदोलन सुरू केले असून, खोती पद्धत नष्ट करण्याची ते मागणी करीत आहेत. डॉ. आंबेडकरांनी या सर्व बाबी हे विधेयक मांडताना केलेल्या भाषणात सभागृहाच्या निदर्शनास आणल्या होत्या. महसूल वसूल करण्यासाठी खोती पद्धती शासनाला उपयोग व लाभकारी सिद्ध होत असली तरी पण या पद्धतीचे दुष्परिणाम इतके भयावह आहेत की, प्रांतातील शांतता आणि सुव्यवस्थेसाठी ती हानिकारक सिद्ध झाल्याने तिला मुदतवाढ मिळता काम नये, असा इशाराही या भाषणाप्रसंगी डॉ. आंबेडकरांनी दिला. संघटनांच्या वतीने मुंबई विधिमंडळावर डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात एका मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आझाद मैदानावर त्यांचाच अध्यक्षतेत प्रचंड जाहीर सभा झाली. संख्येनी अगदीच कमी असणारे खोत किंवा सावकार, लक्षावधींच्या संख्येतील काबाडकष्ट करणाऱ्यांवर हुकूमत गाजवतात, त्यांची पिळवणूक करतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी शेतकरी, शेतमजुरांनी त्यांच्या होणाऱ्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याचे, त्यासाठी लढा उभारण्याचे आव्हान त्यांनी आपल्या भाषणात केले.

विधेयकातील तरतूदी

- शासनाने ती पद्धत बंद केल्यावर त्याविरुद्ध कुणाला न्यायालयात आव्हान देता येणार नाही, अशी त्यात तरतूद होती. या विधेयकाच्या अनुषंगाने अधिसूचना निघाल्यावर खोत कर द्यायला बाध्य असणार नाही.
- खोत म्हणून मिळणाऱ्या अधिकारांपासून या कायद्यान्वये वंचित झाल्यावर शासन खोतांना नुकसान भरपाई देईल, प्रस्तुत विधेयकान्वये खोती पद्धत रद्द झाल्यावर व्यवस्थापनासाठी खोताच्या अधिकारात असणाऱ्या शेत जमिनीवर त्या शेतीशी संबंधित शेतमजुरांना सन १८७९ च्या भूमी महसूल नियम भाग ३ (१७) प्रमाणे उपलब्ध सर्व अधिकार मिळतील. प्रस्तुत कायदा लागू झाल्यावर जर व्यवस्थापन किंवा वहिवाटी विषयी काही संघर्ष निर्माण झाला तर, विशिष्ट अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून चौकशीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून निकालासाठी जिल्हा न्यायालयाकडे किंवा त्यासाठी नियुक्त न्यायाधिकरणाकडे सुपूर्द करण्यात येईल. अशा तरतुदींचा या विधेयकात समावेश होता.

हे विधेयक मांडल्यानंतर काही अवधीतच म्हणजे दि. १० जानेवारी १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्ष आणि काही शेतकरी चार ते पाच वर्षांनी भारताच्या हाती आपल्या भवितव्याची सर्व सूत्रे येण्याची शक्यता आहे, यावेळी तुम्ही तुमचे खरे प्रतिनिधी विधिमंडळावर पाठविण्याची दक्षता घ्या. जे उमेदवार खोती पद्धतीचा नायनाट करण्यास निष्ठेने झटतील अशांनाच तुम्ही निवडून द्या. सन १९२७ मध्ये शोषित वर्ग परिषदेत अध्यक्ष पदावरून बोलताना बाबासाहेब म्हणाले, 'जोपर्यंत उत्पादनाची साधने मूठभर लोक व्यक्तिगत स्वार्थासाठी वापरीत आहेत, तोपर्यंत सामान्य माणसाला उत्कर्षाची आशा नाही.' (गांधीवादाच्या तत्त्वाप्रमाणे पहिले तर शेतकरी हा शेतातील तिसरा बैलच होईल. नांगराच्या दोन बैलाबरोबर तोही एक तसाच निर्बुद्ध आणि कष्टमय जीवनाचा प्रतीक ठरेल.) बाबासाहेबांनी महार वतनांचे उच्चाटन करण्यासाठी देखील एक विधेयक आणले होते. विधिमंडळात एकदा बाबासाहेबांनी खोतीअंतासाठी मुंबई विधिमंडळावर मोर्चा नेला होता. खोतीचा नाश होवो. आंबेडकरांच्या विधेयकाला पाठिंबा द्या, अशा घोषणा शेतकरी करीत होते. त्यांच्या शिष्टमंडळाने शेतमजुरांचे किमान वेतन ठरवणे, खोतीपद्धती नाश करणे, शेतकऱ्यांना कालव्याच्या पाण्याचे बिल अर्धे करणे इत्यादी मागण्या केल्या होत्या.

तसेच ८० वर्षांपूर्वी त्यांनी केलेल्या मागण्या आजही कशा औचित्यपूर्ण आहेत, हेही निदर्शनास येते. देशाला स्वातंत्र्य मिळण्याचा दिवस जवळ येत असतानाच्या काळात देशाचे संविधान निर्मितीच्याही हालचालींना, घडामोडींना वेग प्राप्त झाला होता. भविष्यकालीन संविधान निर्माण करण्याची जबाबदारी ज्या संविधान समितीवर सोपविली गेली होती, त्या समितीला आपल्याला कशा प्रकारचे संविधान हवे हे सांगणारे एक निवेदन तयार करून ते संविधान समितीला सादर करण्याचा निर्णय अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आणि हे निवेदन तयार करण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकरांवर सोपविण्यात आली. त्यांनी ते तयार केले आणि संविधान समितीला ते सोपविण्यात आले. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'या निवेदनाची टाइप केलेली प्रत माझ्या ज्या हिंदू मित्रांनी वाचली, त्यांनी मला आग्रह केला की, व्यापक स्तरावर मी ते प्रस्तुत करावे.' त्यांच्या सूचनेला प्रतिसाद देत डॉ. आंबेडकरांनी ते ग्रंथ रूपात प्रकाशित केले. त्यांचा तो ग्रंथ म्हणजे 'स्टेट अँड मायनॉरिटीज' हा होय. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'माझ्या कल्पना सामान्य पद्धतीने सांगण्यापेक्षा संविधानाच्या परिच्छेदाच्या स्वरूपात त्या मी व्यक्त केल्या आहेत.' नेमकेपणे ते कळण्यासाठी हा प्रकार अधिक उपयुक्त ठरेल, याची खात्री ते व्यक्त करतात. या पद्धतीमुळे या ग्रंथाला एक हाती लिहिलेल्या संविधानाचे एकप्रकारे स्वरूप प्राप्त झाले आहे. या ग्रंथाचे अवलोकन केल्यावर डॉ. आंबेडकरांचा संविधान विषयक अभ्यास किती सूक्ष्म आणि दांडगा होता, त्या विषयावर त्यांची किती जबरदस्त पकड होती, हे कळायला वेळ लागत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयाबाबतचे विचार कळण्यासाठी हा ग्रंथ निश्चित उपयुक्त ठरणारा आहे. त्यात त्यांनी अन्य विषयांएवढाच शेतीचा सुद्धा प्राधान्याने विचार केला. हे यापूर्वी त्यांनी व्यक्त केलेल्या शेतीविषयक विचारांच्या तुलनेत या ग्रंथातील विचार हे तुलनात्मक दृष्ट्या अलिकडच्या काळातील आणि देशाच्या संविधानातच तशी तरतूद होण्याच्या उद्देशाने व्यक्त झाले असल्याने त्या विचारांना एक वेगळं महत्त्व प्राप्त झालं आहे.

संपर्क क्र. ९४२२८१२६८४



प्रेरणादायी स्थळं!

डॉ. बबन जोगदंड, संशोधन अधिकारी (प्रकाशन),
यशदा, बाणेर रोड, पुणे



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र व राज्य सरकारने बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवार्थ अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. बाबासाहेबांच्या जीवनाशी अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा आणि स्थळांचा संबंध आहे, या घटना, ही स्थळं अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत. यापैकी काही स्थळांचा विकास करण्याचे केंद्र व राज्य सरकारनं ठरवले आहे. त्या स्थळांना 'पंचतीर्थ' म्हणून संबोधण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी स्थळांविषयीची मांडणी प्रस्तुत लेखात केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञावंताची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती देशभर साजरी होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वांसाठीच एक प्रेरणास्रोत, ऊर्जास्रोत असल्याने दिवसेंदिवस त्यांच्या अनुयायांमध्ये वाढ होत चालली आहे. त्यांची जयंती केवळ भारतापुरतीच मर्यादित न राहता अनेक देशांत या महापुरुषाच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेतले जातात. प्रज्ञेचा सागर, ज्ञानाचा महासूर्य, समतेचा पुरस्कर्ता आणि दीन-दलितांचा उद्धारकर्ता अशी कितीतरी विशेषणं लावली तरी त्यांच्या कीर्तीपुढे फिकी पडतील. एवढी महानता डॉ. आंबेडकरांची होती. त्यांनी आपलं संबंध आयुष्य विद्येसाठी खर्ची केल्यानं कोलंबिया विद्यापीठानं त्यांचा पुतळा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारामध्ये बसविला. त्यांनी जिथं जिथं प्रवेश केला, त्यांचा जिथं जिथं स्पर्श झाला. त्या सर्व वास्तू पावन झाल्या आहेत.

महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अनेक स्मरणस्थळे आहेत. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंगाच्या काही वास्तू साक्षीदार आहेत. त्यात त्यांचे जन्मगाव आंबाडवे, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी, त्यांनी जिथं बौद्ध धम्माची दीक्षा घेतली ती नागपूरची दीक्षाभूमी, माणगाव, ता. कोल्हापूर येथे घेतलेली माणगाव परिषद, महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, येवला, जि. नाशिक येथे केलेली धर्मांतरांची घोषणा, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, सातारा शाळेतील पहिलीचा प्रवेश, त्यांनी सुरू केलेले औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालय, मुंबई येथील त्यांचे निवासस्थान राजगृह, पुण्यातील तळेगाव येथील त्यांचा बंगला, देहूरोड येथे स्थापन केलेली बुद्धमूर्ती. अशा कितीतरी स्थळांचा उल्लेख करता येईल. या स्थळांना अनेक जण आज श्रद्धेनं भेटी देऊन डॉ. आंबेडकरांच्या स्मृती जाग्या करतात, त्यातून प्रेरणा घेऊन तिथे नतमस्तक होतात.

या महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण स्थळांव्यतिरिक्त आणखी काही विदेशातील स्थळेही डॉ. आंबेडकराच्या सहवासाने पुनीत झाली आहेत, त्यामध्ये लंडन येथे शिकण्यासाठी डॉ. आंबेडकर ज्या बंगल्यात वास्तव्यास होते तो बंगला, कोलंबिया विद्यापीठ (न्यूयार्क), ग्रेज इन विद्यापीठ (जर्मनी) तर देशातील मध्यप्रदेशातील त्याचं जन्मगाव महू, दिल्ली येथील २६, अलीपूर रोड येथील निवासस्थान आणि त्याचं महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांच्यावर अत्यंसस्कार करण्यात आलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमी. ही सर्व स्थळं बाबासाहेब प्रेमींसाठी अत्यंत महत्त्वाची ठिकाणं आहेत. महाराष्ट्रातल्या नागपूर येथील दीक्षाभूमी, येवला येथील मुक्तीभूमी, त्यांचे जन्मगाव आंबडवे 'स्फूर्तीभूमी' आणि मुंबई येथील चैत्यभूमीला दरवर्षी लाखोंचा जनसागर जमतो. या स्थळांचा विकास महाराष्ट्र सरकारने केला आहे. नुकताच नागपूर येथील दीक्षाभूमीला 'अ' वर्ग पर्यटनाचा दर्जा शासनाने दिला आहे. या सर्वच पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी देश-विदेशातून अनेकजण येत असतात.

जसजसे डॉ. आंबेडकरांचे विविध पैलू लोकांना समजत आहेत, तसतशी त्यांची कीर्ती चौहूमुलखी गाजत आहे. म्हणून अनेक देशातील लोक म्हणतात, आमच्या देशात डॉ. आंबेडकर जन्मायला हवे होते, एवढी मोठी इतर देशांनी दखल घ्यावी, अशी क्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात केली आहे.

या देशाचे संविधान 'सर्वश्रेष्ठ संविधान' आहे. त्याचाही अनेक देश गौरवाने उल्लेख करतात आणि आपसूकच 'संविधानाचे निर्माते' म्हणून डॉ. आंबेडकरांचे नाव पुढे येते. संबंध देश या महापुरुषाच्या जन्माला १२५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती साजरी करीत असताना केंद्र सरकारने वर्षाआधीच डॉ. आंबेडकरांच्या जयंती निमित्त करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाचं 'सेलिब्रेशन' हाती घेतलं आहे. केंद्र व राज्य सरकारने यासाठी समित्या नियुक्त केल्या आहेत. **केंद्र सरकारच्या समितीचे अध्यक्ष खुद्द पंतप्रधान मा. ना. श्री. नरेंद्र मोदी आहेत. त्यांनी पाच महत्त्वपूर्ण स्थळांचा विकास करण्याचं ठरवलं आहे. ती 'पंचतीर्थ' म्हणून नावारूपाला येणार आहेत.** या माध्यमातून डॉ. आंबेडकरांचे कार्य, त्यांचे विचार नव्या पिढीसाठी एक अमूल्य ठेवा ठरणार आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ एका विशिष्ट समूहासाठी काम केले नाही तर त्यांनी सर्व शोषित, पीडित, वंचित उपेक्षित या वर्गांबरोबरच या देशातील सर्व लोकांकरिता काम केले आहे. म्हणून ते सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. शासनाने जी 'पंचतीर्थ' म्हणून विकसित करण्यासाठी स्थळं घेतली आहेत. त्यात (१) महू मधील स्मारक (२) आंबडवे गाव (३) दिल्ली येथील निवासस्थान (४) इंदू मिल (५) लंडन येथील घर आदींचा समावेश आहे.

महू (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ)

डॉ. बाबासाहेबांचे वडील श्री. रामजी सपकाळ यांनी पुण्यात आपले शिक्षण पूर्ण केले. पंतोजी शाळेमध्ये ते होते. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लष्करामध्ये शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. नंतर शाळेत ते प्रधान शिक्षक झाले. त्यानंतर त्यांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली. १४ वर्ष मुख्याध्यापकाचे काम सांभाळल्याने त्यांना सैन्यात मेजर (सुभेदार) म्हणून बढती मिळाली. नंतर ते महू इथे नोकरी निमित्त वास्तव्यास होते. कारण महूला (MHOW) मिलिटरी हेडक्वार्टर्स ऑफ वॉर म्हणून ओळखले जाई. तेथेच डॉ. बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला.

भीमाबाई यांच्या पोटी जन्म घेणारे डॉ. बाबासाहेब हे १४ वे अपत्य होते. भीमाबाई यांचे बाबासाहेबांच्या बालपणीच निधन झाले.





(भीमाबाईची समाधी सातारा इथे आहे.) बाबासाहेबांचे नाव 'भीम' असे ठेवण्यात आले. नंतर 'भीम' यांचे भीमराव आणि भीमराव यांना नंतर लोक आपले 'बाबा' संबोधू लागले आणि नंतर ते सर्वांचे बाबासाहेब झाले. या भिमाचा सांभाळ डॉ. आंबेडकरांची आत्या मीराबाई हिने केला. हा भीम बुद्धिवान व्हावा, त्यांनी दीन–दलित समाजाचा उद्धार करावा, अशी पिता रामजी सुभेदार यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी लहानपणीच बाळ 'भीम' यांच्यावर पाच मूल्यसंस्कार रुजविले होते. त्यामध्ये (१) शिक्षण (२) शिस्त (३) स्वावलंबन (४) स्वाभिमान (५) कठोर परिश्रम यांचा समावेश आहे. या मूल्यांचा बाबासाहेबांनी आपल्या जीवनात अंगीकार केला आणि त्यानुसार वाटचाल केली आणि पुढे हा 'भीम' या देशातील दीन–दलितांचा उद्धारकर्ता, भारतीय राज्यघटनेचा निर्माता ठरला. म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळाला म्हणजे 'महू'ला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. महू इथे लाखो पर्यटक दरवर्षी भेट देऊन बाबासाहेबांच्या जन्मस्थळाला वंदन करीत असतात. महू इथे बाबासाहेबांच्या जन्मस्थळावर शासनाने यथोचित स्मारक उभे केले आहे. हे स्मारक एक चैतन्याचा झरा आहे.

महू इथे जाण्यासाठी – मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ येथून दोन ते तीन तासांच्या अंतरावर व इंदौर येथून २० किलोमीटरच्या अंतरावर महू आहे.

आंबडवे

प्रत्येकालाच आपल्या गावाचा अभिमान वाटतो. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील संस्मरणीय स्थळ म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबडवे हे गाव होय. अतिशय कमी लोकवस्ती असलेले हे बाबासाहेबांच्या पूर्वजांचे गाव. इथे सपकाळ कुटुंबीय वास्तव्य करून राहते. या सपकाळ घराण्यातीलच डॉ. आंबेडकर. खरे तर त्यांच्या आडनावाची कहाणी मोठी रंजक आहे. बाबासाहेबांचे आडनाव सपकाळ. नंतर त्यांच्या वडिलांनी बाबासाहेबांचे आडनाव सातारा येथील प्रतापसिंह शाळेत आंबाडवेकर असे ७ नोव्हेंबर १९०० रोजी नोंदवले. आजही ७ नोव्हेंबर हा शाळा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा 'शाळा प्रवेश दिन' म्हणून साजरा होतो. कारण आजही शाळेत बाबासाहेबांचं नाव नोंदवलेले रजिस्टर आणि त्यांची स्वाक्षरी पाहावयास मिळते. या शाळेत त्यांना शिकवण्यासाठी आंबेडकर नावाचे शिक्षक होते. त्यांचे बाळ भीमावर खूप प्रेम होते. कारण बाबासाहेब लहानपणापासून खूप चाणाक्ष, अभ्यासू आणि संस्कारक्षम विद्यार्थी होते. म्हणून ते सातत्याने भीमाला जीव लावत असत. प्रसंगी त्यांना खाण्यासाठी घरून भाजी भाकरी आणत. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनीड वाटत असे म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर, त्यांनी असे भीमाला सुचविले. त्याला बाळ भीमाने लगेच होकार दिला आणि बाबासाहेबांचे आडनाव आंबडवेकराचे 'आंबेडकर' झाले. तशी नोंद शाळेत झाली. तेव्हापासून बाळ भीमाचे नाव आंबेडकर झाले. इथेही पुण्याच्या अशोक सर्वांगीण विकास संस्थेने अशोक स्तंभ आणि शिलालेख उभारून त्याला स्फूर्तीभूमी असे नाव दिले आहे. असे आंबाडवे हे डॉ. बाबासाहेबाचे गाव त्यांच्या आडनावामुळे आणि त्यांच्या मूळगावामुळे जगाच्या नकाशावर प्रसिद्ध आहे. आता हे गाव खा. अमर साबळे यांनी दत्तक घेऊन या त्यांच्या मूळ गावाचा विकास हाती घेतला आहे.

आंबडवे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड या तालुक्याच्या ठिकाणापासून १७ किलोमीटर अंतरावर आहे.

दिल्लीतील २६, अलीपूर रोड येथील निवासस्थान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरेच काळ देशाची राजधानी दिल्ली इथे वास्तव्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा देशाचे कायदामंत्री बनले तेव्हा दिल्लीमधील २६, अलीपूर रोड येथील निवासस्थान त्यांना देण्यात आले. इथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध विषयांवर लेखन केले. त्यामध्ये जो प्रसिद्ध ग्रंथ आहे तो 'बुद्धा अँड हिज धम्मा' बुद्ध और कार्ल मार्क्स, याचा समावेश आहे. तसेच अनेक सामाजिक, राजकीय चळवळीच्या संदर्भात बैठकाही याच निवासस्थानी बाबासाहेबांनी बोलविलेल्या होत्या. डॉ. आंबेडकरांसमवेत माई आंबेडकर इथेच होत्या. बाबासाहेबांनी जीवनभर खूप परिश्रम घेतले अभ्यास, चिंतन, दौरे लेखन याला त्यांनी खूप वाहून घेतल्याने ते आजारी असायचे. त्यांना ङ्गशुगरफ्ही होती. अचानकपणे वयाच्या ६५ व्या म्हणजेच ६ डिसेंबर १९५६ रोजी रात्री झोपेतच डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या निधनाची वार्ता दुपारी आकाशवाणीवरून संबंध देशभर पसरली. या त्यांच्या निधनाने भारतीय समाजाचे हृदय हेलावले. अनेकांना खूप दु:ख झाले.दलित समाज तर पुरता शोकसागरात बुडाला. दीन –दलितांच्या उद्धाकर्त्यांचा अस्त झाल्याने अनेकांनी २६, अलीपूर रोड गाठून त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी रीघ लावली. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू त्यांच्या निवासस्थानाकडे गेले. पंडित नेहरू हे बाबासाहेबांना मंत्रिमंडळातील सर्वांत हुशार, ज्ञानी मंत्री म्हणून संबोधत असत.डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्रात

विशेषत: मुंबईत अधिक वास्तव्य केल्याने व महाराष्ट्रातील ते मूळ रहिवाशी असल्याने त्यांच्यावर मुंबईत अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अंत्यदर्शनासाठी त्यांचे शव खास विमानाने मुंबईला नेण्यात आले. ७ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दादर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यसंस्काराला महाराष्ट्र व देशातील त्यांचे लाखो चाहते उपस्थित होते. मुंबईने पहिल्यांदाच एवढी विशाल अंत्ययात्रा अनुभवली. आज जिथे डॉ. आंबेडकरांवर अंत्यसंस्कार झाले ती जागा ङ्गचैत्यभूमीफ म्हणून प्रसिद्ध आहे. ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी लाखो चाहते त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथे येतात. दिल्ली येथील २६ अलिपूर रोड या स्थळाला डॉ. आंबेडकरांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याने हा त्यांचा बंगला एक ऐतिहासिक स्मारक ठरला आहे. या स्थळांचा केंद्र सरकारने आणखी विकास करण्याचे ठरविले आहे. इथे जाण्यासाठी दिल्ली मेट्रो आहे. दररोज सकाळी ९ ते रात्री ६ वाजेपर्यंत विधानसभा मेट्रो स्टेशनपर्यंत ट्रेनने जाऊन या ऐतिहासिक स्थळाला भेट देता येईल.

इंदू मिल

इंदू मिल ही मुंबईच्या दादरमध्ये आहे. याच भागात डॉ. आंबेडकरांचे 'राजगृह' हे निवासस्थान होते. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे पार्थिव शरीर इथेच अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. ७ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दादर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबासाहेबांचे निवासस्थान राजगृह आणि त्यांच्यावर अंत्यसंस्कार केलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमी हे दादर याच परिसरात असल्याने ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी मोठी गर्दी होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य असे स्मारक दादर येथील इंदू मिलच्या जागेवर व्हावे, अशी लाखो लोकांची अपेक्षा होती. म्हणून शासनाने या महापुरुषांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन इंदू मिलची १२ एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी दिली. नुकताच या स्मारकाच्या पायाभरणीचा समारंभ देशाचे पंतप्रधान मा. ना. श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. यावेळी मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, राज्यपाल माननीय सी. विद्यासागर राव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होणार असून या स्मारकात स्मृती स्तूप, सभागृह, प्रेक्षकगृह, वास्तू संग्रहालय, ग्रंथालय, शोभिवंत बगीचा तसेच वाहनतळ असणार आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत हे स्मारक होत असल्याने या स्मारकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. बाबासाहेबांच्या



कार्यकर्तृत्वाचा इतिहास पुढील पिढीला समजण्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. या नियोजित स्मारकाला भेट देण्यासाठी परेल येथील लोकल रेल्वे स्टेशन येथून जाता येईल.

इंग्लंडमधील घर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी काही देशात जावे लागले. ते दि. ५ जुलै १९२० रोजी लंडनला उच्च शिक्षणाकरिता रवाना झाले. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अ‍ॅण्ड पॉलिटीकल्स सायन्समध्ये त्यांनी एम.एस.सी. साठी प्रवेश मिळवला. त्या काळात अस्पृश्य समाजातील जन्म घेतलेला एकमेव विद्यार्थी या देशात शिक्षणाकरिता गेला होता. त्यांनी या संस्थेत एम.एस.सी. साठी प्रवेश मिळवला. तसेच ग्रेज इन या संस्थेतून बॅरिस्टरीचा अभ्यासही सुरू केला. लंडन विद्यापीठाने सन १९२१ मध्ये म्हणजे एक वर्षांनी त्यांना एम. एस. सी. ही पदवी प्रदान केली. त्यानंतर त्यांनी पी.एच.डी. साठी 'द प्राब्लेम ऑफ रूपी' हा प्रबंध लंडन विद्यापीठात सादर केला. त्यानंतर त्यांना सन १९२२ मध्ये या विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली.



डॉ. आंबेडकर सन १९२१ ते १९२२ अशी दोन वर्ष लंडनमध्ये किंग हेन्री या मार्गावर एका घरात राहत होते. याच घरात त्यांनी रात्र-रात्र जागून अभ्यास केला. प्रसंगी उपाशी, अर्धपोटी राहून आपला उदरनिर्वाह केला. हे घर आज एक ऐतिहासिक स्मारक ठरले आहे. नुकतेच हे घर राज्य शासनाने ३५ कोटी रुपयाला खरेदी केले आहे.या घराला भेट देण्यासाठी अनेक जण इंग्लंडला जातात.या घराचे स्मारक करून इथेही डॉ. आंबेडकरांचा विचार सरकारला तेवत ठेवायचा आहे. आपल्या देशाव्यतिरिक्त परदेशातही डॉ. आंबेडकर यांच्या स्मृती प्रेरणास्थळ ठरल्या आहेत. कोलंबिया विद्यापीठाने **'द सिम्बॉल ऑफ नॉलेज'** असे त्यांच्या पुतळ्याखाली लिहून ठेवले तर इंग्लंडच्या घरावर 'सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६) यांनी सन १९२१-२२ मध्ये या घरात वास्तव्य केले.' अशी अक्षरे इथे कोरली आहेत.

डॉ. आंबेडकरांशी संबंधित या पाचही प्रेरणादायी स्थळांना 'पंचतीर्थ' म्हणून घोषित करून या स्थळांचा विकास करण्याचा सरकारने जो संकल्प केला आहे. तो अत्यंत अभिनंदनीय स्वरूपाचा आहे. डॉ. आंबेडकरांच्या स्मृती, त्यांच्या आठवणी भावी पिढीच्या हृदयात कोरायच्या असतील तर ही 'पंचतीर्थ' मोलाची भूमिका पार पाडू शकतील, यात शंकाच नाही !

संपर्क क्र. ९८२३३३८२६६



डॉ. आंबेडकर व डॉ. पंजाबराव देशमुख : समकालीन समतावादी कृषि क्रांतिकारक



श्री. बाबासाहेब भाकरे, डॉ. केशवराव ठाकरे, प्रा. वामन गवई, डॉ. कमलाकर पायस, प्रा. साहेबराव विधळे, डॉ. महेंद्र मेटे, अमरावती

महाराष्ट्रातील कोकण आणि विदर्भ या भूमीने दोन महान विभूती या देशाला दिल्यात. कोकणात जन्मास आलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर व विदर्भाचे भूमिपुत्र डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख या दोघांमध्येही वैचारिक साधर्म्य आहेत. दोघेही अनेक ज्ञान शाखेचे प्रकांड पंडित होते. दोघेही प्रखर सत्यशोधक, विज्ञानवादी व विवेकवादी विचार आणि आचार धर्माचे पाईक होते. दोघेही आपल्या आयुष्यात विषमतावादी आणि सनातनी व्यवस्थेच्या विरुद्ध लढले आणि अनेक कृतीशील कार्यक्रम आणि चळवळीव्दारे समतेचा आवाज बुलंद केला. शोषित, उपेक्षित आणि वंचित अशा गोरगरीब ग्रामीण समाजासाठी केलेल्या कार्याची इतिहासाला नोंद घ्यावी लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात भाऊसाहेबांनी मंजूर करुन घेतलेल्या कर्जालवाद बिलामुळे मध्यप्रांत व वऱ्हाडच्या हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या कर्ज कचाटयातून सोडविण्यात आल्या. त्यावेळी डॉ.आंबेडकरांनी मुंबई विभागात खोती विरुध्द आंदोलन करुन प्रत्यक्ष शेतावर राबणारा कष्टकरी, शेतकरी व शेतमजुराला न्याय देण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली.

स्वातंत्र्यपूर्वी सन १९३०–३३ या काळात मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये मंत्री म्हणून भाऊसाहेबांना काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडे शिक्षण, शेती, सहकार आणि लोककर्म खात्याचा कारभार आला. त्यावेळी त्यांनी अधिक चांगली विधेयक कायद्यात रुपांतरीत करुन घेतली. अस्पृशता निवारण बिल, बालविवाह प्रतिबंधक बिल, हिंदू देवस्थान बिल, कर्जलवाद बिल आदि महत्वाची आहेत. त्यामधील दोन महत्वपूर्ण बिलांचा येथे उल्लेख करणे आवश्यक ठरेल. डॉ.पंजाबराव देशमुख क्रांतिकारक होते. शीघ्र परिवर्तनासाठी उत्सुक होते. शोषितांबद्दल त्यांच्या मनात आस्था होती आणि वाईट प्रथा तोडणारे होते. ते सर्वसामान्याच्या विकासाचे समर्थक होते व रुढीभंजक होते. त्यासाठी त्यांनी एक महत्वाचे क्रांतिकारक बिल मांडले. ते होते हिंदू देवस्थान संपत्ती बिल १९३२.

आपल्या देशात आसेतुहिमाचल खूप मोठमोठी देवस्थाने आहेत. करोडोंची संपत्ती आणि हजारो एकर जमीन या संस्थांच्या मालकीची आहेत. त्याचे व्यवस्थापन मोजक्या पुजारी आणि पुरोहीतांकडे पिढयानपिढया आहे. या संपत्तीचा हे लोक दुरुपयोग करतात. या देवस्थान संपत्तीचा उपयोग सर्वसामान्यांसाठी झाला पाहिजे, या करीता भाऊसाहेबांनी हे बिल आणले होते. हे दूरगामी परिणाम करणारे बिल पुरोहीताशाहीला पाठीशी घालणाऱ्या कायदे मंडळात फेटाळण्यात आले. नाहीतर धार्मिक व आर्थिकदृष्टया क्रांतिकारक बदल घडवून आला असता. यावेळी डॉ.भाऊसाहेब देशमुख धर्मविरोधी व नास्तिक आहेत अशी टीका त्यांना सहन करावी लागली.

शेतकऱ्याचा पुत्र हा शेतकरी समाजासाठीच राबला व झटला पाहिजे, असेच भाऊसाहेबांना वाटायचे. संधी मिळताच त्याच्या उत्थानाच्या दृष्टीने पाऊल पुढे पडावे असेच भाऊसाहेबांना वाटायचे. मध्यप्रांत व वऱ्हाडचे मंत्री असतांना सन १९३२ मध्ये भाऊसाहेबांनी कर्जलवाद बिल मांडले. या काळात कोरडा व ओला दुष्काळ आलटून पालटून पडत होता. ग्रामीण शेतकरी समाज दुरावस्थेत होता. त्यामुळे गावे उजाड होत होती. ग्रामीण भागातील सावकार व धनवान लोक गरीब गांजलेल्या शेतकऱ्याच्या जमिनी व जनावरे कर्जापायी जप्त करीत. जमिनीपासून शेतकरी बेदखल होत होता. शेतकऱ्याच्या नशिबी दु:ख व दारिद्र्याशिवाय काहीच नव्हते. सावकार, जमीनदार जप्ती आणत होते. त्यात सरकारही अन्नधान्याची लेव्ही वसूल करीत होते. भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या शेतकरी संघाचे कार्यकर्ते त्यांना या सर्व घटनांची व स्थितीची अद्यावत माहिती देत होते. भाऊसाहेब दिवसेंदिवस अस्वस्थ होत होते. भाऊसाहेब कामाला लागले. शेतकऱ्यांच्या दुर्दशेविषयी विवरण असणाऱ्या सर्व जुन्या विविध आयोगातील माहिती त्यांनी संकलित केली. सन १८७५चा दक्षिण रयत कमिशन रिपोर्ट, सन १९०१ चा दुष्काळी कमिशन रिपोर्ट, सन १८९५ चा सर एफ.निकल्सन रिपोर्ट, सन १९११ चा ओक्लेगन रिपोर्ट, सन १९१८ चा दुष्काळी स्थिती अहवाल या सर्वांची माहिती भाऊसाहेबांनी जमा करुन त्याचा अभ्यास केला. पहिल्या महायुध्दानंतर मंदीची भयंकर लाट आली. सन १९३० साली शेतमालाचे मूल्य ५० टक्क्यांनी घसरले. ७० टक्क्यांच्यावर शेतकरी कर्जबाजारी झाला. मुखर्जी कमिशनच्या अहवालानुसार सन १९१९ साली शेतकऱ्यावर ६०० कोटी रुपयांचे जे कर्ज होते ते १२०० कोटीपर्यंत गेले होते. यातून शेतकऱ्याला सोडविले पाहिजे व त्याची जमीन सावकाराच्या जप्तीपासून वाचविली पाहिजे. तरच स्वातंत्र्याच्या चळवळीला व पुढे येणाऱ्या स्वातंत्र्याला काही अर्थ ठरेल असे भाऊसाहेबांना वाटायचे. भाऊसाहेबांनी सर्व दृष्टीने विचार करुनच हे कर्जलवाद बिल आणले.

देवस्थान संपत्ती बिलाला सभागृहात व सभागृहाबाहेर झालेला विरोध भाऊसाहेबांनी अनुभवला होता. सर्वसामान्याच्या विकासाच्या आड येणारी सभागृहाची मनोवृत्ती भाऊसाहेबांना माहिती होती. म्हणून हे बिल त्यांनी स्वत: तयार केले पण सभागृहामध्ये मांडले नाही. हे सरकारी बिल म्हणून मांडण्याची विनंती त्यांनी गव्हर्नर सर बटलर यांना केली आणि त्यांचे सुटीच्या काळातील कार्यकारी गर्व्हनर अर्थमंत्री आर्थर एडवर्ड नेल्सन यांना या बिलाची आवश्यकता व विशेषत: पटवून दिली. गृहमंत्री राघवेन्द्रराव आणि अर्थमंत्री एस.सी.गोवेन आदींनी बिलाला पाठिंबा देवून सरकारी बिल म्हणून ते ठेवण्यात आले. दि. २९ ऑगस्ट १९३२ ते दि. २६ जानेवारी, १९३३ पर्यंत कायदेमंडळ या विषयावर चर्चा आणि वादविवाद झाले. सरकारी बिल म्हणून पुढे विरोधक कमी होत गेले व शेवटी बिल पारित होऊन त्याचे कायद्यात रुपांतर झाले.

भारताची राज्यघटना निर्मिती

संविधान देशाचा सर्वोच्च भाग आहे. संविधानाने संसदीय लोकशाही समाजवादी कायद्याच्या अधिराज्याची निर्मिती केली. संविधानाने देशातील



घटनेच्या मसुदा समितीच्या सदस्यांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

संसदेत लोकसभा आणि राज्यसभा सदस्यांना विशेष अधिकार आहेत. तसेच ते राज्य विधीमंडळाला असावेत आणि या सोबतच केंद्रशासनाचा राज्य विधी मंडळामध्ये हस्तक्षेप असू नये या संदर्भातील दि. ३१ ऑगस्ट, १९४९ च्या चर्चेत डॉ.पंजाबराव देशमुख यांचा मोलाचा वाटा आहे. केंद्र व राज्याच्या विधी मंडळाचा सन्मान, प्रतिष्ठा आणि कायदा निर्मितीची सर्वोच्चता अधोरेखित करणाऱ्या संसदेच्या दि. ३ जून, १९४९ च्या चर्चेतील डॉ.पंजाबराव देशमुख व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्रश्न उत्तरे, चर्चा संवादात घटना निर्मितीतील उच्चकोटीच्या विधीज्ञांच्या अभ्यासकांच्या बुध्दिप्रामाण्यवादी भूमिका स्पष्ट होतात. म्हणूनच संविधान देशाचा मुलभूत दस्तऐवज ठरतो.

सर्व घटकांच्या विकासासाठी कल्याणकारी राज्याची निर्मिती केली. म्हणून संविधानाचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वमान्य आहेत. संविधान सभेमध्ये मध्य प्रांत व वऱ्हाडमधून डॉ. पंजाबराव देशमुख संविधान सभेवर सदस्य म्हणून निवडून गेले होते. भाऊसाहेबांनी संविधान सभेमध्ये अनेक सुचना केल्यात, ठराव दिलेत व दुरुस्त्या सुचविल्यात.

तथापि संविधान निर्मिती प्रक्रिया चकमक आणि गागोतीच्या घर्षणातून ठिणगी पडते तशी संविधान सभेमध्ये झालेल्या चर्चेत सात हजार दुरुस्त्या सुचविल्या गेल्यात व दोन हजार चारशे त्र्याहत्तर ठराव मांडले गेले. डॉ.आंबेडकरांनी सर्वांची उत्तरे संविधान सभेचे समाधान होईपर्यंत दिलीत. दि. २५ नोव्हेंबर, १९५० रोजी संविधान सभेमध्ये केलेल्या संस्मरणीय भाषणात बाबासाहेब म्हणाले, 'जर सर्व सदस्यांनी पक्ष शिस्तीचे नियम काटेकोरपणे पाळले असते तर संविधान सभेचे कामकाज फारच कंटाळवाणे झाले असते व संविधान सभा होबांची झाली असती. सुदैवाने काही सदस्य बंडखोर निघाले. त्यांच्यामध्ये कामथ, डॉ.पंजाबराव देशमुख, रुस्तम के.सिध्वा, प्रा.सक्सेना आणि पंडित ठाकुरदास भार्गव होते.' यावरुन भाऊसाहेबांचे संविधान निर्मितीच्या प्रक्रियेमधील योगदान दिसून येते.

भाऊसाहेबांची संविधान सभेमधील भाषणे प्रभावी राहीली आहेत. त्यामध्ये श्री दिवाकर यांनी मांडलेला ठराव 'शासकीय दाखल्यावरील जात उल्लेख काढावा' यावर भाऊसाहेबांनी भारतीय जात व्यवस्थेची मानसिकता मांडली व ती नष्ट करण्यासाठी उपाया सुचविलेत. भाऊसाहेबांनी मांडलेले ठराव 'शेतकरी व शेतमजूर यांच्या कल्याणासाठी केंद्राची स्थापना करणे' यावर व्यापक चर्चा झाली. ज्याप्रमाणे कामगार कल्याण केंद्र कामगारांच्या विकासासाठी काम करते, त्याप्रमाणे शेतकरी शेतमजूरांकरीता कल्याण केंद्र स्थापन करण्याचा ठराव भाऊसाहेबांनी मांडला होता.


राज्यातील उच्चशिक्षण वैज्ञानिक आणि तंत्रशिक्षण संस्था आणि संशोधन संस्था यांचा दर्जा अखिल भारतीय दर्जाचा असावा. यासाठी राष्ट्रीय स्तरावर उच्चशिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, संशोधन यावर केंद्र सरकारचे नियंत्रण असावे असे दि. ३१ ऑगस्ट, १९४९ च्या भाऊसाहेब व बाबासाहेबांच्या चर्चेमधून दिसून येते.

बाबासाहेब आणि भाऊसाहेबांची सामाजिक क्रांती

अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून सन १९१७ पासून चळवळी सुरु झाल्यात. पण त्याचे स्वरुप मर्यादित व अनुकंपेवर आधारित होते. सन १९२० नंतर बाबासाहेबांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. सन १९२७ ला महाडचा सत्याग्रह करुन सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले. त्याचवेळी डॉ.पंजाबराव देशमुख सन १९२६ ला उच्चशिक्षण घेवून भारतात परतले व त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहाने भाऊसाहेबांनी सामाजिक क्रांतीची सुरुवात केली.

अमरावती येथे अंबादेवीचे पुरातन मंदिर आहे. हे मंदिर अस्पृश्यांना खुले व्हावे म्हणून सन १९२५ पासून चळवळ सुरु झाली. माधवराव गोविंद मेश्राम यांनी मंदिराच्या पंचकमेटीकडे अस्पृश्यांना प्रवेश द्यावा, असा अर्ज पाठवून विनंती केली. पण कमेटीने त्याला प्रतिसाद दिला नाही. अनेक अर्ज करुनही पंच कमेटी प्रतिसाद देत नव्हती. तेव्हा ब्राम्हणेतर पुढारी दादासाहेब पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख यांनी मंदिर प्रवेशाच्या आंदोलनामध्ये उडी घेतली. सन १९२७ ला मोर्शी येथे लाला लजपत रॉय यांच्या अध्यक्षतेखाली हिंदू महासभेचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भात डॉ.पंजाबराव देशमुख म्हणाले, 'आमची गुलामगिरी नष्ट करण्याकरीता अस्पृश्यता निवारणासारख्या सुधारण्याच्या चिठ्या हिंदू धर्माला जोडून आम्ही त्याची भोके बुजविण्याचा प्रयत्न करता. चातुर्वण्य व्यवस्थेचा रांजण जर नष्ट झाला नाहीतर तो रांजण फोडून टाकण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाही.' भाऊसाहेबांचे उपरोक्त विधान व बाबासाहेबांची अस्पृश्यता निवारणासाठी घेतलेली भूमिका यात साम्य दिसून येते. पुढे अंबादेवी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करण्याचे ठरले. त्या सत्याग्रहापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद घेण्याचे ठरले. त्यासाठी सत्याग्रह समिती गठीत करण्यात आली. त्या समितीचे अध्यक्ष स्वत: डॉ.पंजाबराव देशमुख होते तर कार्यवाह म्हणून संपतराव गणपतराव नाईक, सदस्य म्हणून वकील चौबळ, रणदिवे, नानासाहेब अमृतकर, शामराव गुंड, दलपतसिंह चौहान होते.

(पान ५५ वर)



नदी खोऱ्यांचा शाश्वत विकास आणि मौलिक चिंतन

डॉ. डी. टी. गायकवाड, सहायक ग्रंथालय तथा माहिती अधिकारी,
केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र, खडकवासला, पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १२६ वी जयंती साजरी होत आहे. त्यांनी देशाला केलेल्या भरीव योगदानाचा व मूलगामी विचारांचे चिंतन होत आहे. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व विविध गुणांनी दिपून टाकणारे आहे. त्यांनी भारताच्या संपूर्ण जडणघडणीत अग्रक्रमाची भूमिका निभावलेली आहे. विशेषत: बाबासाहेबांनी कृषि, जलसंपदा, श्रम, सिंचन व वीज क्षेत्रात शाश्वत विकासाच्या संकल्पना व प्रकल्प राबवले आहेत. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात शाश्वत विकासाचे मॉडेल विकसित करता येण्यासाठी दिशादर्शन केले आहे. त्यांच्या प्रत्येक ग्रंथातून केलेली मांडणी ही लोक कल्याणाची व देश विकासाचेच मॉडेल ठरली आहे.

तथापि, आजचे वाढणारे शहरीकरण व लोकसंख्येचा देशातील उपलब्ध जल संसाधनावर कमालीचा ताण आला आहे. देशातील विविध क्षेत्रातील पाण्याची आवश्यकता व उपलब्धता संदर्भात स्थायी कमिटीने दिलेल्या अहवालावरुन भविष्यात पाण्याची मागणी सर्व क्षेत्रात वाढत असून सन २०२५ आणि सन २०५० मध्ये अनुक्रमे १०९३ अब्ज घन मीटर (BCM) आणि १४४७ अब्ज घन मीटर वाढेल असा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे पाण्याची मागणी आणि उपलब्धता लक्षात घेता पाण्याचे संवर्धन हा एकच पर्याय उपलब्ध आहे. देशातील नदी खोऱ्यांचा शाश्वत विकास करणे हा पर्याय पुढे येऊन आंतरराज्य नदी खोरे स्थानांतर ही कल्पना पुढे आली. त्याचप्रमाणे रस्ते, वाहतूक, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज व दळणवळण आदी मूलभूत सुविधा अत्यावश्यक आहेत. लोकांची कार्यक्षमता, क्रयशक्ती, उत्पादकता वाढवून शेती, उद्योग सेवा याचा दीर्घ विकास म्हणजे देशातील सर्व नैसर्गिक संसाधनाचे वा संपत्तीचे योग्य वाटप करणे आवश्यक आहे. सन १९४२ ते ४६ च्या दरम्यान शेती, उद्योग, पाटबंधारे, वित्त आणि औद्योगिक क्षेत्रात दीर्घकालीन विकासाकरिता डॉ. आंबेडकरांचे योगदान विसरता येणार नाही. देशातील नद्यांचे व्यवस्थापन, पाण्याचे नियोजन, वितरण, धरणांची निर्मिती व कार्यान्वयन जलविद्युत परियोजनांचा विकास इ. क्षेत्रात त्यांनी मौलिक व मूलगामी चिंतन केले आहे.

डॉ. आंबेडकरांचे जलनीती विषयक धोरण व योगदान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन १९४२ ते १९४६ च्या दरम्यान व्हॉईसरॉयच्या मंत्रिमंडळात सदस्य असताना त्यांनी देशाच्या विकासाच्या संकल्पना व प्रकल्प दिले. त्यात तांत्रिक संस्थांची निर्मिती, जलसंसाधनाचे संवर्धन, दामोदर नदी खोरे प्रकल्प, महानदी खोरे विकास प्रकल्पात हिराकूड धरणाची निर्मिती, सोननदी प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प तसेच नदी खोरे प्राधिकरण, सिंचन व विद्युत शक्ती, आंतरराज्यीय नद्यांचे जाळे इत्यादींचा समावेश आहे. यापैकी बहुद्देशीय नदी खोरे शाश्वत विकास विषयक डॉ. आंबेडकरांची भूमिका व धोरण उल्लेखनीय आहे.

डॉ. आंबेडकर सन १९४२-४६ च्या दरम्यान व्हॉईसरॉय मंत्रिमंडळात असताना जलनीती विषयक क्षेत्रात केव्हा, कोठे, काय व कसे योगदान केले, यावर उपलब्ध संदर्भ साधनांचे सिंहावलोकन केले असता काही



निवडक प्रकाशन साहित्य हाताला लागले. त्यावरून 'बहुउद्देशीय नदी खोरे विकास प्रकल्पा'मधील डॉ. बाबासाहेबांच्या योगदानाचे महत्त्व समजून येते. **डॉ. आंबेडकरांनी बहुउद्देशीय नदी खोरे विकास करण्यासाठी तीन प्रमुख ठराव करून घेतले होते. ते पुढीलप्रमाणे...**

अ) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचा कार्यकारी प्राधिकरणाव्दारे विकास करणे व त्याद्वारे नियंत्रण व व्यवस्थापन करणे.

ब) आंतरराज्य नद्यांवर जल आणि जलविद्युत शक्ती केंद्र निर्माण करणे.

क) राष्ट्रीय जलसिंचन धोरण, तांत्रिक संलग्न व इतर सेवा पुरविण्यासाठी प्रशासकीय संस्था निर्माण करणे.

यासाठी केंद्रात संघराज्याचे माध्यम म्हणून 'सेंट्रल वॉटरवेज इरिगेशन अॅन्ड नेव्हीगेशन कमिशन' ची स्थापना दिल्ली येथे केली. या संस्थेची कार्ये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

● सिंचन ● नदी नियंत्रण ● नदीला आलेल्या पुराच्या पाण्याचे नियंत्रण व संवर्धन. ● जलविद्युत शक्तीचा विकास. ● मृदा संवर्धन. ● लाटांच्या समस्या ● नौकाविहार

बहुउद्देशीय नदी खोरे विकास साधारणपणे 'जलसाठा प्रणाली' असून ती वीजनिर्मिती करणे, पुराचे पाणी प्रतिबंधित करणे, जल संधारण पुरविणे, नौकानयन, विस्थापितांची सुधारणा आणि मत्स्य उत्पादनासाठी विकसित केली जाते. सन १९४० च्या दरम्यान, बारमाही सिंचन योजना (बंधारे, मोठी धरणे आणि कालवे) जाऊन 'बहुउद्देशीय नदी खोरे विकास' (मोठी धरणे व जलाशय) संकल्पनेचे स्वागत करण्यात आले. इतिहासात सन १९३० च्या दशकात अमेरिकेत 'बहुउद्देशीय नदी खोरे विकास' प्रकल्पाअंतर्गत टेनेसी नदी खोरे प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. टेनेसी नदीवर व संगमावर मोठी धरणे बांधण्याची मालिका सुरू झाली. दि. १८ मे १९३३ रोजी प्राधिकरणाचा कायदा पास करण्यात आला. कित्येक प्रयत्नानंतर प्राधिकरण स्थापन झाले. औद्योगिक व शेती विकासाव्यतिरिक्त टेनेसी नदीच्या पुरावर नियंत्रण व पाण्याचा जास्तीतजास्त वापर करण्याचे ठरले. ही जगातील पहिली बहुद्देशीय योजना म्हणून पुढे आली. या योजनेअंतर्गत पूरनियंत्रण, नौकानयन, विद्युत शक्तीची निर्मिती, मृदा संवर्धन, सिंचन प्रणाली व जन आरोग्य इ. कार्यान्वित करण्यात आले.

बहुद्देशीय नदी खोरे प्रकल्पाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

- नदीच्या पाण्याचा अनेक प्रकारे उपयोग होतो. नदीच्या खोऱ्यातील लोक पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी आवश्यक असलेल्या पाण्यासाठी बहुधा नदीवरच अवलंबून असतात. काही भागात सुरुवातीला भूभागाखाली पाण्याचा वापर होत असला, तरी काही काळानंतर तो पाणी पुरवठा अपुरा पडतो. म्हणून पाणी वापरता यावे यासाठी पाणीपुरवठा योजनाद्वारे तेथील लोकांची एक मूलभूत गरज भागवावी लागते. पाण्याचा दरडोई खप वाढत जातो. म्हणजे जसजसा समाज प्रगत होत असतो तस तसा प्रतिडोई पाण्याचा वापर वाढत जाऊन पाणीपुरवठा योजनांची गरज अधिकाधिक भासू लागते.
- नद्यांच्याकडील औद्योगिक शहरातील व वसाहतीमधील कारखान्यांनाही पाण्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करावा लागतो. त्याप्रमाणे औष्णिक वीज केंद्रांनाही त्यांची यंत्रसामुग्री थंड करण्यासाठी भरपूर पाणी लागते. साहजिकच असे उद्योग व कारखाने व औष्णिक वीज केंद्रे नदीचे पाणी अल्पखर्चात उपलब्ध होते.
- नदीच्या पाण्याच्या जलसिंचन योजना अंमलात आणून कृषिसाठी पाणीपुरवठा करणे सोईचे होते. ज्या कोरडवाहू प्रदेशात पर्जन्यवृष्टी अपुरी व अनियमित असते तेथे जल सिंचनाशिवाय कृषि उत्पादन समाधानकारक प्रमाणावर होऊ शकत नाही. म्हणूनच नद्यांवर धरणे बांधून व कालवे काढून नद्यांचे पाणी शेतांना उपलब्ध करून दिले जाते. ज्या भागात पावसाळ्यात पुरेसा पाऊस पडतो व पावसाच्या पाण्यावर खरीप पिके चांगली पोसू शकतात, तेथेसुद्धा जलसिंचनाचा उपयोग करून बारमाही पिके काढणे शक्य होते.
- चौथे वैशिष्ट्य असे की, वीज निर्मितीसाठी नदीच्या पाण्याचा उपयोग होऊ शकतो. जस जसा विजेचा उपयोग घरगुती वापरासाठी व कारखान्यासाठी मोठ्या प्रमाणावर होऊ लागला तस तसा विजेचा पुरवठा अपुरा पडू लागला. केवळ औष्णिक वीज निर्मिती केंद्रे उभारून विजेची गरज भागविणे अशक्य झाल्याने शक्य तेथे नदीच्या पाण्याचा उपयोग करून जल विद्युत केंद्रे काढण्याचे प्रकल्प आखावे लागले. भारतात हरियाना, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मेघालय ही राज्ये मुख्यत: जल विद्युत केंद्रावर अवलंबून आहेत. तर आंध्रप्रदेश, आसाम, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, राजस्थान, तमिळनाडू व उत्तरप्रदेश अंशत: जल विद्युत केंद्राचा वापर करतात. नदी खोरे योजना वीजनिर्मिती तशीच वीज वाटपाचीही व्यवस्था करतात.
- नदी खोरे योजना आखताना मत्स्य उत्पादन विकासाकडेही लक्ष पुरविले जाते. नदीच्या पाण्याचे जलाशय करून त्यात मत्स्योत्पादन वाढविले जाते. तसेच नद्यांचा उपयोग पर्यटकांनी जलपर्यटनासाठी व मच्छीमारीसाठी करावा, या दृष्टीनेही पर्यटकांसाठी खास सोई पुरविल्या जातात.
- नदी खोरे योजनाचे उद्दिष्ट पूर नियंत्रणासाठी अमलात आणले जाते. नद्यांना येणाऱ्या महापुरामुळे व किनाऱ्या लगतच्या नदी खोऱ्याच्या भागात उद्भवणाऱ्या वादळामुळे प्रतिवर्षी खूपच नुकसान होत असते. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली जलसंसाधन धोरणे विकसित झाली. त्याचा परिणाम म्हणून केंद्रात दोन प्रमुख शक्तिशाली संस्थांची निर्मिती करण्यात आली. पहिली, 'सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन ॲन्ड नेव्हीगेशन कमिशन' दुसरी 'सेंट्रल टेक्निकल इलेक्ट्रीसीटी पॉवर बोर्ड.' आंतरराज्यीय नदी जोड योजना संकल्पना मान्य करून नद्यांचा बहुद्देशीय विकास साधण्यासाठी व सर्व समावेशक नियोजन करण्यासाठी नदी खोरे विकास प्राधिकरणाची निर्मिती करण्याचे मान्य झाले. दामोदर नदी खोरे प्रकल्प, महानदी खोरे प्रकल्प आणि सोन नदी खोरे प्रकल्प हा त्यांच्या धोरणाचा परिणाम आहे.

डॉ. आंबेडकरांनी 'नदी खोरे प्राधिकरणाची' संकल्पना प्रकर्षाने मांडली. राज्यातील वाहणाऱ्या नद्यांचा विकास करणे हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतला 'विषय' चर्चा करून राज्य व केंद्र सरकारशी करारनामा व संविधानात्मक तरतूद करून प्रकल्प कार्यान्वित करण्याचे कार्य हाती घेतले.

ऑगस्ट १९४४, मध्ये पश्चिम बंगाल राज्यसरकारने दामोदर नदी पूर चौकशी समिती केंद्र सरकारला देशातील जलसंसाधनाचा सुयोग्य वापर कार्यान्वित करण्यासाठी शिफारशी केल्या.

डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या 'युनिफाईड डेव्हलपमेंट ऑफ दी दामोदर रिव्हर व्हॅली' अहवालाआधारे प्रमुख फायदे होतील. ते असे –

- सिंचनासाठी भरपूर पाणी उपलब्ध करून ७,६०,००० एकरमध्ये नौकानयन करणे.
- जलाशयक्षमता अंदाजे ४७,००,००० एकर फूट निर्मिती.
- ३,००,००० किलोवॅट वीज शक्ती निर्माण करणे आणि पाच दशलक्ष लोकसंख्येच्या लोक कल्याणासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळविणे, यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरवून दिला.

अ) पहिल्यांदा धरणाच्या जागेची निवड करणे

ब) निवडलेल्या जागेचा तपशीलवार अभ्यास करून बांधकामास सुरुवात करणे;

क) प्राथमिक सर्वेक्षण अभ्यासासाठी एजन्सीची नेमणूक करणे

ड) एजन्सीकडून आराखडा व धरण बांधणे;

इ) तांत्रिक व प्रशासकीय कार्याकरिता विकसित भागात वीज आणि पाणी यांच्या वापराबद्दल सर्वेक्षणाची मालिका कार्यान्वित करणे.

डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, ओरिसा राज्यात विपुल नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असून त्यात कोळसा, कच्चे लोखंड, क्रोमियम, कार्बन, चुनखडीचा दगड, अभ्रक, बांबू याशिवाय भरपूर जल संपत्ती उपलब्ध आहे. राज्यात तीन प्रमुख नद्या म्हणजे महानदी, ब्राम्हणी आणि बैतारणी होत. या नद्यांचे एकूण क्षेत्र १,७९,००० चौरस कि.मी. असून एकट्या महानदीचे एकूण क्षेत्र १,३२,००० चौरस कि.मी. आहे. डॉ. आंबेडकरांनी निदर्शनास आणून दिले की, ओरिसा राज्य मागासलेले व दरिद्री राहिले. कारण जल संसाधनाचा योग्य वापर करण्याची पद्धत अवलंबिली नाही.

सन १८७२ च्या अहवालानंतर पुराची सर्वसाधारण चौकशी झाली, परंतु त्यावर ठोस उपाय सन १९२८ पर्यंत काहीच झाला नव्हता. सन १९४५ पर्यंत अनेक समित्या नियुक्त करण्यात आल्या. सन १९२८ नंतर ओरिसा फ्लड इन्क्वायरी कमिटी, सर विश्वेश्वरया यांचे सन १९३७ आणि सन १९३९ सालचे अहवाल. तदनंतर सन १९४२ पर्यंत चार अहवाल शासनाला सादर करण्यात आले. मार्च १९४५ मध्ये ओरिसा ॲडव्हायजरी कमिटीने पावले उचलली. दि. ८ नोव्हेंबर १९४५ रोजी कटक येथे राज्य शासनाने परिषद भरविली व त्यावर चर्चा केली. या परिषदेत डॉ. आंबेडकर म्हणाले, ''अतिरिक्त पाण्यामुळे माणसाच्या हाल अपेष्टा होत नाहीत; तेवढे हाल पाणी कमी असल्यामुळे होतात. पाणी ही राष्ट्राची संपत्ती आहे. ही संपत्ती आपण सांभाळली पाहिजे. पाण्याची विल्हेवाट योग्य तऱ्हेने

लावण्यासाठी आपल्याकडे कायमस्वरूपी धोरण असले पाहिजे. वाढत्या महापुरामुळे निसर्गाविषयी तक्रार न करता अतिरिक्त पाण्याची साठवण आपण नीट केली पाहिजे. यावरूनच वाढत्या पाण्याविषयी त्यांचा विधायक दृष्टिकोन दिसून येतो. वाढीव पाणी हे संकट आहे, असे गृहीत धरून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापुरावर नियंत्रण करणे एवढाच एक कलमी कार्यक्रम न करता त्यांनी इतर विकसित राष्ट्रांप्रमाणे आपणही कालवे काढून पाण्याची कायमस्वरूपी साठवण केली पाहिजे व पाण्याचा बहुउद्देशीय विकासासाठी उपयोग होऊ शकतो, असा तोडगा त्यांनी सुचविला''

अशा प्रकारे पूर समस्येविषयी व जादा पाण्याविषयी सकारात्मक व आशादायी दृष्टिकोन ठेवून पाणी समस्या सोडविण्याविषयी ते उत्सुक होते. बहुद्देशीय महानदी खोरे विकासाबद्दल बोलताना ते म्हणाले, ''इतर प्रगत देशासारखे नदीवर धरणे बांधणे व पाण्याची कायमची साठवण करणे आणि त्यांचे बहुद्देशीय वापर करणे आवश्यक आहे''. या जलाशयातून सिंचन प्रकल्प राबवून वीजनिर्मिती, नौकाविहार करता येते.''

याकरिता त्यांनी महानदी पाण्याच्या बहुद्देशीय वापराविषयी ठामपणे व प्रभावीपणे पुढीलप्रमाणे सल्ला दिला.

हिराकूड धरणाचे प्रकल्पाच्या स्वरूपात बांधकाम मार्च १९४६ मध्ये सुरू झाले आणि हा प्रकल्प प्रस्ताव स्वरूपात सन १९४७ मध्ये सादर करण्यात आला. सन १९५३ ला प्रकल्प पूर्ण झाला. त्याचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दि. १३ जानेवारी १९५७ रोजी केले.

डॉ. आंबेडकरांनी दि. ८ नोव्हेंबर १९४५ रोजी ओरिसा शासनाचे प्रतिनिधी, पूर्वेकडील राज्य व केंद्र शासनाच्या प्रतिनिधींची परिषद बोलावली. त्यानंतर दामोदर नदी प्रकल्पाच्या धर्तीवर महानदी विकासावर प्रारूप तयार केले. महानदीवर हिराकूड धरण प्रकल्प निश्चित करून तो बहुद्देशीय प्रकल्प व प्रांतीय विकास प्रकल्प व्हायला हवा की, जेणे करून तेथील जनतेचे जीवनमान उंचावेल. सदरील धरण ३,२४,००० हेक्टर आणि ५० मेगावॅट वीज निर्माण करेल. धरणाच्या विकासाने संपूर्ण ओरिसा राज्याचा विकास होण्यास सुरुवात झाली.

त्याचप्रमाणे सन १९०८ पासून पंजाब सरकारने भाक्रा नानगल बहुद्देशीय प्रकल्पाची सुरुवात केली. परंतु खरी सुरुवात डॉ. आंबेडकर व्हॉइसरॉयच्या मंत्रिमंडळात मजूर, सिंचन व वीज विभागाचे मंत्री म्हणून कार्यकारी मंडळात असताना स्टेट ग्रॅव्हीटी धरण (४७८.६८ मीटरचे) बांधण्याचा व १५० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचा प्रस्ताव केंद्राने पारित केला, ही वस्तुस्थिती आहे. ४० वर्षे म्हणजे सन १९०८ पासून धरणाची संकल्पना मूर्त स्वरूपात येत नव्हती. मूळची कल्पना म्हणजे मोठा जलाशय आणि मोठे फायदे हे या धरणापासून मिळणार होते. २० व्या शतकात सतलज नदीवर मोठा जलसाठा अपेक्षित होता. कारण दक्षिण-पूर्व जिल्हे व पंजाब राज्य महामारी व दुष्काळाच्या समस्येने ग्रस्त झाले होते. सतलज आणि यमुना खोऱ्यांमध्ये पिकांची नासाडी, भूक आणि जीवितहानी होत असे. भाक्रा नानगल प्रकल्प हा देशातला सर्वात मोठा बहुद्देशीय नदी खोरे विकास प्रकल्प आहे. पंजाब, हरयाणा व राजस्थान तीन राज्याच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प कार्यान्वित झाला. हिमालय प्रदेशातील सतलज नदीवर भाक्रा आणि नानगल येथे धरण बांधण्यात आले. भाक्रा धरण आशिया खंडात सर्वात उंच म्हणजे २२६ मीटर उंच, कॅनॉल ३,४०२ कि.मी. लांब आणि १४.६० लाख हेक्टर जमीन सिंचनासाठी वापरली जाते. दिल्ली आणि हिमाचल प्रदेशात देखील सिंचन व जलविद्युत शक्तीसाठी वापर केला जातो. या जलाशयाला गोविंदसागर या नावाने ओळखले जाते.


जरी भाक्रा-नानगल प्रकल्प हा सिंचन प्रकल्पासाठी तयार केला असला तरी हा बहुद्देशीय प्रकल्प म्हणून कसा विकसित करता येईल यासाठी डॉ. आंबेडकर हे स्वत: कार्यरत होते. शेवटी भाक्रा नानगल प्रकल्प सन १९४८ रोजी सुरू झाला आणि सन १९६३ ला पूर्ण झाला. वीज शक्ती केंद्राची सुरुवात सन १९६३ रोजी झाली आणि सन १९६९ ला पूर्ण झाली.

मजूर विभागाने जल संसाधनाचा बहुद्देशीय विकास नव्हे तर संस्थाने व राज्ये याचा नियोजनबद्ध सामाजिक व आर्थिक विकास हा नदी खोरे समन्वयन करताना शासकीय संस्थाने आणि स्थानिक संस्थांनी अंमल करावा अशी शिफारस केली. प्रांतीय सोननदी खोरे विकास प्रस्तावात संस्थाने, उत्तर प्रदेश, बिहार आणि केंद्रशासित प्रदेश यांनी भाग घेऊन वेगवेगळ्या करारनाम्यांवर स्वाक्षरी करून मान्य केला. दिनांक १६ सप्टेंबर १९७३ रोजी बिहार शासन आणि उत्तरप्रदेश यांनी स्वाक्षरी करून रिहंद प्रकल्प मान्य केला. त्याच दिवशी बिहार, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश यांनी बाणसागर प्रकल्पावर स्वाक्षरी केल्या. दिनांक २० फेब्रुवारी १९८२ रोजी कनहार पाणी वाटपावर मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार शासनाने स्वाक्षरी केल्या. परिणामी दि.१ मार्च १९८० रोजी भारत सरकारने बाणसागर प्रकल्पावर सोन नदी आयोग नेमला. आयोगाने सोन नदीचा अभ्यास करून एक सर्व समावेशक योजना करून सर्व राज्यांनी पाण्याचा वापर कसा करावा यांचा अभ्यास केला व त्याचा अंमल झाला.

भारतात सध्या इतरही बहुद्देशीय प्रकल्प कार्यान्वित/विकसित केले गेले. त्या मागे डॉ. आंबेडकरांची दृष्टी लाभलेली आहे. चंबल नदी, कोयना, नागार्जुनसागर, श्रीशैल्यम, तुंगभद्रा, अपर-कृष्णा, राणा प्रतापसागर, बलीमेला, परमलिकुलम-अलियार, कंगसावनी कुमार धरण इत्यादी. या सर्व बहुद्देशीय प्रकल्पांची देशातील एकूण जमीन अंदाजे ९५ दशलक्ष हेक्टर एवढी भरेल. तसेच २४,००० मेगावॅट एवढी जलविद्युत शक्ती आणि पिण्याचे पाणी पुरवठ्याचा पण त्यात समावेश आहे. देशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनाचा वापर आर्थिक विकासासाठी कसा करता येईल यावर केंद्र व राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत. डॉ. आंबेडकरांनी विकसित केलेल्या 'बहुद्देशीय जलाशय' आणि 'बहुद्देशीय नियोजन' या संकल्पनांमुळे देश हरितक्रांतीकडे व अन्नसुरक्षेकडे प्रगती करीत आहे. डॉ. आंबेडकरांचा वैज्ञानिक दृष्टिकोन हा आजच्या प्रकल्पांचा पाया आहे असे म्हणता येईल.

अलीकडच्या काळात आशिया खंडात वाढती लोकसंख्या, कमालीचे दारिद्र्य, औद्योगिकीकरण व शहरीकरणातील वाढीमुळे पाण्याची मागणी वाढत आहे. याचा प्रभाव जल व्यवस्थापनावर दिसून येते आहे. भारत, चीन, नेपाळ, बांगला देश या देशांत पाणी हा विषय आवाहन ठरले आहे. हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यातील आजची आवाहने समजून घेऊन जागतिक तापमानाचा आणि हवामान बदलाच्या समस्येचा नद्यांच्या पाण्यावर नेमका किती व कसा परिणाम होणार आहे, हे समजून घेणे हितकारक ठरेल. नदी खोरे व्यवस्थापनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे तितकेच महत्त्वाचे वाटते. डॉ. आंबेडकरांचे विचारधन देशातील परिवर्तनवादी चळवळीचे ऊर्जा केंद्र व थिंक टँक होय.

संपर्क क्र. ०२०-२४१०३४८८/२४३८१००४/९८६०५९१३०५



कृषि अर्थव्यवस्थेचा अर्थशास्त्री

श्री. अमिताभ पावडे, कृषि अर्थशास्त्राचे अभ्यासक,
१४१, साठे रोड, धंतोली, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन हा अत्यंत वास्तववादी, प्रगतिशील व अर्थशास्त्रियदृष्ट्या व्यवहार्य होता. तत्कालीन भारतीय राज्यकर्त्यांच्या शेतीकडे 'फक्त' देशाच्या 'उदरनिर्वाहाच्या' दृष्टीने बघण्याच्या एककल्ली मतांशी ते सर्वदा असहमत होते. डॉ. आंबेडकरांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन हा उदनिर्वाहाबरोबरच रोजगार निर्मिती व कृषिप्रधान देशाचे भांडवल (संपत्ती) निर्मितीचा महत्त्वपूर्ण स्रोत म्हणून होता. त्यामुळे शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याप्रति ते अत्यंत आग्रही होते. तसेच शेतीवरील प्रचंड मनुष्यबळाचा उपयोग कमी करून कृषिवर आधारित गावांलगतच्या उद्योगांद्वारे तो कमी करण्यावर त्यांचा भर होता. कृषि व उद्योग यांना समान पद्धतीने हाताळण्याचे डॉ. आंबेडकर समर्थक होते. मात्र तत्कालीन राज्यकर्त्यांचा कृषिकडे बघण्याचा दृष्टीकोन अत्यंत अन्यायी होता व त्यामुळे कृषिला सापत्न भावाने कमी महत्त्व दिले गेले. मात्र उद्योगांकरिताच सर्व सोयीसुविधा देण्याचे निर्णय घेण्यात आलेले होते. या अन्यायी नीतीचे अवशेष आपल्याला आजही दिसतात. दिनांक ६ मार्च २०१७ च्या लोकसत्ता या दैनिक वर्तमानपत्रात देशातील बुडीत कर्जाचा आकडा देण्यात आला. त्यात रू. ६.८० लाख कोटी बुडीत कर्ज असल्याचे दाखविण्यात आले. या बुडीत कर्जापैकी ७० टक्के कर्ज मोठ्या उद्योजकांनी मूलभूत सोयी (Infrastructure) च्या नावांवर बुडवलेले आहे. वस्तुत: सर्वसामान्य माणसांना वर्तमानपत्र व इतर माध्यमांतून सातत्याने शेतकरी कर्जाबद्दल सांगितले जाते व असा देखावा केला जातो की, शेतकरी कर्ज बुडवतो. मात्र, या बुडीत कर्जात शेतकऱ्यांचा टक्का हा एक टक्क्यांपेक्षाही कमी आहे. तसेच मोठ्या उद्योजकांनी जे वीज व रस्ते यांच्या नावावर कर्जे बुडवलीत ती काही ग्रामीण भागाच्या विकासासाठी नव्हे तर शहरी उद्योगांसाठी मूलभूत सोयीसुविधांसाठी बुडवलीत. ग्रामीण भागातील आजही चित्र हेच आहे की, पावसाळ्यात शेतापर्यंत कुठलेही वाहन जात नाही. वीज तीन फेजची १६ तास बंद असते व सिंचनाच्या सोयीचे पाणी सर्रास औद्योगिक व शहरी विकासासाठी वापरले जात आहे. किंबहुना विदर्भात, कोकणात व मराठवाड्यात सिंचनाच्या सोयी नगण्यच आहेत.

भारतीय शेतमालावर परदेशात मोठ्या प्रमाणात आयात कर आकारण्यात येत असतो. मात्र भारतीय सरकारने खाद्यतेल, डाळी व आता गहू यावर आयात कर रद्द करून भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी केली तसेच या सवंग लोकप्रियतेसाठी आखलेले धोरण हे भारतीयांना परावलंबीत होण्याचे स्पष्ट संकेत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या "Problem of Rupee" या सुप्रसिद्ध पुस्तकात (शोध निबंधात) इंग्रज सरकारला स्पष्टपणे खडसावले होते. भारतीय आयातीवर इंग्लंडमध्ये ५० ते ५०० टक्के कर आकारून भारतीयांचे शोषण करतात व इंग्लडचा तयार माल मात्र अडीच टक्के इतका कमी आयात कर लावून विकतात तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या शोधनिबंधात इंग्रज सरकारने अंमलात आणलेल्या सुवर्ण विनियम प्रमाप पद्धतीने सोन्याचा विनिमय दर सन १८०० ते १८६३ मध्ये अत्यंत अस्थिर राहिला त्यामुळे भारतीय रुपयाचे मूल्य सातत्याने बदलत गेले. या अस्थिर रुपयाच्या मूल्यांमुळे भारतीय व्यापार व देवाण घेवाणीत भारतीय सामान्य माणूस पुरता भरडला गेला. याचे दुष्परिणाम सर्वसामान्यांना भोगावे लागतात. रुपयाच्या किंमती बरोबरच वस्तूच्या किंमतीही अस्थिर झाल्या व त्यामुळे नफेखोरी वाढली. त्यामुळे रुपयाची क्रयशक्ती कमी होऊन सर्वसामान्य जनता महागाई, खोट्या टंचाईच्या आगीत होरपळली. भारतीय कृषिअर्थव्यवस्थेसाठी रुपयाचे स्थैर्य अत्यंत महत्त्वाचे आहे, हे त्यांनी दर्शवून दिले. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ केन्स यांचे सुवर्ण विनियम प्रमाप कसे दोषपुर्ण आहे, हे सप्रमाण त्यांनी सिद्ध केले. या पुस्तकात त्यांनी सुवर्ण विनियम प्रमाप ऐवजी सुवर्ण प्रमापाची मांडणी करून रुपया स्थिर करण्याचे उपाय सांगितले. अस्थिर रुपया नफेखोरीला जबाबदार असतो व नफेखोरीमुळे महागाई वाढते. महागाईमुळे रुपयाची क्रयशक्ती कमी होते. त्यामुळे फक्त व्यापारी असंतुलनामुळे रुपयाची किंमत घसरते असे नाही. महागाईमुळे कृत्रिम टंचाई व त्यामुळे जरी व्यापारात भरमसाठ नफा होत असला तरी त्या प्रमाणात मजुरीचा मोबदला वाढत नाही. या कारणांमुळे भारतीय गोरगरीब जनतेला जगणे कठीण झाले होते. तत्कालीन साम्राज्यवादी ब्रिटिश सरकारच्या डोळ्यात 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये प्रामाणिक शोध निबंधाद्वारे झणझणीत अंजन डॉ. आंबेडकरांनी घातले. देशातील गोरगरीब जनतेची वाताहत त्यांनी तिथे मांडली. अत्यंत अभ्यासपूर्ण हा शोधनिबंध अर्थशास्त्राच्या प्रत्येक विद्यार्थ्यांने तसेच भारतीय राज्यकर्त्यांनी जरूर वाचावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहु आयामी, विधिज्ञ, उत्कृष्ट संसदपटू, संविधान स्वमिता, इतिहासकार, मानववंशशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, समाज सुधारक, स्त्रीमुक्ती प्रणेता, शेतकऱ्यांचे कैवारी, जलतज्ज्ञ, ऊर्जातज्ज्ञ, बुद्ध धम्म अभ्यासक, धर्मचिकित्सक, उत्कृष्ट संपादक, राजनीतिज्ञ, कामगार नेता इत्यादी होते. मात्र भारतीय अर्थ व्यवस्थेला डॉ. आंबेडकरांमधील निष्णात अर्थतज्ज्ञाचा लाभ घेता आला नाही. किंबहुना असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील कलम ३६ ते ५१ मध्ये राज्यांनी पाळावयची तत्त्वे दिलेली आहेत. यात आर्थिक विषमता वाढू न देण्याची जबाबदारी सुध्दा राज्यांवर टाकलेली आहे. डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते की, राजकीय बरोबरच जर बहुजनांना आर्थिक व सामाजिक समता मिळाली नाही तर हा लोकशाहीचा मनोरा लोक मोडायला निघतील. याची प्रचिती आपल्याला बहुतांशी राज्यांमधील आदिवासी व शेतकऱ्यांच्या आर्थिक विपन्नावस्थेत दिसते. शेतकरी व आदिवासींचा सहनशीलतेचा बांध फुटून ते लोकशाही विरुद्ध उद्रेक करून उठू लागले. श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होत चाललेत. मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचा संचय व्हायला लागला व कष्टकरी शेतकरी भरडला जात आहे. त्याचे एकमात्र कारण म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांशी प्रतारणा होय. भारतीय कृषिप्रधान अर्थव्यवस्थेला सापत्न वागणूक देऊन उद्योगांना प्राधान्य दिले.

भारतीय राज्यकर्त्यांची प्राथमिकता ही सव्वाशे कोटी जनसंख्येची 'भूक' असायला हवी होती. तसेच सशक्त भारतीयांच्या निर्माणासाठी लागणाऱ्या विविध अन्न, धान्य व पोषण हे असायला हवे होते. त्याकरिता डॉ. आंबेडकरांनी सुचविल्याप्रमाणे कृषिक्षेत्रातल्या उत्पादनांच्या नियोजन व व्यवस्थापनात गुंतवणूक करण्यावर भर असायला हवा होता. मात्र प्रत्यक्षात उद्योगांना त्यांच्या स्वस्तात लागणाऱ्या मजुरांच्या मागणीसाठी कृषि क्षेत्रावर अमानुष निर्बंध लादलेत. एकीकडे नफेखोरीने बोकाळलेली औद्योगिक अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन दिले व तेव्हाच कृषि उत्पादनांच्या किंमतीवर अनैसर्गिक बंधने लादलीत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस येत आहे. ग्रामीण भागांतून स्थलांतरणामुळे उद्योगांना स्वस्तात मजूर मिळू लागले. ग्रामीण भागातून स्थलांतरित झालेला मजूर औद्योगिक श्रमाच्या व परतण्याच्या शोषणाला बळी पडला. डॉ. आंबेडकरांनी कृषि व उद्योगांवर समान लक्ष केंद्रित करण्याची मागणी केली होती. या त्यांच्या मूलभूत निर्देशाला हरताळ फासला. परिणामी कृषि अर्थव्यवस्थेतील घटक ग्रामीण भागातही निर्धन व सोयी सुविधांच्या अभावातच राहिले तर शहरात प्रचंड मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित होऊन देखील झोपडपट्ट्यांमध्ये उपेक्षितच राहिलेत. डॉ. आंबेडकरांना अपेक्षीत अशी मोठ्या प्रमाणात कृषिक्षेत्रात भांडवली गुंतवणूक व ग्रामीण भागातच प्रक्रिया व इतर औद्योगिकीकरण केले असते तर या कृषिप्रधान देशाच्या कृषि अर्थव्यवस्थेच्या घटकांची अशी वाताहत झाली नसती. 'अन्न सुरक्षेच्या' गोंडस नावाखाली शेतकऱ्यांची पिळवणूक करण्याऐवजी 'रोजगार सुरक्षा' जर मोठ्या प्रमाणात राबविली असती तर आर्थिक संपन्नता ग्रामीण भारतात नांदली असती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. त्यासाठी लागणाऱ्या संधी देण्याची सर्वस्वी जबाबदारी राज्यांवर टाकलेली आहे. मात्र या देशाचे दुर्दैव असे की, 'संविधान' सर्वसामान्यापर्यंत पोहोचलेच नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना त्यांचे हक्क, कर्तव्ये व जाणीवा संविधानाच्या माध्यमातून कळतच नाहीत. सन १९४२-४६ दरम्यान डॉ. आंबेडकर केंद्रीय मंत्रिमंडळात श्रम, जल व ऊर्जा मंत्री होते. या त्यांच्या कार्यकालात त्यांनी खऱ्या अर्थाने भारताच्या विकासाचे आराखडे आखलेत. उत्तरेत होणाऱ्या नदीच्या पुरांचे व्यवस्थापन करून बहुउद्देशीय प्रकल्पांची संकल्पना देऊन ऊर्जा, कृषि व उद्योग यांच्या प्रगतीचे दार उघडले. श्रमिकांसाठी विविध हितकारी योजनांना न्याय वागणूक मिळेल अशी प्रावधाने केलीत. डॉ. आंबेडकर जलमार्गांचे खंदे समर्थक होते व रेल्वेमार्गाबाबत उदासीन होते. त्याचे कारणही अगदी स्पष्ट आहे. रेल्वेमुळे कोळसा व लोखंडाचे वारेमाप खनिकर्म होईल. तसेच या दोन्ही गोष्टी सर्वसामान्याच्या गरजा असल्याने महागतील. दुसरे म्हणजे देशातील जंगलाची रेल्वे मार्गासाठी व स्लिपर्ससाठी वारेमाप तोड होईल. तिसरे कारण म्हणजे मोठ्या प्रमाणावर सुपीक जमिनींचा ऱ्हास होईल. चौथे कारण म्हणजे रेल्वेमार्गावर फारच कमी वर्दळ राहील कारण यावर फक्त सरकारी यंत्रणाच राबेल. या उलट डॉ. आंबेडकरांनी जलमार्गांचा पुरस्कार केला, ज्याच्याद्वारे सिंचन व पिण्याच्या पाण्याचे प्रश्न सुटले असते व स्थानिक होड्या या मार्गाचा माल वाहतुकीसाठी वापर करू शकल्या असत्या. डॉ. आंबेडकरांनी या देशाला जलनिती व ऊर्जानिती याच काळात दिली, जी भारतीय कृषि व उद्योगासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

डॉ. आंबेडकरांनी 'मनुस्मृती' जाळून अन्यायी कायद्यांना तिलांजली दिली. भारतीय संविधानाची बैठक स्वातंत्र्य, समता व बंधुत्वावर दिली. कष्टकरी, शेतकरी, स्त्रिया, श्रमिक, दलित-शोषीत, आदिवासी इत्यादी प्रामाणिक कष्टकरी या संविधानाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले. या कष्टकरी वर्गामुळे देशाचे 'अर्थ' चक्र प्रगतिशील मार्गावर मार्गक्रमण करत असते. कदाचित याच कारणास्तव भारतीय झेंड्यांच्या मध्यभागी निळ्या रंगाचे अशोकचक्र देण्यात आले असावे. कारण निळा रंग हा ब्लुकॉलर्ड (कष्टकरी) लोकांचे प्रतिनिधित्व करतो. कष्टकऱ्यांच्या कष्टानेच देशाच्या प्रगतीला खरा अर्थ येतो.

डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्म स्विकारला. वस्तूत: एका दृष्टीने बघितले तर तथागत गौतम बुद्धाचे जीवन हे तत्कालीन यज्ञाच्या नावावर होणाऱ्या लुबाडणुकी व हिंसेच्या विरुद्ध एका शेतकरी पुत्राने शेतकरी हिताचे आंदोलन होय. विवेकवादी, विज्ञानवादी, नैतिक, अंधश्रध्दारहीत, दैववादी भित्र्या प्रवृत्तीला नाकारून सत्याचा तो मार्ग आहे. या मार्गात जातीय व लैंगिक विषमतेला कुठेही स्थान नाही. कुणाच्याही अज्ञानाचा गैरफायदा घेण्याची प्रथा नाही. ज्ञानार्जनाची जातीय हिडीस बंधने नाहीत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, नीतिमत्ता व मैत्रीभावावर आधारित मार्ग त्यांनी निवडला. तथागताच्या समतेच्या मार्गाने कष्टकरी भारतीयांना एकमेकांच्या तिरस्काराऐवजी बंधुता व मैत्रीभावातुन प्रगतीचा मार्ग दाखवण्याचा डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केला. तथागताचा सत्य, अहिंसा, न्याय, समता व स्वातंत्र्याच्या संकल्पना भारतीय संविधानात म्हणूनच ठायी ठायी डोकावताना दिसतात. तरीही भारतीय संविधानाला संपूर्णपणे धर्मनिरपेक्ष ठेवण्यात डॉ. आंबेडकरांना श्रेय जाते.



नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा दिल्यानंतर अनुयायांना प्रतिज्ञा देताना डॉ. बाबासाहेब व माई आंबेडकर.

आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेची दशा बघता ४८५ मिलीयन डॉलरचे विदेशी कर्ज, डॉलरच्या तुलनेत ७० (सत्तर) पटीने कोसळलेली रुपयाची किंमत तसेच महागाई (चलनवाढ) चरमसीमेवर असल्याने जागतिक बाजारपेठेत भारतीय मालाला बाजार नाही. त्यामुळे उत्पादक उद्योगांवर संक्रात आलेली आहे. या औद्योगिक ऱ्हासामुळे वाढलेली बेरोजगारी व त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारी व अराजकता तसेच या बेरोजगारीमुळे सर्वसामान्याची ढासळत गेलेली क्रयशक्ती (विकत घेण्याची क्षमता) या बेरोजगार व गरीब बहुसंख्याकांनी उद्रेक करू नये, म्हणून जबरीने स्वस्त केलेले अन्न-धान्याचे भाव तसेच या भावनियंत्रणामुळे व महागाईच्या पाटात शेतकरी भरडला जात आहे. भारतीय राज्यकर्त्यांनी जर डॉ. आंबेडकरांच्या 'अर्थ' विषयक निर्देशांचा काटेकोरपणे अंमल केला असता तर देशावर अशी दुर्दैवी व आर्थिक विषमतेची स्थिती आली नसती. म्हणून आजची खरी गरज आहे ती अर्थशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकरांची.

संपर्क क्र. ९४२१९४७२९४/८६०५४९४३५७



लहान धारणक्षेत्रासाठी सुचविलेले उपाय

डॉ. रमाकांत गजभिये, सहयोगी प्राध्यापक, डॉ. देवानंद पंचभाई, प्राध्यापक
डॉ. सतीश मून, सहयोगी प्राध्यापक, कृषि महाविद्यालय, नागपूर

मानवी जीवनाचा आलेख उंचावणारे असे कोणतेच क्षेत्र नाही ज्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाष्य केले नाही. त्यांच्या संपूर्ण जीवनपटाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसते की, उच्च विद्याविभूषित, राष्ट्रनिर्माता, प्रसिद्ध कायदे पंडित, थोर भाषाशास्त्रज्ञ, महान अर्थतज्ज्ञ, समाजचिंतक व शोषीत माणसाला गुलामीच्या श्रृंखलेतुन मुक्त करण्यासाठी आयुष्य पणाला लावणारा मुक्तीदाता असे बाबासाहेबांचे अनेक पैलू निदर्शनास येतात. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास कृषिक्षेत्रातही त्यांचे योगदान दिसून येते.

भारत एक राष्ट्र म्हणून उदयास यावे जिथे समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय हे मानवी मूल्य प्रस्थापित व्हावे, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कयास होता. राष्ट्राच्या निर्मितीसाठी आवश्यक मूल्यांचा, समाज विघातक धारणांचा, त्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांचा व त्यावरील उपायांचे त्यांनी नेहमी अभ्यासपूर्ण विश्लेषण केलेले आढळते. भारत राष्ट्र म्हणून उदयास येण्यासाठी त्यांना प्रमुख अडसर भारतातील जातिव्यवस्था आहे, असे वाटत होते. म्हणून येथील विषमतावादी व्यवस्था उध्वस्त करण्यासाठी आयुष्याच्या अंतापर्यंत त्यांनी लढा दिला. बऱ्याच लोकांना बाबासाहेबांनी राष्ट्रनिर्मितीसाठी व अन्य इतर क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबाबत फार कमी माहिती आहे. या सर्व क्षेत्रातील त्यांचा दांडगा अभ्यास बघता बाबासाहेब हे असीम राष्ट्रनिर्मते होते, याची आपल्याला जाणीव होईल. या विविध क्षेत्रात भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेले कृषि हे एक क्षेत्र आहे. त्याविषयी बाबासाहेबांना वेळोवेळी सुचविलेल्या समस्या व त्यावरील उपाय आपल्याला पुढील विवेचनातून स्पष्ट होतील.

लहान धारणक्षेत्र

भारतातील लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय हा आंबेडकरांचा लेख म्हणजे भारताच्या शेतीप्रश्नांतील अत्यंत मूलभूत अशा प्रकारचे भाष्य होय. हा लेख प्रथम सन १९१८ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या काळात भारतात शेतीक्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण व गुणात्मक असे बदल झाले आहेत. सन १९५० च्या दशकात विविध राज्यांनी संमत केलेले व अडखळत का होईना कार्यान्वित केलेले जमीनसुधारणा विषयक कायदे हा पहिला महत्त्वाचा बदल होय. तसेच सन १९६७-६८ च्या दरम्यान शेतीक्षेत्रात झालेली हरितक्रांती हा दुसरा बदल. परंतु या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयाची गोष्ट म्हणजे, आंबेडकरांनी प्रस्तुत लेखात शेतीविषयक उपस्थित केलेले काही मूलभूत प्रश्न अधिक तीव्र तर झाले आहेत इतकेच नव्हे तर त्यांच्या लेखनातील ताजेपणा आणि विश्लेषणाची व्याप्ती व खोली लक्षात घेता ते ७० वर्षापूर्वी जेवढे मार्गदर्शक होते तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक आज मार्गदर्शक आहेत.

लहान धारणक्षेत्रे आपल्या देशातील कृषि व्यवसायाला भेडसावणारी गंभीर समस्या आहेच, परंतु ही लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्याने समस्या अधिक बिकट होते.

उदाहरणार्थ, मुंबई इलाख्यात सरासरी धारणक्षेत्र २५.९ एकर, तर पुण्याशेजारच्या पिंपळे सौदागर येथे अवघे एक-दोन एकर एवढेच धारणक्षेत्र होते. यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ही धारणक्षेत्रे लहान तुकड्यांत विभागली गेली होती. रत्नागिरी जिल्ह्यातील अवघ्या वीस गुंठ्याचे धारणक्षेत्र तीन तुकड्यांत विभागलेले, तर ठाणे जिल्ह्यातील एक एकर नऊ गुंठ्यांचे धारणक्षेत्र सहा तुकड्यांत विभागलेले, सर्वात कळस म्हणजे सुरतमधील एक एकराचे धारणक्षेत्र चौदा तुकड्यांचे मिळून झालेले होते. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. मुळातच लहान लहान धारणक्षेत्रे व त्यातही त्यांचे विखंडन यामुळे साधनसंपत्तीचा कार्यदक्षपणे उपयोग करण्यात अडचण निर्माण होऊन उत्पादन खर्च वाढतो. परिणामत: उत्पादकता कमी होते. अशाप्रकारे शेती हा महत्त्वाचा राष्ट्रीय व्यवसाय असल्यामुळे एकीकडे त्यावर सर्वाधिक लोक अवलंबून, तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी.

लहान धारणक्षेत्रे व त्यांचे विखंडन ही कमी उत्पादकतेची कारणे असल्याचे मानले गेल्यामुळे स्वाभाविकपणे धारणक्षेत्रांचा आकार वाढविणे व तुकडेजोड करणे हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटू लागतात. नेमक्या या पार्श्वभूमीवर आपल्याला आंबेडकरांचे धारणक्षेत्रांच्या आकाराविषयीचे विचार आकलन करणे अगत्याचे ठरेल. या संदर्भात त्यांनी खालील प्रश्न उपस्थित केले आहेत.

(अ) धारणक्षेत्रांच्या विखंडनामुळे धारणसंपत्तीचा उपयोग कार्यक्षमपणे करण्यात अडचण निर्माण होत असतानाही असे विखंडन मुळातच का होते? (आ) मोठी धारण क्षेत्रे कार्यदक्ष व लहान धारणक्षेत्रे अकार्यक्षम ही खरोखरच वस्तुस्थिती आहे काय? दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे? (इ) भारतातील लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवर अंतिम उपाय कोणता?

वारसा हक्क हे जमिनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे, या मताशी आंबेडकर असहमत होते. त्यांच्या मते, जमिनीवर पडत असलेला लोकसंख्येचा प्रचंड भार हेच त्याचे मुख्य कारण होय. शेती हे उपजीविकेचे एकमात्र साधन असल्यामुळे अजिबात नसण्यापेक्षा लहानसा का होईना पण जमिनीचा तुकडा आपल्या स्वाधीन असावा, अशी लोकांची धारणा होती. अशा रीतीने आंबेडकरांनी प्रश्नाच्या मुळातच हात घातला.

डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''जमिनीच्या लहानलहान तुकड्यांपासून काही ना काही फायदा होणे हेच लहान धारणक्षेत्रांच्या समस्येचे उगमस्थान आहे. हा फायदा तरी का होतो? तर उपजीविकेसाठी फार मोठी लोकसंख्या मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे वारसा हक्क हे जमिनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून शेतीवरील लोकसंख्येचा अमर्याद भार हेच त्याचे मूळ कारण होय. राहणीमानाची पातळी कमी असते म्हणून लोक लहान लहान तुकडे करण्याचे पत्करत नसून उपजीविकेचे अन्य कोणतेच साधन नसल्यामुळे त्यांना तसे करणे भाग पडते. थोडासा अधिक किफायतशीर असा उपजीविकेचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध

असला तर लोक लहान लहान तुकडे कसण्याचे सोडून देतील.''

धारणक्षेत्रांचा आकार वाढविणे व तुकडेजोड करणे या गोष्टींना आंबेडकरांचा विरोध होता, मात्र याचा अर्थ असा नव्हे, त्यांना फक्त एकाच मुद्याचे आग्रहाने प्रतिपादन करायचे होते की, ''शेतीवर लोकसंख्येचा प्रचंड भार असल्यामुळे जरी मोठी धारणक्षेत्रे तयार केली व तुकडेजोडीचे काम यशस्वीपणे पार पाडले तरी धारणक्षेत्राचा एक विशिष्ट किंवा ठराविक आकार टिकवून धरणे जवळजवळ अशक्यप्राय आहे.''

शेतीव्यवसायाचे संघटन

स्वाभाविकपणे आंबेडकर यांनी स्वतःच उपस्थित केलेल्या, किफायतशीर धारणक्षेत्रे कोणते? या दुसऱ्या महत्त्वपूर्ण प्रश्नाकडे वळतात. कारण, एक उपक्रम म्हणून शेतीव्यवसायाचे संघटन करण्याच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रथमतः उपभोगाचा उपभोग घेण्यासाठी पुरेसे उत्पादन होते की नाही हाच निकष लावून किफायतशीर धारणक्षेत्राची व्याख्या करणे हेच आंबेडकरांना अमान्य होते. त्यांच्या मते, 'शेती हा उत्पादनाचा उपक्रम असल्यामुळे उपभोगाचा निकष लावून किफायतशीर धारणक्षेत्र ठरविणे ही मुळातच चूक ठरेल.' स्वाभाविकपणे, किफायतशीर धारणक्षेत्राची व्याख्या उत्पादनाचा निकष लावूनच केली जावी, असा त्यांचा आग्रह होता. या संदर्भात ते म्हणतात की, ''शेती हा उत्पादनाचा उपक्रम असल्यामुळे मोठी व लहान धारणक्षेत्रे अशी गोष्ट असू शकत नाही. शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यांच्याकडील धारणक्षेत्र लहान किंवा मोठे ठरणे ही गोष्ट मशागत करण्यासाठी आवश्यक असलेले इतर उत्पादक घटक त्याला उपलब्ध आहेत की नाहीत, यावर अवलंबून असते. केवळ जमिनीचे आकारमान ही अर्थशास्त्रीयदृष्ट्या निरर्थक संकल्पना आहे. त्यामुळे अर्थशास्त्रीय परिभाषेत मोठी धारणाक्षेत्रे किफायतशीर की अकिफायतशीर ही गोष्ट दिलेल्या धारणक्षेत्राची मशागत करण्यासाठी आवश्यक असलेले इतर उत्पादक घटक योग्य प्रमाणात उपलब्ध आहेत वा नाहीत यावर अवलंबून असते. या दृष्टीने विचार करता लहान धारणक्षेत्र मोठ्या धारणक्षेत्राप्रमाणेच किफायतशीर असू शकते. मशागत करण्यासाठी आवश्यक असलेले जमिनीसकट सर्व उत्पादक घटक योग्य प्रमाणात उपलब्ध आहेत किंवा कसे, हाच या संदर्भात खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे आंबेडकरांच्या मते 'किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे जमीन, भांडवल व श्रम हे सर्व उत्पादक घटक इष्टतम प्रमाणात उपलब्ध असणे होय.'अशा तऱ्हेने किफायतशीर धारणक्षेत्रे म्हणजे नुसते जमिनीचे आकारमान नसून धारणक्षेत्रे आणि कार्यदक्ष मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली इतर सामग्री यांचा इष्टतम मिलाप होय.

भांडवल तुटवटा

लहान धारणक्षेत्रे ही शेतीची समस्या नसून भांडवल व साधनसामग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, धारणक्षेत्रांचे आकारमान मोठे करणे हा भारतातील शेतीसमस्येवर उपाय नसून भांडवल व तत्सम साधनसामग्रीची उपलब्धता वाढविणे हा खरा उपाय आहे. बचतीतूनच भांडवलनिर्मिती होते, आणि जिथे जिथे ज्या-ज्या क्षेत्रात अतिरिक्त उत्पादन असते तिथे तिथे बचत केली जाते, ही राजकीय अर्थशास्त्रातील सर्वमान्य गोष्ट आहे.

अशा तऱ्हेने आंबेडकरांच्या मते, ''भारतातील शेतीमधून अतिरिक्त उत्पादन होत नसल्यामुळेच भांडवलाचा तुटवडा निर्माण होणे, ही शेतीची खरी समस्या आहे. त्यामुळे मशागत करताना श्रमाचा अवाजवी उपयोग करणे अपरिहार्य होऊन बसते.'' दुसरी गोष्ट म्हणजे लागवडीखालील क्षेत्र फार मोठे वाटत असले तरी देशातील एकूण लोकसंख्येचा विचार करता तसे अपुरेच म्हणावे लागेल. भारतात सन १९१५ मध्ये लागवडीखालील जमिनीचे दरडोई प्रमाण अवघे एक एकर इतकेच होते. याउलट इटलीमध्ये १.७५ एकर, फ्रान्समध्ये २.३० एकर, आयर्लंडमध्ये ३.३० एकर, रशियात ५.६० एकर तर अमेरिकेत ८.९० एकर असे होते. ''शेतीक्षेत्रातील फार मोठी लोकसंख्या व प्रत्यक्ष लागवडीखालील जमिनीचे अत्यल्प प्रमाण यामुळे स्वाभाविकपणे शेतीक्षेत्रातील काही लोकसंख्या वाजवीपेक्षा अधिक व बेकार राहते,'' असे आंबेडकरांचे प्रतिपादन होते. याचा अर्थ, असे श्रमिक प्रत्यक्षात कोणतेही उत्पादनकार्य करीत नसतात. अशा प्रकारे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ रॅगनरव वर्क्स यांनी प्रच्छन्न बेकारीची संकल्पना मांडण्यापूर्वी सुमारे ३५ वर्षे अगोदर आंबेडकरांनी वाजवीपेक्षा अधिक रोजगाराची संकल्पना मांडली होती. नर्क्स यांची प्रच्छन्न बेकारीची कल्पना व आंबेडकरांना अभिप्रेत असलेली वाजवीपेक्षा अधिक रोजगाराची संकल्पना आशयाच्या दृष्टीने एकच आहे.

सहकार शेती

भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून आंबेडकरांनी सहकारी शेतीचाही पुरस्कार केलेला दिसतो. ऑक्टोबर १९२७ मध्ये श्री. एफ.जी.एच. ॲन्डरसन यांनी मुंबई कायदेमंडळात अल्पभूधारण मदत विधेयक मांडले. विखुरलेली धारणक्षेत्रे व अशा धारणक्षेत्रांचे लहान आकारमान या मुंबई राज्यातील शेतीव्यवसायाला भेडसावणाऱ्या दोन समस्यांवर उपाययोजना सुचविणे, हा प्रस्तुत विधेयकाचा उद्देश होता. अर्थातच या समस्यांवर उपाय म्हणून श्री. ॲन्डरसन यांच्या विधेयकात दोन तरतुदी सुचविण्यात आल्या होत्या. पहिली म्हणजे स्थावर, प्रामुख्याने जमीन मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण. यामुळे वारसा हक्कानुसार एका ठराविक आकारापलीकडे तुकडे पडणार नाहीत. दुसरी म्हणजे एकसंच धारणक्षेत्राची विक्री. आंबेडकरांनी या प्रस्तूत विधेयकावर घणाघाती हल्ला केला. भारतातील लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय या लेखातील वर विस्ताराने मांडलेल्या त्यांच्या मतांचा त्यांनी जोरदार पुनरुच्चार केला. केवळ धारणक्षेत्राचे आकारमान वाढवून ते किफायतशीर करता येत नाही. तर त्यासाठी आवश्यक असलेल्या इतर निविष्ठांना विशेषतः भांडवलाचा योग्य पुरवठा होणे, अत्यावश्यक आहे? हा त्यांच्या युक्तिवादाचा अर्थातच मुख्य आशय होता. भांडवलाचा तुटवडा ही भारतीय शेतीची मुख्य समस्या आहे. या आपल्या प्रतिपादनाचे गांभीर्य पटवून देताना त्यांनी उपरोधाने प्रचलित धारणक्षेत्रे अधिक लहान आकारमानाची केली पाहिजेत, असाही पूर्वी न केलेला युक्तिवाद केला.

धारणक्षेत्रांचे विभाजन थांबविण्यासाठी श्री. ॲन्डरसन यांनी सुचविलेल्या उपायांचा स्वीकार केला तर शेतीवर अवलंबून असलेले असंख्य लोक भूमिहीन होऊन त्यांचे दारिद्र्य अधिक वाढेल, असे आंबेडकरांचे प्रतिपादन होते. वारसा हक्कामुळे लहानसा का होईना परंतु वडिलांच्या स्थावर मालमत्तेत जमिनीत मुलांना समान हिस्सा मिळतो आणि उपजीविकेचे अन्य कोणतेही साधन नसल्यामुळे जमिनीचा असा लहानसा तुकडादेखील महत्त्वपूर्ण ठरतो. त्यामुळे हिंदू कायदा अत्यंत सदोष असूनही वारसा हक्काच्या तरतुदीमुळे

तो लोकांना फारच उपकारक ठरला असल्याचे आंबेडकरांनी सांगितले. ते म्हणत, ''हिंदू धर्मामुळे सामाजिक आणि धार्मिक सत्तेचे मूठभर लोकांच्या उच्चवर्णीयांच्या हाती केंद्रीकरण झाले आहे. परिणामत: फार मोठा समाज हा कायमचा गुलामगिरीत खितपत पडला आहे. अशा या गुलामगिरीत त्यांचे जिणे जर थोडेफार सुसह्य झाले असेल तर ते केवळ वारसा हक्कांच्या हिंदू कायद्यामुळे होय, कारण त्यामुळे वारसा हक्काच्या तरतुदीमुळे संपत्तीचे विभाजन होत गेले व मातब्बर लोकांच्या हातात सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण होण्यास आळा बसला. सामाजिक गुलामगिरीत आर्थिक गुलामगिरीची भर नको. ते सामाजिकदृष्ट्या मुक्त नसले तरी कमीतकमी त्यांना आर्थिकदृष्ट्या तरी मुक्त असू देत, त्यामुळे वडिलोपार्जित संपत्तीचे न्याय्य व समान वाटप करणाऱ्या वारस हक्काच्या कायद्यावर कोणत्याही प्रकारची मर्यादा घालणे याला माझा विरोध आहे.''

श्री. ॲन्डरसन यांच्या विधेयकानुसार एका विशिष्ट आकाराच्या धारणक्षेत्राखालील धारणक्षेत्र कसणाऱ्या शेतकऱ्यास शिक्षेची तरतूद होती, तसेच छोट्या आकाराची धारणक्षेत्रे अस्तित्वात आणण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. अशा प्रकारे संपत्तीच्या अधिकारावरच गदा येणार होती. आंबेडकरांच्या मते, अशा प्रकारच्या तरतुदींचा उद्देश जमिनीची शासकीय मालकी व शासकीय व्यवस्थापन निर्माण करणे हा असता तरी संपत्तीच्या अधिकाराचा संकोच होण्याबाबत चिंता करण्याचे कारण नव्हते. परंतु तरतुदीमुळे काही जमीनदारांची भरभराट होणार होती व त्यांची किंमत मात्र इतरांना द्यावी लागणार होती. आंबेडकरांचा युक्तिवाद स्पष्ट होता. एकदा धारणक्षेत्र एका विशिष्ट या ठराविक आकाराचे असले पाहिजे अशी कायदेशीर तरतूद केली, की छोट्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनी मोठ्या शेतकऱ्यांना विकल्याशिवाय पर्याय राहणार नव्हता आणि परिणामत: छोटे शेतकरी अपरिहार्यपणे भूमिहीन शेतमजूर होणार होते. विखुरलेल्या व धारणक्षेत्रांच्या समस्येवर आंबेडकरांनी सहकारी शेतीचा उपाय सुचविला, ते म्हणतात, ''एका विशिष्ट आकाराची सहकारी शेती अस्तित्वात आणल्यास आपल्याला श्री. ॲन्डरसन यांच्या प्रस्तुत विधेयकात अभिप्रेत असलेली उद्दिष्टे साध्य करता येतील. मुख्य म्हणजे आपल्याला छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. अर्थात लागून असलेल्या धारणक्षेत्राला/ ना जोडल्याशिवाय ती प्रमाणित आकारमानाइतकी किंवा त्याहूनही जास्त होईल.''

थोडक्यात त्यांच्या प्रतिपादनाचा आशय असा होता की, सहकारी शेती जशी मोठ्या आकारमानाची असेल, तसेच ती एकसंघही असेल.

संपर्क क्र. ०९८९०३३४२३१

(पान ४७ वरून)

या समितीने सत्याग्रहासाठी संपूर्ण जिल्ह्यामध्ये परिषदा घेऊन जनमानस तयार केले. अस्पृश्यांच्या हक्कासाठी तत्वनिष्ठेने आम्ही ब्राम्हणेतर सत्यशोधक अस्पृश्यांना सक्रीय पाठिंबा देत आहोत. आमच्या संस्था बंद पाडल्या तरी आम्ही मागे येणार नाही. अशा आशयाचे भाषण करुन भाऊसाहेबांनी आपला निर्धार व्यक्त केला. दि. १३ व १४ नोव्हेंबर, १९२७ ला इंद्रभुवन थीएटर अमरावती येथे डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली परिषद भरली. डॉ. आंबेडकरांनी संयमाने अंबादेवी संस्थानला तीन महिन्याचा कालावधी दिला. त्याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, अंबादेवी मंदिर अस्पृश्यांकरीता खुले झाले. ही सामाजिक क्रांती होती. अंबादेवी मंदिराचा प्रवेश हा भारतातील प्रथमच अस्पृश्यांना प्रवेश देणारी सामाजिक क्रांतीची यशस्वी लढाई होती. बाबासाहेब व भाऊसाहेब या दोघांच्या नेतृत्वाचा विजय होता.

बाबासाहेब व भाऊसाहेब यांच्या विचारधारेतील समान सूत्रे शोधतांना समता, स्वातंत्र, बंधुता, न्याय आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून या महामानवांनी कार्य केले. पुढे डॉ. आंबेडकरांनी सन १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. तेव्हा डॉ. पंजाबराव या पक्षाचे कार्यकारिणी सदस्य होते. एकंदरीत डॉ. पंजाबरावांनी डॉ. बाबासाहेबांच्या मानवमुक्तीच्या चळवळीत कृतिशीलता दाखवून विचार व कृतीचे समर्थन दिले. त्यांच्या विचारातील समान सूत्रे सामाजिकतेसोबतच, कृषि, शिक्षण, तसेच राज्यघटना निर्मितीमध्ये दिसून येतात. **संपर्क क्र.** ९३७०१०८१४९

(पान २८ वरून)

या चळवळीवर प्रकाशझोत टाकावा म्हणून माझे वडील स्व. बळीराम जाधव यांनी **''जगातील एकमेव, शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप''** या नावाचे पुस्तक सुविद्या प्रकाशन पुणे-३० यांच्यामार्फत प्रकाशित केले आहे. या विषयांची सखोल माहिती मिळण्यासाठी जिज्ञासूंनी या पुस्तकाचे जरूर वाचन करावे.

'उद्धरली कोटी कुळे, भिमा तुझ्या जन्मामुळे' असे सुप्रसिद्ध व यतार्थ गीत आहे. यात माझ्या व विविध जातीजमातींच्या असंख्य शेतकरी कुळांचाही समावेश आहे, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

संपर्क क्र. ९२२३३७५२९२

गुलाम माथा उन्नत झाला

शेतकऱ्यांचे लढे लढविले नरविर भिमरायाने
गुलाम माथा उन्नत झाला अवघा अभिमानाने ।।
सावकारी अन् खोती होती
जुलूमाची परिसीमा
शेतीवरती कसणाऱ्याच्या
होता हात रिकामा
पिळलेली मनगटे पेटली
केवळ ऐक्य बळाने ।। १ ।।
संप चरीचा अजून शिकवी
समभावाची रीत
समाज सगळे एक असे रे
विसरा धर्म नि जात
समतेचा हा पाठ पाहिला
प्रथमच इतिहासाने ।। २ ।।

कसेल त्याची जमीन केली
नवा कायदा झाला
या भूमीवर भीमबुध्दीने
नवा पराक्रम केला
जगी यशाची केली प्राप्ती
लढुनी एकदिलाने ।। ३ ।।
नाना पाटील सहकाऱ्यांनी
प्राण पणाला लाविले
सत्ता आणि संपत्तीला
पुरतेपणी हरविले
झुंजारांना सलाम करिते
राष्ट्रच हे गर्वाने ।। ४ ।।

- कवी राम मोरे



भारतीय रिझर्व्ह बँकेच्या जडणघडणीत योगदान

डॉ. शिल्पा नंदा (हजारे), ५, इंगळे ले आऊट,परसोडी, रिंग रोड, नागपूर

भारताच्या सामाजिक, शैक्षणिक, स्त्रीविषयक, राज्यघटनात्मक आणि आर्थिक तसेच धार्मिक प्रांतात डॉ. आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे. शाळा कॉलेजातील अभ्यासक्रमात महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, सरोजिनी नायडू यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान यावर विविध लेखांचा समावेश असतो. त्यामुळे या सर्व क्रांतिकारकांचे कार्य आपणास विदित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. डॉ. आंबेडकर हे खरे अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. त्यांच्या एम.ए., एम.एस.सी., पीएच.डी. या सर्व पदव्या अर्थशास्त्र या विषयाच्या आहेत. इतकेच नव्हे तर डी. एस्सी. ही उच्चतम पदवीदेखील 'The Problem of the Rupee-Its Origin and its Solution' या मौद्रिक अर्थशास्त्रावरील प्रबंधावर त्यांना प्रदान करण्यात आली होती. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेबाबत त्यांच्या वरील पुस्तकातील मुद्द्यांचा विचार केला होता.



डॉ. आंबेडकरांचे अर्थविषयक चिंतन : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वांगीण आणि मूलभूत अर्थचिंतन त्यांच्या खालील ग्रंथांमधून मुख्यत्वे सिद्ध झाले आहे. या अर्थचिंतनाने डॉ. आंबेडकरांना जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली आहे.

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर (१)'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' (२) 'इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स ॲन्ड सोल्यूशन' आणि (३) 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी: इटस् ओरिजिन ॲन्ड सोल्यूशन'असे तीन ग्रंथ लिहिले. विशेष म्हणजे हे तिनही ग्रंथ, एम.ए., पीएच. डी. आणि 'डॉक्टर ऑफ सायन्स' या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होते.

१) 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' हा एम.ए. च्या पदवीसाठी लिहिलेला शोधनिबंध आहे. या शोधनिबंधामध्ये, ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासन आणि वित्त व्यवस्थेत सन १७९२ ते १८५८ या कालखंडामध्ये कसकसे फेरबदल होत गेले आणि त्यातून भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला, त्याचे विदारक आर्थिक चित्र डॉ. आंबेडकरांनी उभे केले आहे.

२) पीएच्.डी. पदवीसाठी लिहिलेला 'दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' हा डॉ. आंबेडकरांचा प्रबंध त्यांच्या सरकारी वित्तविषयक अन्वेषक बुद्धीचा उत्कृष्ट नमुना आहे. या विस्तृत ग्रंथामध्ये ब्रिटिश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटना राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध सन १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडामध्ये कसकसे विकसित झाले, त्याची ऐतिहासिक मिमांसा डॉ. आंबेडकरांनी सादर केली आहे.

३) 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी: इटस् ओरिजिन अँड सोल्यूशन' हा डॉ. आंबेडकरांचा सर्वात महत्त्वाचा अर्थशास्त्रीय ग्रंथ. डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी लिहिलेला हा प्रबंध प्रथम सन १९२३ साली प्रसिद्ध झाला. नंतर सन १९४७ साली 'हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग' या नावाने पुन्हा प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथामध्ये डॉ. आंबेडकर भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मिमांसा सादर करून, 'भारतासाठी आदर्श चलनपद्धत कोणती?' या त्यावेळच्या अत्यंत ज्वलंत विषयावर आपले मूलगामी विचार मांडतात. भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची चिकित्सा करताना सन १८०० ते १८९३ या कालखंडामध्ये भारतीय रुपयांची, चलनाचे परिमाण म्हणून कशी जडणघडण होत गेली, त्याचे सखोल विवेचन सादर करतात.


रिझर्व्ह बँकेची स्थापना आणि डॉ. आंबेडकर : सन १९३५ मध्ये रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. या बँकेच्या जडणघडणीत बाबासाहेबांचा खूप मोलाचा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या बँकेच्या कामकाजाची रूपरेषा तयार झाली. पहिल्या विश्व युद्धानंतर भारताची आर्थिक स्थिती अतिशय कमजोर झाली होती. ती पुन्हा मजबूत करण्याच्या उद्देशाने बाबासाहेबांनी सर्व शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे असे सांगितले. त्यासोबतच उद्योगधंद्यांची वाढ भांडवलदार करू शकणार नाही. तेव्हा शासनाने त्यांचा विकास करावा. त्यांचे राष्ट्रीयीकरण करावे. डॉ. आंबेडकरांनी भारताच्या अर्थकारणाचा अभ्यास करून काही धोरण तयार केले. त्यानुसार त्यांनी आरबीआयच्या कार्याची रूपरेषा तयार करून हिल्टन यंग कमिशनसमोर ठेवली. भारतीय अर्थव्यवस्था नियंत्रणात आणण्यासाठी रॉयल कमिशन नेमण्यात आले. जेव्हा या कमिशनचे सदस्य भारतात पाहणीसाठी आले तेव्हा या कमिशनच्या प्रत्येक सदस्याकडे बाबासाहेबांचे 'The Problem of the Rupee-Its Origin and its Solution' हे पुस्तक होते.

अशाप्रकारे बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली सन १९२६ मध्ये रॉयल कमिशनच्या अखत्यारीत बँकेचे कामकाज सुरू झाले. आरबीआयच्या मुद्रिके (सिल) मध्ये सिंह आणि पाम झाड असे स्केच होते. भारताचा राष्ट्रीय प्राणी वाघ असल्यामुळे वाघाचे चित्र मुद्रिके (सिल) मध्ये येणे गरजेचे आहे, असे ठरले होते. बँकेच्या कामकाजाबाबत आणि देशातील आर्थिक घडी व्यवस्थित बसविण्याच्या दृष्टीने बचतीचे काही नवीन आणि उत्तम पर्याय उपलब्ध असतील असे रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावनेत नमूद करण्यात आले. रिझर्व्ह बँकेचे सेंट्रल ऑफीस कोलकाता येथे स्थापन झाले. नंतर सन १९३७ मध्ये ते मुंबई येथे स्थलांतरित केले. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत, म्हणजे सन १९४७ सालापर्यंत रिझर्व्ह बँक ही बर्मा सेंट्रल बँकेसाठी सुद्धा काम करत होती. सन १९४७ नंतर भारत व पाकिस्तान वेगळे झाल्यानंतर सुद्धा जून १९४८ पर्यंत पाकिस्तानसाठी सुद्धा सेंट्रल बँक म्हणून आरबीआय सेवा उपलब्ध करून देत होती. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानची स्थापना झाल्यानंतर सन १९४९ पासून रिझर्व्ह बँक भारत सरकारच्या अखत्यारीत आली.

संपर्क क्र. ९८२३८७५६७५



भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका



डॉ. अनिल सूर्या, आंबेडकरी विचारांचे अभ्यासक, बी – ७०, इंद्रपूरी, नवी दिल्ली
(लेखक नवी दिल्ली येथे भारत सरकारमध्ये वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत)

भारतीय संविधानाचे पहिले व शेवटचे पवित्र पाऊल म्हणजे पवित्र उद्देशिका आहे. हा उद्देश पवित्र ठेवण्याकरीता संविधान निर्माण करणारी ती व्यक्तीही तितकीच पवित्र असावयास हवी. डॉ. आंबेडकरांनी एकांगी दृष्टीकोन असलेला चष्मा तोडून फेकला होता म्हणून आज सर्वमान्य झाले आहे की, मनुष्यत्वाच्या प्रस्थापनेसाठी डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान व संविधान होते आणि आहे. कायद्याच्या दृष्टिने उद्देशपत्रिका घटनेचा भाग नसतो पण घटनेचा जीव घटनेचा प्राण म्हणजे घटनेची उद्देशपत्रिकाच असते. कोणत्याही नागरिकांच्या प्रतिष्ठेला इजा न पोहचता आर्थिक–सामाजिक विकास करण्यासाठी कोणते ध्येय आणि मार्ग स्विकारावयास पाहिजे, या महत्वपूर्ण बाबी उद्देशपत्रिकेत असतात. उद्देशपत्रिका ही संक्षिप्त प्रस्तावनाच असते. डॉ. आंबेडकरांनी जी झुज दिली जी प्रकाशाची स्वप्ने उरात जोपासली, त्या स्वप्नांचा अविष्कार म्हणजेच भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिकाच होय. भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची रुपरेषा दर्शविलेली भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना परिषदेने मंजूर केली.

भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप, उद्देश आणि घटनेचे उगमस्थान भारतीय उद्देशपत्रिकेतून स्पष्ट होते. ही उद्देशपत्रिका पुढीलप्रमाणे आहे.

''आम्ही भारतीय जनता,

भारताचे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे प्रतिज्ञापूर्वक ठरवून आणि भारताच्या सर्व नागरिकांना,

न्याय (Justice) : सामाजिक, आर्थिक आणि राजकीय

स्वातंत्र्य (Liberty) : विचार, उच्चार, श्रध्दा, धर्म, समजूती, पूजा यांचे

समता (Equality) : दर्जा आणि संधी या बाबतीत

बंधुता (Fraternity) : राष्ट्राचे ऐक्य, व्यक्तीची प्रतिष्ठा,

यासंबधी भरवसा, हमी देण्याचे आमच्या या घटना परिषदेमध्ये आज नोव्हेंबर १९४९ च्या सव्विसाव्या दिवशी विचारपूर्वक घटना मान्य करीत आहोत व तत्संबधी कायदा करुन आपली म्हणून तिचा स्वीकार करीत आहोत.''

अ) सार्वभौम (Soverein) : स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताची घटना भारतीय राज्यघटना असे संबोधिले जाते. दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. दिनांक ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक झाली. दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना घटनासमितीने मंजूर केली. दिनांक २६ जानेवारी १९५० पासून अंमलात येईपर्यंत भारताला वसाहत राज्य म्हणण्यात येत होते. पण दि. २६ जानेवारी १९५० नंतर भारताचे सार्वभौम राज्य निर्माण झाले. भारतावर बहिर्गत किंवा अंतर्गत कोणाची वर्चस्व नसणार. आता भारताचे सार्वभौम राज्य आहे. भारत पूर्णत: मुक्त आहे. पुर्णत: स्वतंत्र आहे.

आ) प्रजासत्ताक (Democratic) : लोकानुवर्ती शासन म्हणजे प्रजासत्ताक शासन होय. केवळ एक पार्टी किंवा एक व्यक्ती म्हणजे सार्वभौम नाही. भारतीय जनता सार्वभौम आहे. या सार्वभौम जनतेतील कुणीही स्वकर्तृत्वानुसार सत्ताधिकारी बनू शकतो. परंतु तोही अंतिम नाही. देशाची शासन व्यवस्था जनतेच्या, प्रजेच्या मतानुसार चालते. प्रजा शासन कारभार चालविणारे प्रतिनिधी निवडते. प्रजासत्ताक राज्यात अंतिम सत्ता लोकांकडे असते.

इ) गणराज्य (Republic) : गणराज्य म्हणजे 'राजा' नसलेले राज्य, प्रजासत्ताक आणि गणराज्य हे दोन्ही शब्द समानार्थी नाहीत. वेगवेगळे आहेत. भारतातही गणराज्य पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. गणराज्यातील शासन प्रमुख लोकनियुक्त असतो. भारताचा सर्वोच्च शासक – राष्ट्रपतींचीही निवड जनतेव्दारे अप्रत्यक्ष प्रध्दतीने होत असते. गणराज्य पध्दत भारताने अंगिकारली आहे. राज्यव्यवस्थेचे उद्दीष्ट भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या तिसऱ्या विभागात स्पष्ट केले आहे. शासनाची ध्येयपूर्तता शासनाने केली पाहिजे (१) न्याय (२) स्वातंत्र्य (३) समता (४) बंधुता ही भारताच्या शासनाची अर्थात भारतीय संविधानाची उद्दीष्टे आहेत.

ई) न्याय (Justice) : (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) समाजाचे जास्तीत जास्त कल्याण व्हावे हा न्यायाचा उद्देश असतो. न्याय राज्यव्यवस्थेचा प्राण असतो. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय हवा. अन्यथा उन्नती अशक्य आहे. म्हणून संविधानात समान न्याय डॉ. आंबेडकरांनी सांगितला आहे.

उ) स्वातंत्र्य (Liberty) : (विचार, उच्चार, श्रध्दा, धर्म, समजुती, पूजा यांचे) स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. व्यक्तिविकास करण्यास मुक्ततेची समान संधी असणे म्हणजे स्वातंत्र्य होय. समाजहित, देशाला बाधा न येवू देता विचार, उच्चार, श्रध्दा, धर्म, समजुती, पूजानुसार उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे.

ऊ) समता (Equality) : (दर्जा आणि समान संधी याबाबत) जात, स्पृश्य–अस्पृश्यता इत्यादी मानवनिर्मित भेदाभेद नष्ट करणे आणि सर्व नागरिकांना व्यक्तित्वाचा सर्वांगिण विकास करण्याची संधी देणे म्हणजे समता. कायद्याने सर्व समान आहे, कायद्यासमोर सर्व समान आहे. व्यक्तित्वाच्या विकासाची समान संधी संविधानाने सर्वांना दिली आहे.

ए) बंधुता (Fraternity) : (राष्ट्रीय ऐक्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, यासबंधी भरवसा, हमी) राष्ट्रीय ऐक्य हे देशाकरिता महत्वाचे आहे. त्यामुळे राज्यघटनेने राष्ट्रीय ऐक्यास जास्त महत्व दिले आहे. एकात्मता कायम ठेवण्यासाठी भेदाभेद संपुष्टात आणुन सर्व नागरिकात बंधुत्वाची भावना निर्माण करणे, हे डॉ.आंबेडकरांना महत्वाचे वाटत होते. म्हणुनच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता केंद्रबिंदु, प्राणबिंदू मानून भारतीय राज्यघटनेची गुंफण केली आहे.

बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीनुसार सदरच्या 'उद्देशिका'मध्ये समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular) आणि अखंडता (Integrity) या तीन शब्दांची भर घातली आहे.

भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका भारताच्या एकजुटीचे, विकासाचे व प्रेमाचे सूत्र झाले आहे. न्याय, स्वतंत्रता, समता, बंधुता, ममता, सन्मानाने भारताचा प्रत्येक नागरिक जगतो आहे.

संपर्क क्र.०९८९१३५८३४४



आदिवासींचे वनहक्क व पेसा कायदा



श्रीमती प्रतिभा शिंदे, समन्वयक, लोकसंघर्ष मोर्चा, तळोदा, जि.नंदूरबार.

प्रदीर्घ काळाच्या संघर्षानंतर भारतीय आदिवासींच्या वनहक्कांचा कायदा सन २००६ पासून लागू झाला आणि आदिवासींच्या जमीन हक्कांचा प्रश्न मार्गी लागला. हेच पेसा कायद्याच्या संदर्भातही म्हणता येईल. आदिवासी हक्कांच्या या लढ्यात त्यांच्या पाठीशी घटनात्मक तरतूदींचा भक्कम आधार होता, ज्यामुळे आदिवासी समुदायाला त्यांच्या चळवळी व आंदोलनाला नेहमीच पाठबळ मिळत गेले व शासनाला आदिवासींच्या हक्कांबाबत आपण आजवर ते नाकारुन ऐतिहासिक अन्याय करत आलो, हे मान्य करावे लागते. त्यांचे हक्क बहाल करण्यासंदर्भात हे कायदे करावे लागले. घटनेतील या मानवतावादी व समतावादी मुल्यांची मुहूर्तमेढ भारतीय स्वातंत्र्यलढ्यातच रोवली गेली होती. जातीपाती व धर्मामध्ये विभागलेल्या व तरीही राष्ट्र म्हणून संघटीत झालेल्या भारतीय समाजाला समान संधी व समान न्याय याची हमी भारतीय राज्यघटनेने दिलीच, परंतु येथील दलित, अल्पसंख्याक व मुख्य प्रवाहापासून वेगळे पडलेले आदिवासी समूह या सर्वांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणाऱ्या तरतूदींचा समावेश भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेबांनी केला.

इंग्रजांनी साम्राज्यवादाचा विस्तार करत भारतात आपले पाय रोवायला सुरुवात केली, तेव्हाच त्यांच्या विरोधात पहिला संघर्ष खरे तर आदिवासी समूहांनीच सुरु केला होता. ज्या जल, जंगल जमीनीवर आदिवासी संस्कृती समृध्दपणे पिढ्या दर पिठ्या वसत गेली त्या नैसर्गिक संसाधनांवर जेव्हा बाह्य समाजाकडून आक्रमण सुरु झाले. तेव्हा पासूनच आदिवासी समूहांचा ऱ्हास सुरु झाला होता. इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांनी प्रथम जंगलातील सागाच्या वृक्षांवर आपला हक्क जाहिर करत आदिवासी समूहांना सागाचा वापर करण्यावर प्रथम बंदी घातली आणि नंतरच्या काळात त्यांची नैसर्गिक साधनसंपत्तीची भूक वाढत गेली तसतसे त्यांनी सर्व जंगलेच सरकारी मालकीची म्हणून घोषित करुन टाकली व वनखात्याचा उदय झाला. जंगलावर आधारित आपले सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या हक्कांना नाकारले गेले व इंग्रजांनी स्थापन केलेल्या वनखात्या करवी जंगलांची लूट सुरु झाली. आदिवासी समूह मात्र विकासाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले गेले.

देश स्वतंत्र झाल्यावर आदिवासींच्या या परंपरागत वनहक्कांना पुर्ववत बहाल करत जंगलांचे संवर्धन, संरक्षण व नियमन केले जाईल, अशी खरे तर अपेक्षा होती. मात्र स्वतंत्र भारताच्या मायबाप सरकारने इंग्रजांनी स्थापन केलेल्या वनखात्याला व त्यांच्या कायद्यांना जसेच्या तसे स्विकारत आदिवासींच्या हक्कांना पुन्हा डावलले गेले.

मुळात आदिवासींच्या वनहक्कांचा प्रश्न हा त्यांच्या जल, जंगल, जमीनीवरच्या कायदेशिर मालकी पुरता मर्यादित नाही. आदिवासी समूहांचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन हे पुर्णत: निसर्गाधिष्ठीत असल्याने हा प्रश्न त्यांच्या आदिवासी संस्कृतीच्या अस्तित्वाचाच प्रश्न होता.

परंतु भारतीय राज्यघटनेतील तरतुदींमुळे ही लढाई विधायक व सनदशिर मार्गाने लढण्यासाठीचा मार्गही मोकळा झाला, हेही तेव्हढेच खरे आहे आणि देशभरात या घटनात्मक तरतुदींचा आधार घेत आदिवासी समूहांच्या विधायक व सदनशिर मार्गाने लढणाऱ्या अनेक चळवळी हा लढा पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

भारतीय राज्यघटनेत आदिवासी समूहासाठी अनेक महत्वपुर्ण तरतुदी केल्या गेल्या आहेत. घटनेत आदिवासी हा शब्द शेड्यूल्ड ट्राईबज् (अनुसूचित जनजाती) या नावाने समाविष्ट करुन त्याची व्याख्या देण्यात आली आहे. आदिवासी समूहांना आपला आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास साध्य करता यावा म्हणून त्या अनुषंगाने संरक्षण देणाऱ्या तरतुदी घटनेत नाहीत. आदिवासी समूहांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यासाठी देशाच्या व राज्यांच्या विधी मंडळामध्ये विशेष आरक्षण दिले गेले आहे. त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार यांना प्रतिबंध करण्यात आला असुन त्यासाठीचा विशेष कायदा केला गेला आहे.

'राष्ट्रीय शेड्युल्ड ट्राईबज्' आयोग आदिवासींच्या विकासासाठी त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा आढावा घेवून त्यासंबंधी अहवाल सादर करुन शासनाला व प्रशासनाला योग्य त्या शिफारशी करण्याचा अधिकार या आयोगाला आहे व हा आयोग स्वायत्त आहे.

सर्वात महत्वाची तरतुद म्हणजे घटनेतल्या ५व्या व ६व्या अनुसूचीद्वारे आदिवासी समूहांच्या स्वतंत्र चालीरिती त्यांची संस्कृती व परंपरा याचे जतन करत त्यांना त्यांच्या विकासासाठीचे स्वायत्त अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. आदिवासी हक्कांबाबतीत जो वनकायदा सन २००६ आणि पेसा कायदा केंद्र सरकारने लागू केला त्याचे महत्व या घटनेतील महत्वपुर्ण तरतुदींच्या पार्श्वभूमीवर म्हणूनच मोलाचे आहे.

केंद्र शासनाच्या वन कायद्यामुळे आता सन २००५ पर्यंत आदिवासींच्या ताब्यात असलेल्या शेतजमीनी त्यांची गावठाणे, त्यांची वहीवाटीची साधने, जे वनखात्याने अद्याप मान्य केली नव्हती त्यावर आता कायदेशिर हक्क प्राप्त झाला आहे. याशिवाय त्यांची सामुहिक जीवनपध्दती लक्षात घेता गावसमूह म्हणून गावाच्या परिसरात असलेले जंगल, पाणवठे, गौनवनउपज व खनिजे यांच्या संरक्षणाचे, संवर्धनाचे व त्यांच्या समुचित वापराचे सामुहिक हक्कही त्या गावसमूहांना बहाल केले आहेत. पेसा कायद्यामुळे आपली परंपरा संस्कृती व रितीरिवाजांचे संरक्षण करत आपला विकास साध्य करण्यासाठी स्वयंशासनाचा अधिकारही आदिवासी समूहांना प्राप्त झाला आहे.

या दोन्ही कायद्यात अजूनही त्रुटी आहेतच. परंतु एक महत्वाचा टप्पा पार पडला आहे आणि हा प्रदिर्घ संघर्ष करण्यासाठी घटनात्मक तरतूदींचाही मोलाचा वाटा आहे. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समूहांच्या क्षमताबांधणीचे अवघड काम करावे लागणार आहे. शासन, प्रशासन, स्वयंसेवीसंस्था, स्थानिक चळवळी व संघटना या सर्वांच्या समन्वयातून हे पुर्ण करावे लागेल. ते अवघड वाटत असले तरी अशक्य मात्र नाही. तसेच शासनही या बाबत अनुकूल आहे. त्यामुळे आदिवासी समूहांचा खऱ्याअर्थाने विकास साध्य करण्यासाठीची प्रक्रिया घटनेतील तरतुदी व या दोन्ही कायद्यांमुळे गतिमान होतांना दिसते आहे, एवढे मात्र खरे.

संपर्क क्र. ९४०४९५३४२३

बातम्यांच्या बांधावर



दि. २७ मार्च २०१७ रोजी मांजरी, पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट अर्थात व्हीएसआयच्या ४०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते, तसेच ऊस आणि साखर उत्पादनात उत्कृष्ट कार्य केलेल्या शेतकरी आणि कारखानदारांचा गौरव मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध पुरस्कार देवून करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष तसेच खासदार मा. श्री. शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील साखर कारखान्याकडून तयार केल्या जाणाऱ्या विजेची योग्यदरात खरेदी करण्याचे सरकारी धोरण अंतिम टप्प्यात आहे. तसेच साखर उद्योगाच्या समस्या सोडविण्यासाठी लवकरच बैठक घेतली जाईल. असे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. व्हीएसआयचे अध्यक्ष तसेच खासदार मा. श्री. शरद पवार यांनी इथेनॉलचे उत्पादन वाढविणे, कारखान्यांच्या कर्जाच्या पुनर्गठनाला मुदतवाढ, निर्यातीसाठी अनुदानाची आवश्यकता इत्यादी विषयांबाबत यावेळी उहापोह केला. या कार्यक्रमास माजी उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित पवार, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष मा. श्री. दिलीप वळसेपाटील, मा. श्री. विजयसिंह मोहितेपाटील, मा. श्री. जयंत पाटील, मा. श्री. हर्षवर्धन पाटील, श्री. शंकरराव कोल्हे, श्री. जयप्रकाश दांडेगावकर, साखर संघाचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव नागवडे व इतर मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे इस्त्राईल शिष्टमंडळासमवेत नुकतीच बैठक संपन्न झाली. मा. श्री. युरी एरीअल, कृषि व ग्रामविकास मंत्री, इस्त्राईल व त्यांच्या शिष्टमंडळासमवेत राज्याचे कृषि व फलोत्पादन मंत्री मा. ना. श्री. पांडुरंग फुंडकर, कृषि, फलोत्पादन व पणन राज्यमंत्री मा. ना. श्री. सदाभाऊ खोत, प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन) मा. श्री. बिजयकुमार तसेच आयुक्त कृषि मा. श्री. विकास देशमुख आदि मान्यवरांनी इंडो- इस्त्राईल समन्वित प्रकल्पांसदर्भात सविस्तर चर्चा केली. इस्त्राईल शिष्टमंडळाने प्रकल्पांच्या नियोजनाबाबत व अंमलबजावणीबाबत यावेळी समाधान व्यक्त केले.





महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे; इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रीकल्चरल टेक्नॉलॉजीस्ट, महाराष्ट्र आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे यांच्या संयुक्तविद्यमाने चंदन लागवड-व्यापारी शेतीची संधी या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा दि. ९ मार्च २०१७ रोजी पुणे येथील कृषि महाविद्यालयाच्या डॉ. शिरनामे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन मा. श्री. विकास देशमुख, आयुक्त कृषि तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्या हस्ते संपन्न झाले. औषधी वनस्पतींना असलेली मागणी विचारात घेता त्यांच्या लागवडीस वाव असून राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रमांतर्गत विविध औषधी वनस्पतींसह चंदन लागवडीचा समावेश करण्यात आल्याचे सांगून शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याबाबत मा. आयुक्त कृषि यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनंत पद्मनाभ, माजी कार्यकारी संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ वुड सायन्स टेक्नॉलॉजी, बेंगलोर यांनी चंदन लागवडीपासून ते उत्पन्नापर्यंतची माहिती यावेळी दिली. उपवन संरक्षक, पुणे विभाग यांनी वन विभागाच्या विविध कायद्यांची माहिती उपस्थितांना दिली. या कार्यक्रमास डॉ. सु. ल. जाधव, संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे; श्री. विजयकुमार इंगळे, संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण; माजी आयुक्त कृषि, डॉ. कृष्णा लव्हेकर; डॉ. राजाराम देशमुख, माजी कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी; डॉ. रामकृष्ण मुळे, माजी कृषि संचालक तथा संचालक, इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल टेक्नॉलॉजीस्ट, महाराष्ट्र; माजी कृषि संचालक, श्री. जयंत देशमुख तसेच कृषि विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

Registered with R.N.I. Under MAH MAR/2000/1270 * PCW/031/2015-17
*April 2017 Posted at BPC, PUNE, CSO, 411030 on every 30th to 7th days.



शेतकरी : एप्रिल २०१७

प्रेषक

संपादक
शेतकरी मासिक
कृषि आयुक्तालय, कृषिभवन
शिवाजीनगर, पुणे-४११००५
दूरध्वनी : ०२० २५५३७३३१

शेतकरी बंधूंनो
त्वरा करा...
वर्गणी भरा!
पत्त्यावर
* असल्यास आपली वर्गणी एकच महिना शिल्लक आहे.
** असल्यास वर्गणी दोन महिने बाकी आहे.
*** असल्यास वर्गणी तीन महिने बाकी आहे.

पोस्टमन बंधूनो
या पत्त्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया कृषि विभागाच्या संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालय/ मंडल कृषि अधिकारी कार्यालय किंवा नजिकच्या कृषि पर्यवेक्षक किंवा कृषि सहाय्यक यांच्याकडे द्यावा.

भारत सरकार सेवार्थ

श्री. ____________________

____

____

____

____________ पिन क्र. ____________

हे मासिक कृषि विभाग, महाराष्ट्र शासन करिता प्रकाशक व मुद्रक श्री. विकास देशमुख, आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे व संपादक श्री. व्ही. एन. देशमुख यांनी आनंद पब्लिकेशन, जळगाव येथे छापून कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे १ येथे प्रसिद्ध केले.